. ग्र. म. ठाण
चरित्र
३००.

# [redacted] हासक-स्त्री-रत्नें.

लेखिका,

सौ. यशोदाबाई भट.

मुंबई.

सन १९२२.

किंमत १० आणे.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0002076

सं. च. ३२८

वाचकांनीं या पुस्तकाच्या चार शब्दाखालीं माझी हस्तलिखित सही पाहून पुस्तक विकत घ्यावें.

ग्रंथकर्त्री.

ग्रंथ नं. ३२८
ता. २०/८/२८
ठाणे

# अर्पण पत्रिका.

ज्यांनीं हे पुस्तक लिहिण्याचे प्रथम सुचविले त्या
कै. श्री. रा. रा. कृ. अ. एकबोटे ऊर्फ सहकारी कृष्ण

यांस,

हे पुस्तक बंधुप्रेमाचे दर्शक चिन्ह ह्मणून आदरपूर्वक
अर्पण केले असे.

ग्रंथकर्त्री.

# ऐतिहासिक-स्त्री-रत्नें.

लेखिका,

**सौ. यशोदाबाई भट.**

मुलांचें बंड.

शिक्षणाच्या प्रभावानेंच !

' आर्य-स्त्री-रत्नें ' इ. इ. पुस्तकाची कर्ती.

REFBK-0002076

सन १९२२.

किंमत १० आणे.

BHAVE & CO

[ सर्व हक्क ग्रंथकर्त्रीनें आपल्या स्वाधीन ठेवलें आहेत ].

मुद्रक—श्रीधर विष्णु कामत, लोकसेवक प्रेस.
गोवर्धन हाऊस, पारेख स्ट्रीट, मुंबई नं. ४.

प्रकाशक—सौ. यशोदाबाई भट, सदाशिव गल्ली.
नेने बिल्डिंग गिरगांव—मुंबई.

# प्रस्तावना.

श्री शिवछत्रपतींची मातुश्री जिजाबाई, त्यांच्या दोन स्त्रिया सईबाई व सोयराबाई, भावजय दिपाबाई, दोन सुना येसूबाई व ताराबाई, तसेंच खंडेराव दाभाडे सेनापतीची बायको उमाबाई, आणि बेलवाडी उर्फ बल्लारी येथील ठाणेदारीण सावित्रीबाई, अशा आठ अभिजात मराठी स्त्रियांची चरित्रें चटकदार भाषेंत लिहून श्रीमती सौ. यशोदाबाई भट यांनीं स्वराष्ट्रेतिहासाची जी कामगिरी बजावली आहे ती वाचकांपुढें ठेवण्यास मला संतोष वाटतो. श्रीमती यशोदाबाईंचा व माझा परिचय नाहीं आणि स्वतःच्या विषयापलिकडे माझें वाचन फारसें नसल्यानें, त्यांच्या लेखांकडे माझें लक्ष यापूर्वीं गेलें नव्हतें, याबद्दल मला दिलगिरी वाटते. तत्राप आपले छापील पुस्तक मजकडे पाठवून व त्यास प्रस्तावना लिहिण्याचें काम सांगून त्यांनीं माझा गौरव केला ह्याबद्दल मीं त्यांचा आभारी आहे.

स्वराज्यसंस्थापक निर्माण करण्यांत व्यक्त झालेलें जिजाबाईचें मातृवात्सल्य व मुत्सद्दी शहाणपण, सईबाईचे पतिप्रेम, सोयराबाईचा सात्विक त्वेष, दीपाबाईचें व्यवहारचातुर्य, येसूबाईचें संकटकालचें अप्रतिम धैर्य, ताराबाईची महत्वाकांक्षा, दाभाडे उमाबाईनें पतिनिधनोत्तर केलेली सेनापतित्वाची सार्थकता, आणि सावित्रीबाईचें रणशौर्य, अशा प्रकारचे भिन्न गुण या आठही स्त्रियांच्या ठिकाणीं व्यक्त झालेले असून गोष्टींच्या रुपानें वर्णिलेलीं त्यांचीं हीं चरित्रें वाचल्यानें विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं स्वराष्ट्रेतिहासाची आवड उत्पन्न झाल्याशिवाय रहाणार नाहीं; आणि या स्त्रियांच्या चरित्रांस गोष्टींचें मनोहर स्वरूप दिलेलें असल्यानें, ऐतिहासिक तपशिलाची रुक्षताही वाचकांस भासणार नाहीं. ठिकठिकाणीं नानाविध रसांची हृदयंगम छटा उठलेली पाहून, वाचक तल्लीन होतो.

अशा कृतींचा राष्ट्रीय शिक्षणांत मोठा उपयोग आहे. जॉन ऑफ आर्क किंवा मेरी क्वीन ऑफ स्कॉटस् सारख्या परदेशीय स्त्रियांचीं चरित्रें शाळेंतील अभ्यासक्रमांत विद्यार्थ्यांच्या परिचयाचीं होतात. परंतु जेणेंकरून आपला

राष्ट्रीय अभिमान जागृत होईल, अशा किती तरी व्यक्ती व प्रसंग आपल्या इतिहासांत असतां त्यांची ओळख त्यांस नसावी ही खेदाची गोष्ट आहे. ही उणीव श्रीमती यशोदाबाईंच्या अशा प्रयत्नानें भरून येणार आहे. अनेक इतिहास भक्तांच्या परिश्रमानें पुष्कळसें ऐतिहासिक साहित्य अलीकडे प्रसिद्ध झालें असून, त्याच्या आधारानें ऐतिहासिक चरित्रें, कादंबऱ्या वगैरे निर्माण होऊन स्वराष्ट्रेतिहासाविषयीं समाजांत आस्था उत्पन्न होत आहे, तिची वृद्धी श्रीमती यशोदाबाईंच्या या पुस्तकानें होणार असून, स्त्रियांचीं चरित्रें गुंफण्यास त्यांच्याचपैकीं एक स्त्री लाभली, यांत विशेष औचित्य आहे. हा प्रयत्न गोष्टींच्या रूपाचा असून चरित्र या दृष्टीनें ही कथानकें सर्वथैव प्राह्य मानतां येणार नाहींत तथापि वाचकांचें लक्ष वेधून घेण्यास पुस्तकांत दिलेला तपशील पुरेसा आहे.

श्रीमती यशोदाबाईंचा हा प्रयत्न असाच वृद्धिंगत होऊन त्यांचे हातून आणखी पुष्कळ बहुमोल कृती निर्माण होतील अशी उमेद वाटते. स्वराष्ट्रेतिहासांतील नुसत्या स्त्रीवर्गाचीच कामगिरी वाचकापुढें मांडण्याचें काम त्यांनीं पत्करिल्यास आणखी किती तरी उद्योगाला जागा आहे. छत्रपति भोसले, पेशवे, आंगरे, जाधव, निंबाळकर, शिंदे, होळकर इत्यादि शेंकडों घराण्यांतील परंपरा धुंडाळली तर महाराष्ट्र वीर पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांची कामगिरी दृष्टीस पडते. सारांश जिवंत भावनेच्या त्या ऐतिहासिक कालांत समाजाचे सर्व अवयव आपापले उद्योग यथाशक्ति करीत होते, ह्मणूनच मराठ्यांचा इतिहास आज आपणांस अभिमानास्पद वाटतो त्या योगानें हल्लींच्या बदललेल्या परिस्थितींतही यथाकालोचित कर्तव्यें बजावण्याची स्फूर्ति प्रस्तुतसारख्या पुस्तकावरून समाजांत उत्पन्न होईल अशी आशा व्यक्त करून, मीं श्रीमती सौ. यशोदाबाई भट याचीही कृती वाचकांचे हातीं देतों.

तारीख ११ मे १९२२. } गोविंद सखाराम सरदेसाई.

# अभिप्राय.

आपल्या देशाची हल्लींची हीन स्थिती जाऊन त्याला सुस्थिति प्राप्त व्हावी व त्याचा दर्जा सर्व जगांत वाढावा या साठीं उपाय शोधून काढण्यांत व शोधून काढल्यावर ते अमलांत कसे आणावे याचा विचार करण्यांत आपल्या देशांतील स्वार्थत्यागी, विचारवंत व मुत्सद्दी लोक गुंतलेले आहेत. अशा प्रकारच्या उपायांपैकीं सुशिक्षण हा एक आहे हें सर्व संमत आहे. प्रचलीत शिक्षण पद्धतींत अनेक दोष आहेत यांत शंका नाहीं. ह्या अनेक दोषांपैकीं एक प्रमुख दोष असा आहे कीं आपल्या देशाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचे योग्य शिक्षण दिलें जात नाहीं. विद्यार्थ्यांचें शील सुधारावें, त्यांना स्वदेश व स्वकीय संस्कृती ह्याबद्दल प्रेम व आदर वाटावा, देशाभिमान व महात्वाकांक्षा प्रज्वलित व्हाव्या, त्यांच्या अंगीं चिकाटी, सततोद्योग, स्वावलंबन इत्यादि गुणांचा परिपोष व्हावा ह्मणून स्वराष्ट्रांतील उज्वल कीर्तीयुक्त स्त्रीरत्नें व नरकेसरी यांची चरित्रें आदर्शवत् ठेवून आपल्या चारित्र्याला वळण कसें लावावें यांचें शिक्षण हल्लींच्या शिक्षण संस्थांतून क्वचितच मिळतें.

असें शिक्षण संस्थांतून मिळत नाहीं ह्मणून नुसते हळहळून किंवा बोटें मोडून भागणार नाहीं. यासाठीं आपण स्वतंत्र प्रयत्न केले पाहिजेत. अशा प्रकारचे प्रयत्न सुदैवानें महाराष्ट्रांत बरेच होत आहेत. गेल्या दोन तीनशें वर्षांतील महाराष्ट्राच्या इतिहासांत लोकोत्तर कीर्तीमान असे अनेक पुरुष झाले व अनेक स्त्रीरत्नेंही चमकली. यापैकीं बऱ्याच पुरुषांची चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. परंतु विस्मृती व अज्ञान यांची छटा अनेक स्त्रीरत्नांवर पडल्यामुळें त्यांचें तेज लोपून गेलें आहे. अशा स्त्रीरत्नांस उजेडांत आणण्याच्या प्रयत्नांची उणीव होती ती या विषयावर पुस्तक लिहून सौ. यशोदाबाई भट यांनीं अंशतः दूर करण्याचे श्रेय घेतलें आहे. सौ. यशोदाबाई भट यांच्या प्रस्तुत पुस्तकांत महाराष्टांत गेल्या दोन तीनशें वर्षांत ज्या करारी, धोरणी, शूर, पतिव्रता व चारित्र्यमूर्ती अशा स्त्रिया झाल्या त्यांपैकीं कांहीं स्त्रियांचीं चरित्रें दिलेलीं आहेत. यांतील शिवमाता जिजाबाई यांच्यासारखी

स्त्रीरत्नें महाराष्ट्रांतील सर्वसाधारण लोकांच्या परिचयाचीं अशीं आहेत. परंतु सर्वसाधारण लोकांना अपरिचित अशा पुष्कळ स्त्रियांची चरित्रें या पुस्तकांत दिलेलीं आहेत.

सौ. भट यांचा महाराष्ट्राच्या इतिहासाचा व्यासंग पुष्कळ वर्षांचा आहे. त्यांनीं या पुस्तकांत जागोजाग आपल्या विधानांच्या समर्थनासाठीं टीपा दिल्या आहेत. पुस्तकाची भाषा विषयाला साजेल अशी भारदस्त पण चटकदार, भावनाप्रधान परंतु समतोल आहे. वैचित्र्यासाठीं मधून मधून संवाद घातले आहेत. हल्लीं पुष्कळशा मासिक पुस्तकांतून येणाऱ्या पाणचट युवयुवतींच्या गोष्टी ऐवजीं प्रस्तुत पुस्तकासारखे ग्रंथ जर तरुण स्त्री–पुरुष यांच्या हातीं पडतील तर फारच फायदा होईल. पुस्तकांतील विचार उच्च मनोवृत्ती उचंबळविणारे असून स्त्रीशीलास आवश्यक असे जें पातिव्रत्य, सहनशीलता, कुटुंबनिष्ठा इत्यादि गुण त्यांचा परिपोष करणारे आहेत. स्त्रीरत्नांचे अंधूक होत असलेलें तेज आपल्या लेखनकौशल्यानें सौ. भट यांनीं सर्वांच्या निदर्शनास आणून दिलें आहे. स्त्रियांची चरित्रें, व तीं निवेदन करण्याकरितां स्त्री लेखक असा हा योग जमल्यामुळें दुधांत साखर पडल्यासारखें झालें आहे.

सौ. भट यांनीं हा जो चित्रपट रंगवला आहे त्याकडे समाजाचें चित्त आकर्षिलें जाईल व समाजाकडून केल्या जाणाऱ्या कौतुकामुळें अशा प्रकारचे अनेक चित्रपट रंगविण्याचा उत्साह ग्रंथकर्तीला येईल असा भरंवसा आहे.

ता. २४ एप्रिल १९२२. } पांडुरंग वामन काणे, हायकोर्ट वकील,
एम्. ए., एल्एल्. एम्.

---

# माझे चार शब्द.

प्रथमपासूनच ऐतिहासिक वाचनाकडे माझा फार ओढा होता त्यांत ' मुलांचा महाराष्ट्र ' या पुस्तकाप्रमाणें ' मुलींचा महाराष्ट्र ' असें ऐतिहासिक स्त्रियांचीं चरित्रें लिहून मी एक पुस्तक लिहावें अशी सूचना १९१५ सालीं माझे व्यवसायबंधु श्रीयुत सहकारी कृष्ण यांनीं केली व ती मला पटली. परंतु अगोदरच ऐतिहासिक वाङ्मय अल्प त्यांत बखरी वगैरेंतून पुरुषांबद्दल जितकी माहिती सांपडते तशी स्त्रियांबद्दल सांपडत नाहीं. दोनशें पानाचें पुस्तक वाचावें तेव्हां कोठें बायकांच्या नांवाचा उल्लेख आढळतो. म्हणून शक्य तितकी मिळेल ती माहिती घेऊन त्यांत पदरचा काल्पनिक भाग घालून गोष्टींच्या रूपांत तीं चरित्रें लिहिण्याचें मीं ठरविलें. व सांगण्यास संतोष वाटतो कीं कोणत्या पुस्तकांत कोणाबद्दल माहिती मिळेल हें श्री. बखरकार साने व श्री. रा. रा. वि. का. राजवाडे यांनीं सांगितल्यानें मला फार फायदा झाला. नंतर मीं १९१६ सालीं मातोश्री जिजाबाई, सोयराबाई व सावित्रीबाई ठाणेदारीण या स्त्रियांच्या चरित्रपर गोष्टी लिहून काढल्या व त्याच सालीं ' मातृशाप ' ही गोष्ट मधुकर मासिकांतून प्रसिद्ध झाली होती. व नंतर तीं तीनही चरित्रें माझे बंधु प. वा. रा. रा. हरिभाऊ आपटे व श्री. रमाबाईसाहेब रानडे यांना वाचावयास दिली होती त्यांना ती आवडल्यामुळें मला पुढील चरित्रें लिहिण्यास उमेद वाटली परंतु नंतर मीं ' आर्य स्त्री रत्नें ' हें पुस्तक लिहिण्यास घेतलें तेव्हां असें वाटलें कीं प्रथम ' आर्य स्त्री रत्नें ' नंतर ' ऐतिहासिक स्त्री रत्नें ' व तिसरा भाग आधुनिक स्त्री रत्नें असे तीन भाग लिहावेत. त्याप्रमाणें ' आर्य-स्त्री-रत्नें ' १९१७ सालीं प्रसिद्ध झालें. परंतु कांहीं संसारिक अडचणीमुळें

' ऐतिहासिक स्त्रीरत्नें ' पुरें करण्याचें काम दिरंगाईवर पडलें. नंतर १९२० अखेर मीं एकदां श्री. सौ. अवंतिकाबाई गोखले यांचे बरोबर म. गांधी यांस भेटण्यास गेल्यावेळीं त्यांनीं महात्माजींस माझी माहिती देतांना मी इतिहासाचा अभ्यास केला असून ऐतिहासिक स्त्रियांचीं चरित्रें लिहीत असल्याचेंही सांगितलें महात्माजींनीं ' ती पुरी होताच माझ्याकडे पाठवा ' असें मला सांगितलें. नंतर १-२ वेळ सौ. अवन्तिकाबाईंनीं " तुम्हीं तीं चरित्रें कधीं पुरीं करणार? महात्माजींनीं तीं मागितलीं आहेत ना ? " असें विचारलें. परंतु माझ्या आळसामुळें महात्माजी मोकळे होते तोंपर्यंत हीं चरित्रें पुरीं होऊन त्यांच्या चरणीं प्रथम सादर करतां आलीं नाहींत याबद्दल मला खेद होत आहे. चरित्रें गोष्टीरूपानें जरी लिहिलीं आहेत तरी प्रत्येक गोष्टीस ऐतिहासिक आधार आहे.

मातोश्री जिजाबाईचें चरित्र बाळपणापासून अंतकालपर्यंत निवेदिलें आहे. त्यांच्या चरित्रांत स्वाभिमान, मुत्सद्देगिरी, स्वराज्यनिष्ठा, धर्मप्रेम, वात्सल्य, करारीपणा, धैर्य इत्यादि गुण दाखविणारे प्रसंग आले आहेत. सावित्रीबाई ठाणेदारीण यांनीं पतिनिधनोत्तर जें अप्रतिम रणशौर्य गाजविलें त्या आधारें त्यांच्या चरित्राची उभारणी केली गेली आहे. सईबाई यांचें पतिप्रेम सासूबद्दल पूज्यता इत्यादि गुणावर त्यांचें चरित्र रचलें गेलें आहे. सोयराबाईचें राजकारणपटुत्व, सात्विक त्वेष, चिकाटी इत्यादि गुण दाखविणारें चरित्र रेखाटलें आहे. शिवप्रभूंची भावजय दीपाबाई हिनें भावांभावांतील कलह मिटवून आपल्या चातुर्यानें त्यांचें ऐक्य घडवून आणलें त्या प्रसंगावर तिचें चरित्र रंगवलें आहे. शिवप्रभूंची सून एसूबाई हिचा अलौकिक स्वार्थत्याग, स्वराज्याकरतां मानापमान बाजूस सारून ऐक्य राखण्याचा बळकट प्रयत्न, पतिबद्दल पूज्यता राखून त्याला वेळोवेळीं सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न, धैर्य, सहनशीलता इत्यादि गुणाचें परिशीलन करून त्यांचें चरित्र गुंफिलें आहे. शिवप्रभूंची सून (राजारामाची बायको) ताराबाई इची, जबरदस्त महत्वाकांक्षा, अप्रतिम चिकाटी, दीर्घोद्योग, मानीपणा, राजकारण चातुर्य इत्यादि गुण तिच्या चरित्रांत आढळून येतील. उमाबाई दाभाडे यांचें चरित्र दाभाडे घराण्याचा इतिहास ह्या एकाच बखरीवरून लिहिलें आहे. व त्यांत ती अत्यंत

शहाणी व शूर होती असें दाखवलें आहे. अद्याप कित्येक स्त्रियांचीं चरित्रें लिहिण्यासारखीं आहेत. परंतु हा माझा प्रयत्न वाचक बंधुभगिनींस आवडल्यास दुसऱ्या भागांत त्यांचीं चरित्रें लिहिण्याचा हुरूप मला येईल.

हें पुस्तक लिहितांना ज्या ज्या बखरी व इतर पुस्तकांचें साह्य मला झालें त्या त्या पुस्तककर्त्यांची मीं आभारी आहें.

तसेंच माझे दीर भा. वा. भट यांनींही आपले जवळचीं कांहीं ऐतिहासिक पुस्तकें मला दिलीं याचा उल्लेख केल्यावांचून मला रहाववत नाहीं तसेंच सुप्रसिद्ध इतिहासकार श्री.रा.रा.गो.स.सरदेसाई यांचा व माझा अल्पहि परिचय नसतांना त्यांनीं प्रस्तावना लिहून दिली व यापुढें केव्हांही ऐतिहासिक लेखां-संबंधीं साह्य करण्याचें आश्वासन दिलें आहे. केवढें हें त्यांचे सौजन्य ? तशांत प्रस्तावना लिहून देतांना ते अत्यंत गडबडींत असतांनाही त्यांनीं प्रस्तावना लिहून दिली याबद्दल त्यांचे कितीही आभार मानले तरी ते अपुरेच पडणार तथापि स्वकर्तव्य म्हणून मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतें.

तसेंच श्री. पांडुरंग वा. काणे यांनीं अर्धकच्चीं प्रुफें वाचून जो आपला अमूल्य वेळ खर्चून अभिप्राय दिला याबद्दल त्यांचेही मीं शतशः आभार मानतें.

तसेंच 'लोकसेवक' प्रेसचे मालकांनीं छपाईचें काम लवकर व सुंदर करून दिल्याबद्दल त्यांचेही मी अत्यंत आभार मानतें. शेवटीं या कामीं वर उल्लेखि-लेल्या सर्वांचे साह्याबरोबर जर त्या दयाघन प्रभूचें साह्य नसतें तर इतरांचें साह्य फोलच ठरलें असतें. म्हणून त्याच्या कृपेबद्दल त्याची अनन्यभावें करुणा भाकून व नजर चुकीने पुस्तकांत राहिलेली अशुद्धे वगैरेबद्दल वाचकांची क्षमा मागून मी हे माझे लांबलेले चार शब्द पुरे करतें.

सदाशीव गल्ली,
नेने बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.
जून २२-६-२२.

सौ० यशोदाबाई भट

# अनुक्रमणिका.

—:o:—


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| राजमाता जिजाबाई. | १ |
| मातृशाप. सोयराबाई | १९ |
| सावित्रीबाई ठाणेदारीण. | ३० |
| भाग्यशाली सईबाई. | ४१ |
| दिपाबाई. | ५३ |
| मुत्सद्दी येसूबाई. | ६५ |
| ताराबाई. | ८७ |
| उमाबाई दाभाडे. | ९५ |

## ऐतिहासिक स्त्रीरत्नें

# "राजमाता जिजाबाई."

यादव कूळ म्हणजे श्रीकृष्णाचा जन्म झालेलें कूळ ! त्यांचेच वंशज जें जाधव घराणें त्या घराण्यांत एक अलौकिक कन्यारत्न जन्मास आलें. हें स्त्रीरत्न जन्माला न येतें तर मराठ्यांचें 'स्वराज्य' होतें हे शब्द आज आपणाला ऐकावयालाही मिळते कीं नाहीं याची शंकाच आहे. पारतंत्र्यांत खिचपत पडणाऱ्या महाराष्ट्राला जर कोणीं वर काढलें असेल, त्याला गुलामगिरींतून कोणीं मुक्त केलें असेल तर त्याचें पुष्कळसें श्रेय याच स्त्रीरत्नाला दिलें पाहिजे. आणि आपण जर इतिहास चाळून पाहूं लागलों तर इतिहासकारांनीं बरेंचसें श्रेय या स्त्रीरत्नाला दिलेलें आढळतें ही. धन्य ते लखुजी कीं ज्यांच्या पोटीं असलें चिरकालिक सुकीर्ती मागें ठेवून जाणारें रत्न जन्माला आलें ! लखुजींना ती आपली कन्या लहानपणापासूनच फार आवडे. ते निजामशाहींत नौकरीला होते. ते शूर, स्वामीनिष्ठ असे सरदार होते. ते दरबारांत बसलें कीं, त्यांची लाडकी जिजा त्यांच्या मांडीवर बसून त्यांना अनेक प्रश्न विचारीत असे. यामुळें अगदीं लहान वयांतच तिला राजा म्हणजे कोण, त्याचे सरदार कोण, त्यांच्याकडे कायकाय कामें असतात; लष्करी शिपाई कसे असतात; सैन्याच्या मुख्य अधिकाऱ्याला काय म्हणतात, त्याच्याकडे कोणतीं कामें असतात वगैरे गोष्टींची थोडथोडी माहिती तिला झाली होती. लखुजींनाही तिच्या नानाप्रकारच्या प्रश्नांना उत्तरें देण्याचा कंटाळा आला नाहीं. त्यांत उलट त्यांना कौतुकच वाटत असे. जिजा जात्याच चौकस, त्यांत बाप विचारलेल्या गोष्टी प्रेमानें समजावून देई मग काय विचारतां ! तिनें प्रत्येक गोष्ट समजावून घ्यावी. यामुळें तिच्या अंगीं बहुश्रुतपणा आला होता.

एक दिवस रंगपंचमीचा मोठा दरबार भरला होता. जिजाबाई उंची वस्त्रें व दागदागीनें घालून बापापाशीं बसली होती. इतक्यांत लखुजीच्या हाता-

खालीं नौकर म्हणून असलेला मालोजी भोसले हा आपल्या एकुलत्या एका मुलास उंची सरदारीबाण्याचा पोषाख घालून दरबाराला आला होता. त्यावेळीं बैठकीस बरीच बडीबडी मंडळी बसली होती; अगोदरच मालोजींचा शहाजी अत्यंत सुंदर त्यांत त्याला चांगले कपडे घातल्यामुळें व विशेषतः त्याची ऐट पाहून प्रत्येकाचें लक्ष त्याजकडे वेधून राहिलें. लखुजीनीं तर त्याला लडीवाळपणानें आपल्यापाशीं बसवून घेऊन ते म्हणाले:—"कायग जिजा, हा नवरा पाहिजे का तुला ?"

"होय बाबा. हा कसा गोरागोरापान नवरा आहे. मला आपला हाच हवा."

आपल्या लाडक्या जिजाची पाठ थोपटून पुनः ते म्हणाले:—"अस्सं, अस्सं ! गोरा नवरा हवा काय ? का मंडळी हा जोडा चांगला शोभतो नाही ? पण कायग जिजा, त्याला तलवार धरतां नाहीं आली तर चालेल कीं नाहीं ?"

"नाहीं चालायचें ! पण बाबा, ही पहा याची तरवार ! ए, तूं तरवार घेऊन काय करणार ?"

"काय करणार म्हणजे ? आपल्या सरकारच्या शत्रूला चित करणार." असें म्हणून त्या वीर बच्चानें आपली लहानशी तरवार सर्रदिशीं म्यानांतून बाहेर काढिली.

"वाहवारे बहाद्दर ! एकूण आपण लढाया मारणार ?" लखूजी म्हणाले.

"आमचें तें कामच आहे !" ऐटींत त्यानें ठेवून दिलें. सर्व दरबारी मंडळी शहाजीकडे त्याचें नैसर्गीक शौर्याचें बोलणें ऐकून व वर्तन पाहून टकमक पहात राहिली. इतक्यांत त्या मुलांनी तबकांत ठेवलेले सुवासीक पुष्पांचे हार एकमेकांच्या गळ्यांत घातले. व जवळच ठेवलेल्या पिचकाऱ्यांतून एकमेकांच्या अंगावर रंग उडविला. तें पाहून मालोजी उठले व मंडळीला उद्देशून म्हणाले:—

"मानकरी व सरदार हो, आतां घडलेला प्रकार तुम्हीं पाहिलाच आहे. त्याप्रमाण लखुजी काय म्हणाले आहेत तेंही तुमच्या लक्षांत असेलच. तेव्हां आजपासून लखूजी आमचे व्याही झाले. आमच्या नात्याची भाषा त्यांनीं आपण होऊनच काढली आहे यास आपण सर्वजण साक्षीदार आहां."

याप्रमाणें बोलणीं होऊन रंगपंचमीचा दरबार बरखास्त झाला. ही गोष्ट जेव्हां जिजाबाईची आई म्हाळसाबाई हिच्या कानावर गेली, तेव्हां तिला तो विचार मुळींच न आवडून ती पतीला म्हणाली:—" आपण सहजच कां होईना, परंतु असं कां म्हटलं ? कारण किती झालं तरी या भोंसल्यांना आपणचना चाकरी लावून दिली ? त्या मालोजींची योग्यता ती काय ? तो आपल्या पदरचा नौकर. त्याच्या घरीं माझी मुलगी पडण्यायोग्य तें स्थळच नव्हें. आपल्या बरोबरीचे शिर्के, महाडीक, निंबाळकर थोडे का सरदार आहेत ? त्या मालोजीला स्वच्छ नाहीं म्हणून सांगावं. सहज थट्टेनं बोललों म्हणून तें काय खरंच धरायचं कीं काय ?"

पत्नींचें हें बोलणें ऐकून मालोजी बुचकळ्यांत पडले. तथापि कांहीं सामोपचारानें मालोजींची समजूत पडते का पहावें, म्हणून त्यांनीं मालोजीला त्याच दिवशीं जेवणाचें आमंत्रण दिलें. परंतु त्यांनी लागलीच जबाब पाठविला कीं, " तुम्ही व्याही व्हाल तर येईन, नाहींतर नाहीं. आतां तुमची आमची पंगत व्याहीभोजनाचीच !"

म्हाळसाबाईचें बोलणें कर्णोपकर्णीं मालोजीला समजलें; तेव्हां तर तो फारच इरेस पेटला. व त्याच हेतूनें त्यानें पुष्कळ द्रव्य संपादन केलें. आपली कीर्ति सर्वत्र व्हावी म्हणून त्यानें पुष्कळ दानधर्म केला. कित्येक तळीं, देवालयें वगैरे बांधलीं. तसेंच पुष्कळसे घोडे वगैरे खरेदी केले व प्रसंगीं मर्दुमकी दाखवून त्यानें बादशाहाकडून पांच हजारांची सरदारी व 'मालोजी राजे' हा किताब मिळविला. अशा रीतीनें आपल्या शौर्यानें शिवनेरी व चाकण या दोन्ही किल्ल्यांची व त्यांच्या खालील मुलखाची मामलत मिळविली. पुणें व सुपें परगण्यांची त्यानें जहागिरी मिळविली. एवढ्या योग्यतेस चढण्याची महत्त्वाकांक्षा व धडपड केवळ म्हाळसाबाईनें केलेल्या निंदेमुळेंच मालोजीच्या मनांत उद्भवली. खेरीज त्यानें असें ठरवूनच टाकलें होतें कीं, काय पाहिजे तें झालें तरी त्याच म्हाळसाबाईची मुलगी आपली सून करीन तरच नांवाचा मालोजी भोंसले !

एक दिवस मालोजी व त्याचा भाऊ विठोजी यांनीं एका डुकराची शिकार करून ती मुसलमानांच्या मशिदींत नेऊन टाकिली.* अर्थात् ती फिर्याद बाद-

* दळवीकृत मराठी कुळांचा इतिहास पहा.

शाहापुढें गेली. दोघां भावांना बादशाहापुढें नेऊन उभें केलें. तेव्हां मालोजीनें बादशाहाला विनंती केलीः—

"खाविंद, जाधवरावांनीं आमचा फार अपमान केला आहे. भरदरबारांत सर्व सरदारमानकऱ्यांच्या समोर त्यांनीं आपली मुलगी आमच्या मुलास देण्याचें कबूल करून आतां ते बायकोच्या तंत्रानें वागून आपला शब्द खोटा करूं पहात आहेत. तरी आम्हांस न्याय मिळून जाधवरावांना आपला शब्द खरा करावयास खाविंद लावतील अशी आमची विनंती आहे."

बादशाहानींही ती गोष्ट मनावर घेऊन जाधवरावालाही ती गोष्ट कबूल करावयास लाविलें. तसेंच मालोजींची वाढलेली कीर्ति, पैका, मानमरातब, त्यांच्यावर बसलेली बादशाहाची मर्जी वगैरे पाहून म्हाळसाबाईंचीही कांहीं कुरकूर राहिली नव्हती. यामुळें मालोजींचे पुत्र शहाजी व लखुजींची कन्या जिजाबाई यांचा लग्नसमारंभ मोठ्या थाटानें पार पडला. स्वतः निजामशाहा या लग्नसमारंभाला हजर होते. यामुळें तर समारंभ फारच अपूर्व झाला.

आपला हेतू अशा रीतीनें सफल झाल्याचें पाहून मालोजीला समाधान वाटलें. त्याचा जिजाबाईवर अत्यंत जीव होता. पोटच्या मुलीपेक्षांही ती त्याला प्रिय वाटे. याचें कारण जिजाचे सद्गुण हें तर होतेंच. परंतु दुसरेंही एक कारण असें होतें कीं, जिजाबाईचें लग्न होण्यापूर्वीं द्रव्य मिळण्यासाठीं मालोजी जगदंबा देवीची आराधना करीत होता. त्याची भक्ति पाहून भवानीनें त्याला दृष्टांत दिला कीं, अमूक ठिकाणीं तुला अगणित द्रव्य मिळेल; तसेंच तुझ्या कुलांत महापराक्रमी व स्वराज्यसंस्थापक पुरुष जन्माला येईल. तो स्वराज्यसंस्थापक पुत्र याच जिजाचे पोटीं येणार असें आपलें त्याच्या मनाला वाटे. या कारणानें तो सुनेशीं फार प्रेमळपणें वागे. जिजाबाईचीही त्याचे ठिकाणीं अत्यंत भक्ति होती.

लौकरच कांहीं दिवसांनीं मालोजी वारला व अल्पवयांतच शाहाजीवर जहागिरीच्या बंदोबस्ताचा सर्व भार पडला. शाहाजी बाणेदार, शूर व धाडशी होता. तो पुढें अहमदनगरच्या राज्याच्या उलाढालींत पडला. अहमदनगरच्या निजामशाहींत दोन तट पडले होते. एक मुसलमानांचा व दुसरा

मराठ्यांचा. मुसलमानांच्या बाजूस मलिकंबर नांवाचा एक मुत्सद्दी होता. मराठ्यांच्या बाजूला मियान राजू हा होता. ही दरबारांतील दुही पाहून दिल्लीहून युवराज शहाजहान हा मोठें सैन्य घेऊन दक्षिणेंत आला. त्याच्याशीं जें भयंकर युद्ध झालें त्यांत लखुजी जाधवराव व शहाजी हे फार शौर्यानें लढले; आणि त्या लढाईंत शहाजहानाचा पराभव झाला. परंतु पुनः लौकरच तो युद्धाला सज्ज झाला. लढाईतील लखुजीचें शौर्य पाहून शहाजहान फार आश्चर्यचकित झाला होता. आणि म्हणून असला शूर सरदार आपल्याकडे असावा अशी त्याची इच्छा होती. त्यासाठीं त्यानें पुष्कळ खटपट केली. निजामशाहींत दोन तट झाल्यानें लखुजीचें मनही विटलें होतें; शिवाय युवराजानें मोठी थोरली मनसबदारी देऊं केली त्याचाही मोह त्याला पडला; व तो पहिल्या धन्याळा ( निजामशाहाला ) सोडून दिल्लीपतीचा नौकर झाला.

अशा संकटावस्थेंत निजामशाहीचा खरा वाली व एकनिष्ठ नौकर शहाजी हा मात्र आपल्या धन्याशीं बेइमान झाला नाहीं. याबेळीं निजामशाही अतिशय डबघाईस आली होती. तथापि शहाजीनें अज्ञान मूर्तिजा व त्याची आई यांना आपल्या ताब्यांत घेऊन निजामशाहीचा राज्यशकट चालू ठेवला होता. परंतु मलिकंबर आणि लखुजी यांनीं निजामशाही विरुद्ध शस्त्र उपसलें होतें यामुळें मोंगलांची सरशी होऊं लागली. आतां आपला निभाव लागणें कठीण हें पाहून शहाजी मुर्तिजा व त्याची आई यांना घेऊन कल्याण नजीकच्या माहुली किल्ल्यावर गेला व तेथून राज्यकारभार पाहूं लागला.

लखुजी जाधवरावांनीं निजामशाहीविरुद्ध शस्त्र उपसल्या वेळेपासून सासरे-जांवई यांचें कायमचें हाडवैर पडलें. शहाजहांनच्या आज्ञेनें लखुजींनी माहु-लीच्या किल्ल्याला वेढा दिला. शहाजीनें तो किल्ला सहा महिने झुंजविला. धन्य त्याची ! अशा रीतीनें जेव्हां कांहीं डाळ शिजेना तेव्हां फंदफितुरीचा मार्ग जाधवरावांनीं स्वीकारला. त्यांनीं मूर्तिजाच्या आईचें मन वळवून तिला मोंगलांना सामील करून घेतली. ही गोष्ट शहाजीला समजतांच तो किल्ला सोडून निघाला. कारण ज्याच्यासाठीं तो लढत होता तोच धनी जर लखु-जींना सामील झाला तर आतां आपली पारख कोण करणार ? असा विचार

करून तो जाधवरावाच्या सैन्याची मोठ्या शोर्यानें फळी फोडून किल्ल्यांतून बाहेर पडला. आपल्या हातावर तुरी देऊन जांवई बाहेर पडला हें पाहून लखुजी त्याच्या पाठलागास निघाले. फलटणपर्यंत त्यांनीं शहाजीची पाठ सोडली नाहीं. पुढें निंबाळकरांची मदत शहाजीला मिळेल हें जाणून ते परत फिरले. या धांवपळीच्या वेळीं जिजाबाई गरोदर होती. तिला घोड्यावर बसून नवऱ्याबरोबर पळवेना. तिचा बापच शहाजीचा पाठलाग करीत होता. लखुजी दिल्लीच्या तक्ताचे नौकर झाल्यापासून त्यांची व शहाजीची चुरस होतीच. आणि त्यांत हा आतांचा प्रसंग. तेव्हां 'वड्याचें तेल वांग्यावर' या म्हणीप्रमाणें शहाजीची व जिजाबाईची धुसफूस चाले. लखुजी पाठलाग करीत येत आहे हें ऐकून त्याच्या मनांतील चुरशीची कमाल होऊन शहाजीची बायकोवरील प्रीति अगदीं उडाली. त्यानें तिला घोड्यावरून पळतां येत नाहींसें पाहून वाटेंत आपल्या एका स्नेह्याच्या साहाय्यानें शिवनेरी किल्ल्यावर ठेवली, व आपण पुढें गेला. लखुजी माघारे फिरले तेव्हां त्यांना शहाजी जिजाबाईला मागें सोडून गेला हें वर्तमान समजलें. किती झालें तरी बापाचें आतडें तें ! तें कां स्वस्थ बसतें ? लगेच लखुजी लेकीच्या भेटीला गेले. ते तिला म्हणाले:— ' कांहीं चिंता नाहीं. तूं माझ्याबरोबर चल. मी तुला तुझ्या आईच्या स्वाधीन करतों. '

परंतु जिजाबाई मानी मालोजीची सून होती. तिनें बापास जें बाणेदार-पणाचें उत्तर केलें तें प्रत्येक स्त्रिनें लक्षांत ठेवण्यासारखें नाहीं असें कोण म्हणेल ?

" बाबा, तुम्ही आम्हाला पकडून नेण्यासाठीं आलां होता ना ? ते गेले तरी मी तुमच्या हातीं सांपडलें आहे ना ? न्या, बाबा मला न्या; व आपल्या मनाचें समाधान करा. बाबा, माझ्या सौभाग्यावर तुम्ही शस्त्र उचललें ना ? असें असून बाबा, मी तुमच्या घरीं खुषीनें येऊन तुकडे मोडीत राहीन असें तुम्हाला वाटलें होय ? बाबा, माझें उदक तुम्ही भोंसल्यांच्या हातावर घातलें ना ? मग त्या कुलाचा अभिमान मला बाळगायला नको काय ? ज्याच्या सह-कारितेनें हा लोक व परलोक यांचा सोपान चढून जावयाचा त्या माझ्या पतिदैवतावर आपण आपली समशेर चालवणार ना ? अर्थात् तुम्ही त्यांचे

शत्रू झालांत ! या मानापमानाच्या गोष्टी आहेत. त्यांचा अपमान, त्यांचा द्वेष हा माझाच आहे असें मी समजतें. तुमची इच्छा असल्यास तिकडच्या नाहीं तर नाहीं पण त्यांच्या आधीं माझ्या रक्तानें तुमच्या समशेरीला न्हाऊं घाला."

अशा प्रकारें त्या मानी जिजानें अंतःकरणाच्या जळजळीनें बापाला उत्तर दिलें. त्यावर तिच्यापुढें उभ्या राहणाऱ्या संकटांची आठवण करून देण्यासाठीं लखुजी म्हणाले:—

" जिजा, तूं गरोदर आहेस. शिवाय दिल्लीच्या शहाजहानाचे अनेक मोंगल सरदार शहाजीला पकडण्यासाठीं हिंडत रहाणार. त्यांच्याशीं टक्कर देतां येईल अशा प्रकारचें तुला कोणाचें सहाय्य नाहीं. तेव्हां तूं माझ्याबरोबर चल. यांत तुझें हित आहे. मी तुझा जन्मदाता बाप ना ?"

" होय बाबा. आपण जन्म दिलात, लालनपालन केलेंत, परंतु पुढल्या आयुष्याची जबाबदारी ज्या कुळावर आपण सोंपविलीत तें कूळ मी विसरूं की काय ? त्या कुलाचें अनहित करण्यास आपण सजलां आहां ना ? याच-साठीं बाबा, मला तुमच्या घरीं येणें नाहीं. माझ्या परिस्थितीची आठवण करून देण्यास बाबा, तुम्ही नको. मी गरोदर आहे. निःसहाय्य आहे. शत्रूच्या जबड्यांत आहे. या सर्व गोष्टींची जाणीव मला पूर्णपणें आहे. परंतु ही गोष्ट तुम्ही विसरतां कीं, ही जिजा मानी मालोजींची सून झाली आहे. ती शौर्य-सागर पतीची पत्नी आहे—वीरपत्नी आहे. जा, मी माझें संरक्षण वाटेल तसें करीन. तुम्ही आल्यांत तसे परत जा. "

या सुधारलेल्या काळीं ही आगगाडींतून एकट्या जाण्यास भिणाऱ्या माझ्या भगिनींनों, जिजाबाईचें हें केवढें बरें धाडस ?

असो. अशा रीतीनें ती एकटी येईल त्या संकटाला तोंड देण्यास सज्ज होऊन शिवनेरीवर राहिली. यापूर्वींच जिजाबाईला संभाजी म्हणून एक मुलगा झाला होता. शहाजीला तो फार आवडे म्हणून त्यांनीं त्याला आपल्याबरोबर नेला होता. शहाजीनीं पुढें लौकरच दुसरें लग्न केलें. यामुळें जिजाबाईला किती वाईट वाटलें असेल ? पतिप्रेमाबद्दल तिची कशी निराशा झाली असेल ? परंतु या असल्या गोष्टींनीं खचून न जातां पुढील कार्यासाठीं तिनें आपल्या मनाची

उत्कुष्ट तयारी तयारी केली. जगाचा साधारण असा नियम आहे कीं, दुःखाचे तडाखे बसले की, परमेश्वराची आठवण होऊन त्याच्याकडे मनुष्याचें लक्ष लागतें. शहाजीनें दुसरें लग्न केल्यापासून आपली स्वतःची जबाबदारी, कर्तव्यें वगैरे गोष्टी जिजाबाईनें आखून घेतल्या. तिची किल्ल्यावरच्या शिवाईवर फार भक्ति जडली. ती आपलें सर्वस्व ती भवानीच आहे असें मानूं लागली. आपलें सुख, आपलें दुःख ती भवानीलाच सांगे. ती देवाची परम भक्त बनली. तिनें तेथें भारत भागवतासारखे ग्रंथ मननपूर्वक ऐकले. तिचा ओढा परमार्थाकडे लागला तसाच राजकारणाकडेही लागला. कारण लहानपणापासून बापाच्या घरीं व नंतर सासरीं आणि शहाजीजवळ अलीकडे चांगलें समजूं लागल्यापासून अनेक राजकारणांतल्या उलाढाली, राज्याच्या घडामोडी वगैरे तिनें स्वतः ऐकल्या होत्या. यामुळें तिला वाटे कीं जसें दिल्लीपतीचें राज्य, आदीलशाहीचें राज्य, निजामशाहीचें राज्य तसेंच मराठ्यांचेंही राज्य कां असूं नये? जसे मुसलमान सरदार शूर तसेच मराठे सरदारही शूर आहेत. मग आमचें राज्य नसून आम्हीं दुसऱ्याचे अंकित म्हणून कां रहावें? रात्रंदिवस तिच्या मनांत हा विचार घोळूं लागला. त्याची तिला तळमळ लागून राहिली. या खेपेस जर आपणाला मुलगा झाला तर त्याच्याकडून हें कार्य आपण घडवून आणूं असें तिनें ठरविलें. तिने शिवाईला त्यासाठीं नवस केला कीं, जर या खेपेस मला पुत्र होईल तर तुझें नांव त्याला मी ठेवीन.

योग्य वेळीं जिजाबाई बाळंत होऊन तिच्या इच्छेप्रमाणें तिला खरोखरच मुलगा झाला. नवसाप्रमाणें तिनें त्याचें नांव शिवाजी ठेविलें. त्या मुलाविषयीं ती अत्यंत काळजी घेई. त्याचें लालनपालन ती अत्यंत दक्षतेनें करी. त्याला कसें शिक्षण द्यावयाचें, त्याच्या मनावर कोणत्या गोष्टी ठसवावयाच्या वगैरे गोष्टी तिनें ठरवून ठेवल्या होत्या. अशा रीतीनें आपल्या लाडक्यासह ती आपले दिवस आनंदांत घालवीत असतांना तिच्यावर एक मोठें संकट आलें.

निजामशाहीच्या स्थापनेसाठीं विजापूरकरांची मदत घेऊन शहाजी मोंगलांशीं पुनः लढूं लागला. त्यानें फारच शौर्यानें व मुत्सद्देगिरीनें निजामशाही पुनः पुनः स्थापून मोंगलांशीं लढाई चालू ठेवली. मोंगलही त्याच्याशीं निकराचे

सामने करीत तथापि शहाजीचा जोर कांहीं कमी होईना. शेवटीं त्यांच्यापैकीं एका सरदारानें मसलत काढली कीं, शहाजीची बायको व मुलगा यांना पकडून आणावें म्हणजे शहाजी नरम येईल. झालें. त्या सरदाराच्या मसलतीप्रमाणें खानसाहेबांनीं आपला मोर्चा जिजाबाईकडे वळविला. तिला मुलासह त्यांनीं पकडून आणिलें. या मोंगलांच्या वर्तनानें जिजाबाईला त्यांचा अत्यंत तिटकारा आला. आपल्या प्राणापेक्षांही प्रिय अशा अब्रूवर बेतली असतां आपल्या जिवाचा बळी देण्यासही तिनें मागें पुढें पाहिलें नसतें. परंतु आपले बेत मनांतल्या मनांतच केवळ स्वप्नाप्रमाणें होऊन जाणार म्हणून तिला फार वाईट वाटलें.

शहाजीला ही गोष्ट माहीत नव्हती. परंतु दिल्लीपतीच्या पदरीं लखुजीचा भाऊ–जिजाबाईचा चुलता–हा होता. त्यानें निजामशाहीशीं बादशाहाच्या वतीनें लढून बराच लौकीक मिळविला होता. या जगदेवरावाला ही बातमी कळली तेव्हां तो खानसाहेबांकडे गेला व म्हणाला:—“ जिजाबाई ही आमची पुतणी लखुजींची मुलगी असून तिला शहाजीनें टाकली आहे. तेव्हां तिला पकडल्यानें शहाजीचा अपमान झाला नसून तो आमचाच अपमान होय. ” असें जगदेवरावांनी सांगून जिजाबाईची सुटका केली. व ते तिला आपल्या घरीं घेऊन गेले. परंतु त्या मानी जिजाबाईला तेथें मुळींच राहावेना. तिनें लौकरच शहाजीची भेट घेतली व आपण आपल्या जहागिरीच्याच गांवीं राहणार असें सांगून आपली व्यवस्था करून घेतली. ती पुण्याजवळील कोंडाणें–हल्लींचा सिंहगड–किल्ल्यावर राहूं लागली.

शिवाजीचें वय यावेळीं ५।६ वर्षांचें होतें. जिजाबाईनें त्याला भारत भागवतांतल्या मोठमोठ्या वीरांच्या कथा सांगाव्या; श्रीकृष्णानें गोकुळांत गाईच्या संरक्षणासाठीं कशी खटपट केली; तो गोब्राह्मणांना अत्यंत पूज्य मानी वगैरे गोष्टी सांगून बाल शिवाजीच्या मनोभूमिकेवर गोब्राह्मण भक्तीचें बी रुजत घातलें. त्याला तिनें खतपाणी दिलें. शिवाय त्यावेळीं नेहमीं नेहमीं हिंदुधर्मच्छलाच्या, गोवधाच्या गोष्टी ऐकूं येत. आज काय एका ब्राह्मणाच्या तोंडांत मुसलमानांनीं गोमांस कोंबलें. उद्यां काय भररस्त्यावर गोवध केला.

अशा अनेक गोष्टी शिवाजीच्या मनावर मुसलमानाविषयीं तिरस्काराची छटा उमटविण्याला व ती छटा कायम करण्याला कारणीभूत होत. जिजाबाईच्या तोंडूनही त्याच्या कानीं असल्या गोष्टी पडत. जिजाबाईला आपल्या अपमानाचें उट्टें केव्हां काढीन असें होऊन गेलें होतें.

मध्यंतरीं चाललेल्या लढायांचा शेवट होऊन निजामशाही समूळ बुडाली. तेव्हां शाहाजी विजापूरकरांचे नोकरीस राहिला. आतां पूर्वीप्रमाणें राज्याच्या संरक्षणाचा बोजा त्याच्यावर नसून तो आतां पुष्कळसा मोकळा होता. म्हणूनच त्यानें जिजाबाईला व शिवाजीला विजापूरीं नेण्याचा बेत केला.

त्याप्रमाणें त्यांना घेऊन जाण्याकरितां स्वतः शहाजी येणार असल्याचा निरोप व लखोटा घेऊन एक स्वारही येऊन थडकला. शिवाजीला ही गोष्ट कळतांच बालस्वभावामुळें साहजीकच आनंद झाला. जिजाबाईच्या तोंडावर उत्साह दिसेना.

शिवाजीनें आपल्या बापाविषयींच्या पुष्कळ गोष्टी ऐकल्या होत्या. तसेंच इतर मुलांचे वडील त्यांना पोशाख करीत, तरवारी घेऊन देत आणखी पुष्कळ लाड करीत हें शिवाजीनें पाहिलें होतें. आपणाला ही आपले बाबांनीं असल्या वस्तु द्याव्या असे त्याला वाटे. परंतु आजपर्यंत त्याला स्वस्थ बसणेंच भाग पडलें होतें. परंतु आतां आपले बाबा आपल्याला घेऊन जाणार, आपली इच्छा पूर्ण होणार म्हणून त्याला विशेष आनंद वाटूं लागला होता यांत आश्चर्य नाहीं.

आपला आनंद कोणापाशीं तरी व्यक्त करावा म्हणून तो जिजाबाईकडे गेला. तों त्याला आपली आई अश्रू ढाळतांना दिसली. शिवाजीनें आपल्या चिमुकल्या हातांनीं तिच्या गळ्याला मिठी मारून म्हटलें:—

" आई काय झालं तुला ? तुला कांहीं होत आहे काय ? " आजपर्यंत त्यानें आपल्या आईला अश्रू गाळतांना पाहिलें नव्हतें. जिजाबाई धूर्त होती. ती आपली मनःस्थिती आपल्या मुलाच्या कधींही नजरेस पडूं देत नसे. आज मात्र अवचित असा प्रसंग आला. तेव्हां ती सहजच गोंधळून गेली. तितक्यांत तिला काय वाटलें कोण जाणें; ती म्हणाली:—

" शिवबा, तूं लहान म्हणून इतक्यांतच तुला कांहीं गोष्टी सांगूं नयेत असा माझा विचार होता. परंतु तूं आतां विचारतोसच तर सांगतें. बाबारे, लवकरच आपल्याला आतां विजापूरीं जायचं ! शिवबा, तिकडचं आणि बाबांचं वाकडं पडण्याला हें मुसलमानी राज्य ! बाबांचा आणि तुझ्या मामांचा प्राण घेतला तो या मुसलमानी राज्यानेंच ! बाळा शिवबा, मला पकडून माझा अपमान केला तो या मुसल्यांनींच. हिंदुंचीं देवळें केव्हां उध्वस्त करूं असें यांना वाटतं. तुझ्या वडिलांनी आदीलशाही, निजामशाही व दिल्लीची पादशाही यांच्याशीं मोठ्या शौर्यानें झगडे केले आहेत. कित्येक गडही आपल्या ताब्यांत घेतले होते. त्या अपमानाचे उट्टं हिंदुंचीं देवळें पाडून व त्यांच्या परमप्रिय गोब्राम्हणांना छळून हे मुसंडे काढीत आहेत. त्यांत त्यांना भूषण वाटतें ! अरेरे, मराठ्यांच्या बायका म्हणजे यांना नुसतें खेळणें वाटावें ना ? हिंदूंचीं विटंबना करण्यांत यांची सारी अक्कल खर्च व्हावी ना ? आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, अशा रीतीनें मुसलमानांकडून छळ होत असतांना त्याचा प्रतिकार करण्याला कोणीही मराठा पुढें येऊं नये ! सर्व मराठ्यांनीं हातांत बांगड्या भरून चाललेला अन्याय निमूटपणें सहन करावा ! शिवबा, माझ्या लाडक्या शिवराया, मला जर कांहीं दुःख होत असेल तर हेंच ! माझ्या अंतरींची तळमळ ती हीच ! अशा अमानुष पाप्यांचें तोंडही पाहूं नये असें मला वाटतें. पण—पण मला वाटून उपयोग काय ? शिवबा, आपण विजापुरीं जाणार ! तेथें तर असले हिडीस प्रकार हमेश घडणार. त्या विजापूरच्या तक्ताचे आम्ही नौकर म्हणून आम्हाला त्या पापी तक्तापुढें मस्तक नमवावें लागणार ! शिवाजी, माझी तर इच्छा अशी कीं जर मस्तक नमवायचें तर तें एक महासमर्थ, महाश्रेष्ठ परमेश्वरापुढें—भवानीपुढें ! शिवबा, परवां मी तुला त्या बाळध्रुवाची गोष्ट सांगितली ना ? बाप म्हणे अर्धे राज्य देतों, तर त्या बाळानें काय उत्तर दिलें—" सगळें राज्य तो देव देईल ! " तसेंच मला वाटतें. हात जोडावे भवानीला ! रुमालानें हात जोडून यवनांच्या तक्तापुढें गुडघे टेकणाऱ्या बाबांचे प्राण कां जावें ? शिवाजी, मामंजीना देवीनें सांगितलें आहे कीं, तुझ्या कुळांत स्वतंत्र मराठी राज्य स्थापणारा दिव्य पुरुष जन्माला येईल. बाळा, तुझ्याकडून तसें राज्य स्थापन

करण्याची खटपट करून मी माझ्या मनाला त्या आशिर्वादाची वाटणारी सत्यता जगाच्या निदर्शनास आणणार आहे. पण शिवबा, त्याचा श्रीगणेशा मी तुजकडून गिरवून घेण्याचा समय जवळ आला असतांना आपणाला पारतंत्र्यांत व अयोग्य ठिकाणीं जावें लागत आहे."

बाळपणापासून, एका आईखेरीज, शिक्षण देणारें, ममता करणारें, संरक्षण करणारें, दुसरें कोणीच माहीत नसल्यानें शिवाजीला आई अत्यंत प्रिय, अत्यंत आदरणीय वाटे. आईवर त्याची पराकाष्ठेची भक्ति म्हणून तो वरील बोलणें अगदीं लक्ष्यपूर्वक ऐकत होता. अगोदरच जिजाबाईनें त्याची मनोभूमीका नांगरून ठेवल्या कारणानें त्यांत वरील भाषणानें पेरणी केल्यासारखेंच झालें. आपल्या पूज्य मातेच्या तोंडून बाहेर निघणारा प्रत्येक शब्द त्यानें आपल्या मनांत विशेष प्रकारानें ठसवून घेतला. त्या भाषणानें त्याच्या अंतःकरणावर असा कांहीं परिणाम केला कीं, त्यानें अत्यंत गूढ विचारांत गढून कांहींतरी महत्त्वाचा निश्चय केला. जिजाबाईच्या तीक्ष्ण नजरेंतून ती गोष्ट कांहीं गेली नाहीं. तें पाहून तिला अत्यंत समाधान वाटलें. आपण आपलें कर्तव्य एक तऱ्हेनें योग्य रीतीनें बजाविलें असें वाटून तिचें अंतःकरण हलकें झालें. या तिच्या कर्तव्याचा पुढें किती योग्य परिणाम झाला तें ओघानें पुढें येईलच.

लौकरच ठरल्याप्रमाणें बायकोला व मुलाला शाहाजींनीं विजापूरीं नेलें. एक दिवस ते शिवबाला म्हणाले:—

" बाळा, पोषाख करून तूं आज मजबरोबर दरबाराला चल. त्यांना कुर्निसात कर. चल त्यांना त्यांचे छोटे मानकरी भोंसले आज पाहूं दे."

यावर शिवाजी कपाळाला आठ्या घालून म्हणाला:—" मी त्या यवन बादशाहापुढें आपलें डोकें मुळींच वांकविणार नाहीं. मला त्यांची ' हां जी खावींद ' म्हणून नौकरी करण्याची कधींच वेळ येऊं नये अशी इच्छा आहे."

शहाजींना वाटलें, आहे लहान मूल आहे. त्यांतून बालपणापासून दरबारची शिस्त कधीं पाहिलेली नाहीं. आपल्याबरोबर चारदोन वेळा दरबारला आल्यावर दरबारची शिस्त याला आपोआप लागेल. असा विचार करून त्यांनीं शिवाजीला उंची पोषाख घालून आपल्याबरोबर दरबारला नेलें. वाटेनें,

शिवाजीला मी करीन तसा कुर्नीसाद कर म्हणून शिकवून ठेवायला ते विसरले नाहींत.

दरबारांत मध्यभागीं असणाऱ्या रत्नजडीत सिंहासनावर बादशाहाची स्वारी अधिष्टीत जाहली होती. डाव्या उजव्या बाजूला रणदुल्लाखां, हसनमियांखां वगैरे खान विराजमान झाले होते. त्यांत कांहीं मराठे सरदारही होते. शहाजींनी बादशाहाच्या तख्तापुढें येऊन त्रिवार लवून मुजरा केला व शिवाजीला तसें करण्याबद्दल खुणाऊन ते आपल्या जागेवर जाऊन बसले. त्यांच्या पाठोपाठ कुर्यानेंच बादशाहाकडे धीटपणें पहात ऐटींत शिवाजीची स्वारी मुजरा न करतां बापाचे शेजारीं जाऊन बसली ! दरबारांत जो तो एकमेकांशीं कुजबुजूं लागला. खुद्द बादशाहा डोळे लाल करून गरगर फिरवीत म्हणालाः—

' क्यौं शहाजी, तुमारा छोकरा हमारा अपमान क्यौं करता है ? राजदरबारकी रीत इसकू मालूम नहीं ? "

यावेळीं मुरारपंतांनीं बाजू संभाळून नेली. त्यांनीं मुजरा करून बादशाहाला म्हटलें:—

" खावींद, लहान बच्चा आहे. त्यानें अद्याप दरबार पाहिला नव्हता. पोर घाबरून गेलें असेल. "

परंतु शिवाजी मुळींच घाबरला नव्हता. कुर्निसाद करण्याची बापाची आज्ञा झाली त्यावेळीं त्याच्या मातेचे शब्द त्याला पुनः आठवले. आणि त्याच्या अंतःकरणांत दुप्पट अवसान उत्पन्न झालें.

शहाजींना मात्र त्या दिवसापाहून मुलासंबंधीं काळजी वाटूं लागली. यानंतर गोवधासारख्या गोष्टी शिवाजीच्या कानीं वरचेवर येऊं लागल्या. एके दिवशीं स्वारी रस्त्यानें चालली असतांना एका ठिकाणीं एका गाईचा वध होण्याचा समय आला. गाय दीनवाणीनें हंबरडा फोडूं लागली. तो हंबरडा कानीं येतांच शिवबा देहभान विसरून गेला. आपण कोठें आहोंत—कोणाच्या राज्यांत आहोंत याचा विचारही मनांत न आणतांना तो गाईच्या सोडवणुकीसाठीं धांवला. त्याच्या अंगीं यावेळीं विलक्षण बळ आलें होतें. तेव्हां त्यानें

गाईची सुटका तर केलीच. पण गोवध करणाऱ्याला शासनही केलें. ही भर-रस्त्यावर घडलेली गोष्ट अर्थात् सर्व शहरभर पसरली. मुसलमानांनीं, 'आज यवन बादशाही बुडाली काय' असे उद्गार काढले. शहाजीच्याही कानीं ती गोष्ट गेलीच. त्यांनीं त्याबद्दल शिवाजीला योग्य तो उपदेश केला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. उलट त्याच्या मनावर गोब्राह्मणप्रतिपालनाचा ठसा ज्यास्त स्पष्टपणें उमटला.

एके दिवशीं त्यानें एका कसायाला आपल्या अंगावरील दागिने देऊन एका गाईला सोडविलें. अशा गोष्टी वारंवार घडूं लागल्या तेव्हां शहाजीनीं विचार केला कीं, ही गोष्ट पुढे मागें आपल्याला व आपल्या मुलालाही फार जाचक होईल. शिवाय शिवाजीला असलें शिक्षण जिजाबाईकडूनच मिळत असलें पाहिजे असा त्यांनीं अंदाज केला. यामुळें तिच्यावर त्यांचा अधिकच घुस्सा होऊन या दोघांना त्यांनीं पुण्याला पाठवून देण्याचा बेत केला. त्याप्रमाणें आपला विश्वासू कारकून दादोजी कोंडदेव याला शिवाजीच्या शिक्षणासाठीं व जहागिरीच्या बंदोबस्तासाठीं बरोबर देऊन त्यांची पुण्याला रवानगी केली. तात्पर्य, जिजाबाईच्या इच्छेप्रमाणें शिवाजीचें शिक्षण हें पुनः तिच्या हातीं आलें.

त्या वेळचा काळ कोण विकट! बहुतेक मराठे सरदार हे मानासाठीं, जहागिरीसाठीं मुसलमान राजकर्त्यांच्या पुढें गोंडा घोळण्यास एका पायावर तयार असत. किंबहुना तेंच जीवितसार असें त्यांना वाटूं लागलें होतें. आपलेपणाचा अभिमान त्यांच्यातून निघून गेल्यासारखा झाला होता. सेवावृत्ती हीच आपली जन्माची इतिकर्तव्यता असें त्यांना वाटे. असल्या बहुजनसमाजाच्या विरुद्ध तिला आपल्या मुलाला शिक्षण द्यावयाचें होतें. त्यांत अनेक संकटें, आपत्ती येणार हें तिला माहित होतें. तथापि धैर्यानें, चिकाटीनें त्यास तें काम करण्याचा तिनें वारंवार उपदेश करावा, त्याला प्रोत्साहन द्यावें. प्रथम थोडा त्रास पडला. पण नंतर बरेच तरुण मावळे यांची त्यास जोड मिळाली. हें पाहून जिजाबाईला वाटूं लागलें कीं, आपले हेतू खास सिद्धीस जातील आपला शिवबा हा जहागिरदाराचा मुलगा आहे ही वेडी कल्पना तिच्या मनाला शिवली देखील नाहीं. बौद्धिक शिक्षणाबरोबर शारीरिक शिक्षणही

शिवाजीला मिळालें होतें. घोड्यावर बसणें, भालावर्चीची अचुक फेक करणें, पट्टयाचे हात फिरविणें, वगैरे युद्धोपयोगी शिक्षण शिवाजीला पूर्णपणें मिळालें होतें. तसेंच प्रत्येक गोष्ट देवीच्या आज्ञेनें करावयाची हा प्रघात जिजाबाईनें पाडला होता. आह्मां स्त्रियांचे अंगीं धर्मश्रद्धा व परमेश्वरभक्ति हे गुण नैसर्गिकच असतात; आणि बालपणापासून मातेच्याच तालमेंत तयार झाल्यानें हे गुण शिवबाच्या अंगींही पूर्णत्वानें आले होते.

भवानीच्या कृपेनें आपल्या शिवबाचें कांहींच वांकडें होणार नाहीं अशी दृढभावना असल्यानें जिजाबाई त्याला धाडसाच्या कामींही आज्ञा देई. कित्येक मावळ्यांना शिक्षण वगैरे देऊन युद्धकलेंत तयार केल्यावर आईच्या विचारानेंच तो लहानलहान छापे घालूं लागला; त्यांत सांपडतील ते खजिने लुटूं लागला. अशा रीतीनें आपल्या धर्मासाठीं, स्वातंत्र्यासाठीं, गुलामगिरींतून मुक्त होण्यासाठीं, गरीब हिंदुप्रजेला धार्मिक व आर्थिक सुख मिळावें म्हणून स्वराज्यस्थापनेसाठीं, प्रयत्न करणें यांत कोणतेंही पाप नाहीं, कोणताही अन्याय नाहीं. ही कल्पना जिजाबाईनें शिवाजीच्या मनांत बिंबविली होती. आणि याच कल्पनेचें दृश्यफल पुढें शिवबानें ‘ स्वराज्य ’ स्थापून सुराज्याची ही स्थापना केली, हें होय.

हळूहळू शिवाजीच्या पराक्रमाची वर्दी विजापूरकरांच्या व दिल्लीच्या बादशाहाच्या कानीं गेली. प्रथम त्यांनीं तिकडे दुर्लक्षच केलें. परंतु पुढें जेव्हां शिवाजीनें मुसलमानांचे किल्ले घेण्याचा सपाटा चालविला तेव्हां त्याच्या पारिपत्यासाठीं दोन्ही दरबारांतून सरदार येऊं लागले. परंतु जिजाबाईच्या सल्लामसलतीनें कोणाशीं गोड बोलून कोणाशीं लढाई करून शिवाजीनें त्या सरदारांचें कांहीं चालूं न देतां आपला स्वराज्यस्थापनेचा क्रम पूर्वीप्रमाणेंच नेटानें चालविला.

जेव्हां अशा सरदारांना पाठवून काम भागत नाहीं असें विजापूर दरबारनें पाहिलें तेव्हां शहाजीला कैदेंत ठेवून शिवाजीला निरोप पाठविला, ‘ जर तूं आमचा नौकर म्हणवून घेऊन घेतलेले किल्ले, गड वगैरे आमचे स्वाधीन करशील तरच शहाजीची सुटका होईल. नाहींतर त्याच्या जिवाची आशा तूं सोड. त्याचप्रमाणें स्वतः दरबारीं येऊन केल्या गुन्ह्यांची क्षमा माग. ’

या निरोपानें शिवाजीच्या मनाची चलविचल झाली. परंतु जिजाबाई म्हणाली:—

'शिवबा, अरे हें आपल्या मनाचें खूळ आहे. तुला दहशत बसण्यासाठीं बादशाहानें तसें लिहिलें असण्याचा संभव आहे. पण शिवबा, मी विचारतें, निजामशाहीच्या उलाढाल्यांचे वेळीं स्वतःच्या प्राणांवर थोड्या वेळां का घेतली होती ? बाबारे, त्यावेळीं ज्या भवानीनें प्राणरक्षण केलें तिला आज तें संभाळणें कठीण आहे ? बाबांच्या सारखा योद्धा मोंगली सैन्य घेऊन पाठीस लागला होता, तेव्हां काय तूंच होतास काय ? शिवाय तुझे पिते मुत्सद्दी व राजकारणपटु आहेत. तेच आपली आपण यांतून सुटका करून घेतील. तूं स्वस्थ ऐस. शिवबा तूं आज एवढ्या नांवारूपास आलेली स्वातंत्र्याची इमारत आपल्या कृतीनें ढासळूं नकोस; व विजापुरीं तर मुळींच जाऊं नकोस."

अफझुलखानाच्या वधाच्या वेळींही तिनेंच त्यास कसें वागावें याविषयीं सल्ला दिली होती. असो. यावेळींही दिल्लीच्या बादशाहाच्या मध्यस्तीनें शिवाजीनें बापाची कैदेंतून सुटका केली.

एकेवेळीं कोंडाणा किल्ला पाहून तो आपल्या शिवबाचे ताब्यांत असावा असें जिजाबाईला वाटलें. लागलीच शिवाजीला तिनें आपली मनीषा त्यांना सांगितली. यावर थोडा विचार करून शिवाजी म्हणाले:—"आई, कोंडाणा अत्यंत अवघड किल्ला. शिवाय त्यावर अत्यंत बलाढ्य असा मुसलमान सरदारही त्याचे रक्षणासाठीं राहिला आहे. तेव्हां तो कसा घ्यावा ?"

"शिवबा, बांगड्या भर. अरे, तूच कां हें बोलतो आहेस ? वीराला हें बोलणें शोभतें ना ? शिवबा, शत्रूशीं झुंज देण्यास आज तुला भय वाटतें होय ? हं टाक ती समशेर खालीं. कोंडाणा मजबूत आहे तो घेण्यास फार प्रयास पडतील हें मला माहीत नाहीं काय ? शिवबा, मी त्या किल्ल्यावर राहिलें आहे हें तूं विसरलास काय ? क्षत्रियानें असें जिवाला भिऊन कसें चालेल ? तुजसारख्या शूराचें शीर तर सदैव हातावर पाहिजे."

अशा रीतीनें वीराला साजेसें भाषण करून त्या कामगिरीवर कोणाची तरी योजना कर, व गड हातीं आलाच पाहिजे अशी जिजाबाईनें शिवाजीला आज्ञा केली. या कामीं तानाजीची योजना झाली. त्याच्या सैन्याची व्यवस्था ठेवण्याची जेवणाखाणाची, फार काय वाढण्याची कामगिरी स्वतः मातोश्री जिजाबाईनीं केली.

महाराज दिल्लीस गेले असतांना मागील सर्व राज्याचा बंदोबस्त या मुत्सद्दी व राजकारणपटु जिजाबाईनींच ठेवला होता.

कित्येक प्रसंगीं जिजाबाई न्यायनिवाडेही करीत असत. त्याप्रमाणेंच सनदा-पत्रें वगैरे करून देत असत. त्याचप्रमाणें जिजाबाई नुसत्या धोरणी, मुत्सद्दी, पापभीरू, देवभक्तच होत्या* असें नाहीं तर शूरही होत्या.†

याप्रमाणें इतिहासांत जिजाबाईनीं आपलें नांव अजरामर करून ठेवलें. त्यांना माहेरचें किंवा सासरचें सौख्य नव्हतें म्हणून केवळ अश्रू गाळीत न बसतां, आपल्या हातून जी काय महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं खटपट करतां येणें शक्य होतें ती खटपट त्यांनीं केली. व त्या खटपटींत त्यांना यशही आलें. अशा रीतीनें पुढें झालेल्या राजकारणी स्त्रीरत्नांचा कांटेरा मार्ग त्यांनीं साफ-सूफ केला.

शिवाजी महाराजांनीं अनेक लढाया मारून मदोन्मत्त मोंगलांस आपल्या बाहुबलाचा पराक्रम दाखवून त्यांची रग जिरविली. सैन्य, शस्त्रास्त्रें, अगणित भांडारखाना, हत्ती घोड्यांच्या पागा, नानाप्रकारचे कारखाने, अनेक कलाभिज्ञ लोक पदरीं ठेवून तसेंच अष्टप्रधानादि अधिकारी नेमून त्यांनीं स्वराज्य चालविलें. तथापि कांहीं दुष्टबुद्धीनें पाहणारे लोक त्यांना 'शिवाजी राजा कसला ? तो एक बंडखोर लुटारू' असें म्हणत. म्हणून जिजाबाईनीं त्यांस राज्याभिषेक करून आपल्या शिक्याची नाणीं वगैरे पाडून राज्यकारभार चालवावा अशी सल्ला दिली. श्रीसमर्थ रामदास यांच्या आज्ञेनें महाराजांना मोठ्या समारंभानें राज्याभिषेक झाला. तो झाल्यानंतर मात्र जिजाबाईना आपले सर्व मनोरथ पूर्ण झाले असें वाटून त्यांना समाधान वाटलें.

* वि. का. राजवाडेकृत म. इ. साधनें खंड १७ पान २२ खंड १८ पान ११.
† मराठी रियासत पृ. १६१.

हे दिवस पाहावयास मध्यंतरीं कित्येक अडचणी आल्या होत्या. एकदां तर अशी गोष्ट घडली कीं, आईनें शिकविलेल्या गोष्टीमुळेंच महाराजांना अगदीं लहानपणापासून कथाकिर्तनें ऐकण्याची संवय लागली होती. प्रौढपणी ते देहु आळंदीस कथा वगैरे ऐकण्यास जात. एकदां त्यांनीं तुकारामबुवांचें कीर्तन ऐकलें. तेव्हां त्यांच्या मनानें घेतलें कीं, आतां जन्मभर तपःश्चर्या व पांडुरंगाचें भजन करून देहाचें सार्थक करावें. त्याप्रमाणें स्वारी अरण्यांत गेली व ईशस्मरण करीत तेथेंच राहिली. जिजाबाईंना ही गोष्ट कळली तेव्हां त्या तेथें गेल्या व नानाप्रकारें बोध करून त्या म्हणाल्याः—

" शिवबा, विचार कर वरं ! उद्यां नांगराला जर कोणी घोडा जुंपील तर कसं वरं होईल ? शिवबा, त्यासारखी तुझी स्थिती आहे. तूंच जर असं करणार असलास तर मी तरी कशाला या खटपटींत पडूं ? "

असें जेव्हां डोळ्याला पाणी आणून त्या म्हणाल्या, तेव्हां महाराज येवढे निश्चयी पण आईबरोबर घरीं आले. इतकें त्यांच्यावर मातोश्रीचें वजन म्हणा, किंवा त्यांचें मातोश्रीवर प्रेम होतें. पुढें ज्यावेळीं शिवाजी महाराजांना राज्याभिषेक झाला तेव्हां या मागील गोष्टी त्यांच्या डोळ्यापुढें उभ्या राहिल्या. इतक्या संकटांतून, जिवावरच्या प्रसंगांतून, प्रत्यक्ष शत्रूच्या कैदेंतून निभावून मुलाच्या डोक्यावर छत्रें चामरें ढाळतांना पाहून कोणत्या मातेला आपल्या कष्टाचे सार्थक झालें असें वाटणार नाहीं ? जिजाबाईंना तसें वाटलें.

असो. महाराजांना राज्याभिषेक झाल्यावर अवघ्या पंधरा दिवसांनीं जिजाबाईंना रायगडाखालीं पाचवड मुक्कामीं देवाज्ञा झाली. महाराज तर त्या आपल्या प्रेमळ व मार्गदर्शक मातेच्या मरणानें उदास बनले. ठीकच आहे. ज्या मातेनें लहानाचें मोठें करणें एवढेंच आपलें कर्तव्य न समजतां सर्व ऐश्वर्यानें, राजवैभवानें, सद्गुणानें सर्वांत मोठें केलें त्या मातेच्या मरणानें शिवाजीमहाराजांना औदासिन्य वाटलें यांत काय नवल ?

वाचक भगिनींनों, स्त्रियांच्या हातून काय होणार असें तुमच्या मनांत येत असेल तर हें चित्र पहा—मनःपूर्वक पहा. म्हणजे तुमचेंच मन तुम्हाला प्रश्न करील कीं, स्त्रिया काय करणार नाहींत ? जिजाबाईंनीं आपल्या मुलाला मोलाचा उपदेश केला होता कीं, बाबारे, तूं दुसऱ्याची स्त्री आणि परधर्म यांच्या

वाटेस जाऊं नये; त्याचप्रमाणें त्यांनीं इतर विकट कार्यें जन्मभर कशासाठीं केलीं? तर आपल्या राष्ट्राकरितां. आपल्या देशावांचून त्यांना कांहीं प्रिय नव्हतें. आपला देश वैभवाच्या शिखरावर कसा चढेल? तो स्वतंत्र कसा होईल? याखेरीज त्यांना दुसऱ्या कशाचा ध्यास नव्हता. त्या राजमाता झाल्या तरी आपल्या दीनदुबळ्या प्रजेला विसरल्या नाहींत. त्यांनीं महाराजांना हीच शिकवणूक शिकविली, 'बाबारे, जर प्रजेला सुखांत ठेवशील तरच तुझ्या राज्याला बळकटी येईल.'

महाराजानींही मातेची आज्ञा शिरसावंद्य मानिली होती. असें प्रजेसाठीं चालविलेलें राज्य पाहून त्यांना आनंद वाटे. पुत्राला राज्याभिषेक झालेला पाहतांच त्या मातेनें आपले डोळे मिटले. जणूं काय पतिनिधनानंतर सती जाण्याचा बेत मुलाच्या आग्रहास्तव व मुलाच्या कल्याणासाठीं रहित करून त्यांनीं आपले डोळे याच एका गोष्टीकरितां उघडे ठेविले होते!

## मातृशाप.

अहाहा! आपल्या बाहुंच्या पराक्रमानें ज्यानें दिल्लीपतीलाही दहशत बसविली, युक्तिप्रयुक्तीनें वागून ज्यानें जिवाला जीव देणारा मराठा आपलासा केला, गोब्राम्हणांच्या रक्षणासाठीं व आर्यभूमीला परदास्यांतून मुक्त करण्यासाठींच ज्यानें आपला देह कष्टविला तो प्रतापशाली नरशार्दूल शिवराय आज एका मंचकावर पहुडला होता. बाजूला पतीसेवेंत तत्पर असणारी पतिव्रता सोयराबाई अश्रू ढाळीत बसली होती. आजुबाजूला इतर कारभारी मंडळी चिंतामग्न स्थितींत बसलेली होती. महाराजही मधूनमधून मंडळीशीं थोडा वेळ बोलत पुन्हां स्वस्थ डोळे मिटून पडत अशा अस्वस्थ स्थितींत होते. मध्येंच सोयराबाईकडे टक लावून पाहत व लगेच निराशा झाल्याप्रमाणें त्यांचा चेहरा होई.

"बाळाजी—" पलीकडे खिन्न होऊन बसलेल्या बाळाजी आवजी चिटणीसाना उद्देशून महाराज म्हणाले, "तुम्ही व मोरोपंत मी सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करा.—जा विलंब करूं नका. कारण कोणत्या घटकेला काय होईल याचा आतां नेम नाहीं. आतां मागील सर्व जबाबदारी तुम्हा कारभारी मंड-

ळीवर विशेषतः आहे. संभाजी कोण्या तऱ्हेचा निघेल हें दिसतेंच आहे. असो. माझी आतां मुळींच काळजी करूं नका. आपली कामगिरी पार पाडा, म्हणजे झालें. मी यांतून उठेन असें मला वाटत नाहीं."

महाराजांचे हे निर्वाणीचे उद्गार ऐकून पतीपरायण सोयराबाईंची काय अवस्था झाली असेल? त्यांना काय वाटलें असेल, त्यांच्या हृदयाची कोण कालवाकालव झाली असेल हें त्यांच्या सारख्या पतीपरायण साध्वींनाच सांगतां येईल. इतरांना त्याची काय कल्पना येणार? आणि अशा पतिनिष्ठ स्त्रियांची महाराष्ट्रांत मुळींच वाण नाहीं. आपल्या पतीला राजकारणांतही मनोभावानें साहाय्य करणाऱ्या कित्येक स्त्रिया पूर्वी होऊन गेल्या व पुढेंही होतील. पूर्वी शिवरायाच्या वेळीं किंवा त्यानंतरच्या स्वातंत्र्याच्या युद्धांत, वेळीं कित्येक स्त्रियांनीं रणांगणांत समशेर गाजवून राजकारणांतील आपली लायकी सिद्ध केलेली आहे. आजही या अनत्याचारी स्वातंत्र्याच्या युद्धांत महाराष्ट्रीय स्त्रिया आपल्या पूर्वयशाची पांढरी शुभ्रध्वजा अधीक उच्चवातावरणांत फडकावल्या-वांचून खचीत राहणार नाहींत!

असो. महाराजांचे ते शब्द ऐकून सोयराबाईच्या जिवाची अतिशय काल-वाकालव झाली. बराच वेळ त्यांच्या तोंडून शब्दच निघेना. शेवटीं इतका वेळ मोठ्या प्रयासानें दाबून ठेवलेला हुंदका बाहेर पडला! 'नका. महाराज, असं अभद्र बोलूं नका. आपल्यामागें माझी व माझ्या राजारामाची कोण हो काळजी वाहणार! महाराज, आमची अवस्था काय हो मग होणार? माझ्या लाडक्या राजानं कोणाच्या तोंडाकडे पाहावं? नाहीं-महाराज, देव असलं निष्ठुर कृत्य खाचित करणार नाहीं. आई भवानी माझें कुंकू संभाळील. तिचा वरदहस्त, श्रीसमर्थांची कृपा, सासुबाईचा शुभ आशिर्वाद, इतक्या गोष्टींचं पुण्य असतांना असं कसं होईल?" इतकें बोलून तिनें आपले डोळे पुसले, आई भवानीचें, समर्थांच्या चरणांचें ध्यान लाविलें. तोंच महाराज म्हणाले:— 'मला तुला कांहीं सांगावयाचें आहे.'

'सांगावं महाराज? आपला हात महाराजांच्या बिछान्यावर टेकून किंचित् खालीं वाकून सोयराबाई म्हणाली.

" संभाजी तर तसा बदफैली निघाला. तो माझं नांव राखील असं मला मुळींच वाटत नाहीं. तो पुढें काय काय अनर्थ या मराठी राज्यावर आणील हें मला आज स्पष्ट दिसत आहे. हर ! हर ! ! मी महाराष्ट्राची एकी करण्यासाठीं रात्रंदिवस जिवापाड मेहनत केली आणि हा कुलांगार त्या एकीच्या साखळीचा प्रत्येक दुवा वेगळा करणार ! त्या कुलांगाराला राज्य मिळूं नये असं मी प्रधानांना सांगितलं आहेच. मी राज्याची सारी भिस्त कारभारी मंडळीवरच सोंपविली आहे. माझा राजाराम नांव राखण्यासारखा आहे पण तो लहान आहे. तेव्हां तूं वीरमाता आहेस तर राजारामावर सक्त नजर ठेव. कारभारी मंडळीच्या सल्ल्यानें माझ्यामागें वाग. माझ्यासाठीं नुसतें अश्रू ढाळले म्हणजे तुझं कर्तव्य संपलं असं नाहीं. वरं, माझ्याबरोबर चितेंत स्वतःला जाळून घेणं हाही पतिव्रतेचा धर्म नव्हे. पतीचं प्रिय करण्यासाठीं त्याचं अर्धं राहिलेलं कार्य पुढं नेटानं चालविणें हें तुझं कर्तव्य आहे. माझा बाळ राजाराम गुणी आहे, तो नांव राखील–पण त्याबद्दल आतां जास्त मी सांगत नाहीं–कारभारी मंडळी आपल्या सर्वांच्या विचारानं काय तो योग्य मार्ग स्वीकारतीलच. तूं मात्र त्यांना त्यांच्या कार्यांत मदत कर. एवढंच तुला शेवटचं सांगणं आहे..."

" महाराज, पती देवा, ही पहा मी आपल्या पायांची शपथ घेऊन सांगतें कीं, आपली ही आज्ञा–हें अखेरचं सांगणं शिरसावंद्य मानीन. आपण अगदीं निष्काळजी असा." असें म्हणून तिनें आपला हात महाराजांपुढें केला. महाराजांनीं तो प्रियपत्नीचा हात स्वतःच्या हातीं धरला. त्यांच्या चेहऱ्यावर पत्नीच्या आश्वासनानें किंचित् काळ समाधानाची छटा उमटली. ही समाधानाची छटा शेवटचीच होती. कारण थोड्याच वेळांत महाराजांचा पुण्यात्मा शिवलोकीं निघून गेला !

पुढील एकंदर कुटुंबांत पसरलेल्या शोकसागराचें वर्णन काय करावें ? सोयराबाई तर त्याच क्षणाला हंबरडा फोडून बेशुद्ध झाली. वडिलांची व आईची ती अवस्था पाहून छोटा राजाराम मोठमोठ्यानें हुंदके देऊं लागला. आजूबाजूची मंडळी ही, दुःखानें कांहीं वेळ तरी किंकर्तव्य मूढ होऊन गेलीं.

पण असें सर्वांनींच बसून कसें चालणार ? शेवटीं मुख्य कारभारी मंडळींनीं शोक आवरून इतरांचें सांत्वन केलें. व पुढील महाराजांचा अंत्यविधी फारसा बभ्रा होऊं न देतां रितीप्रमाणें उरकून घेतला.

परमेश्वराची करणी खरोखर अघटित आहे ! दुःखद विचारानें वेडा होणारा मनुष्य, प्रसंगीं स्वदेहाला कंटाळून त्याचा त्याग करावयाला देखील तयार होणारा मनुष्य तो दुःखदायक प्रसंग निघून आतांच काळाच्या प्रवाहांत वाहत जातां जातां त्या प्रसंगाची व दुःखाची आठवणही विसरून जातो. व पुनः या जगाच्या रहाटगाडग्याला जुंपला जातो !

हळूहळू सोयराबाईंना झालेल्या दुःखाचा विरंगुळा पडत चालला. तशी त्यांना पतीच्या शेवटच्या शब्दांची आठवण होऊं लागली. व आपल्या कर्तव्याची जाणीव त्यांच्या हृदयांत जागृत झाली. एकंदर कारभारी मंडळींचीही आपापसांत खलबतें सुरू झालीं. महाराजांनीं आपल्या मागें स्वराज्याची सर्वस्वी जबाबदारी कोणाच्या एकट्याच्या हातीं न ठेवतां अष्टप्रधानांच्या मर्जीवर ती सोंपविली होती. कारण उघडच होतें. युवराज संभाजी नालायक आहे हें त्यांना कळून चुकलेंच होतें. महाराजांना माणसाची पारख चांगलीं होती. आणि म्हणूनच त्यांनीं संभाजीला कैदेंत ठेविलें होतें. परंतु एवढाही बंदोबस्त करून आपल्या मागें राज्य सुरळीत चालेल अशी त्यांना खात्री वाटत नव्हती. कांहीं कांहीं विशेषतः सेनापती वगैरे मंडळी संभाजीवरील लोभामुळें त्याला मिळतील व कांहीं मंडळी त्याच्या विरुद्ध राहणारच व अशा रीतीनें राज्यांत दुफळी होणार हें महाराजांना कळून चुकलें होतें. हें त्यांच्या अखेरी अखेरीच्या उद्गारावरून स्पष्ट दिसतें.

संभाजीला गादी मिळूं नये अशी खुद्द महाराजांची इच्छा होती. बरं, राजारामाला गादीवर बसवून राज्यकारभार चालवावा अशी स्पष्ट आज्ञा त्यांनीं कारभारी मंडळींना केलेली कोठें आढळत नाहीं. शेवटीं प्रधान मंडळींनें एकंदर धोरण बांधून राजारामाच्या नांवानें राज्य चालविण्याचें ठरविलें. सोयराबाईलाही त्यांनीं तसें कळविलें. व त्याप्रमाणें पुढील व्यवस्थेला मंडळीं लागली. परंतु भवितव्यता निराळी होती ! महाराजांच्या निधनाची बातमी

शेवटीं पन्हाळगडावर संभाजीच्या कानीं गेलीच. मंडळींनीं आपणापासून ही बातमी इतकें दिवस गुप्त ठेवली व राजारामाला गादीवर बसविण्याचा बेत केला हें ऐकून संभाजीचा क्रोध अनावर झाला ! महाराजांनीं भाकीत केल्या-प्रमाणें कांहीं मंडळी सोयराबाईच्या पक्षांतून फुटून संभाजीला मिळाली व आपसांत दुही झाली. संभाजी अर्थातच बंधमुक्त झाला. त्यानें यावेळीं आपल्या स्वभावानुसार अत्यंत उग्र स्वरूप धारण केलें. महाराजांच्या वेळच्या सर्व स्वामिभक्त लोकांवर संभाजीचा दांत होता. त्यांचा सूड उग-विण्यास त्यानें सुरवात केली. आज काय अमक्या किल्लेदाराला कैद कर. उद्यां काय तमक्या किल्लेदाराला अंधार कोठडींत घाल–कोणाला देहांत शासन दे. कोणाचे डोळेच काढ–कोणाला हत्तीच्या पायाशीं दे. अशी अनन्वीत कृत्यें संभाजी करूं लागला. ज्या नरवीरांनीं महाराष्ट्राला स्वतंत्र करण्याच्या कामीं आपल्या हाडाचीं काडें केलीं होतीं, वेळीं रक्ताचे पाट वाहविलें होते त्या नरवीरांवर असा भयंकर प्रसंग आज ओढवला होता. परमेश्वरी इच्छा ! दुसरं काय ?

संभाजीचा सर्व रोष सोयराबाईवर होता. हें सर्व कारस्थान तिनेंच रचिलें असलें पाहिजे असें त्याच्या मनानें पक्कें घेतलें होतें. राज्यलोभानें,–स्वताच्या मुलाला राज्य मिळावें म्हणूनच सोयराबाईनें प्रधानमंडळांकडून रिवाजा-प्रमाणें महाराजांचा अंत्यविधी उरकून घेऊन आपणाला ही बातमी बिलकूल कळविली नाहीं. याबद्दल त्याला सोयराबाईचा अत्यंत संताप आला होता. त्यानें सोयराबाई व राजाराम या उभयतांना कैद केलें. तेवढेंही करून त्याचें समाधान होईना. सोयराबाईविषयीं त्यास विश्वासच मुळीं वाटेना.

संभाजीनें एक दिवस बंदिवान् सोयराबाईला आपल्या समोर आणविलें. व तिला तो म्हणाला:—" पहा, आज तूं व तुझा मुलगा माझ्या कैदेंत आहां. मी काय वाटेल तें तुमचें करूं शकेन. तूं या राजकारणाच्या उला-ढाली करण्याचें धाडस कां केलंस ? त्याचं प्रायश्चित्त तुला बंदिवासांत राहून भोगलंच पाहिजे. किंवा यापुढें कोणत्याही भानगडींत पडणार नाहीं असं कबूल कर.—याबद्दल हमी दे. तर कदाचित् मी तुला बंधमुक्त करण्याचं

पाहीन. आणि आपलाच हट्ट तुला चालवायचा असेल तर–तर तुला आपल्या जिवाची आशा सोडली पाहिजे ! बोल, तुला कोणती गोष्ट कबूल आहे?"

बराच वेळ सोयराबाईच्या तोंडून अपमानानें व रागानें शब्द निघेना. हा वेळपर्यंत तिनें आपला सात्विक क्रोध आवरून धरला होता. पण संभाजीचें एकंदर वर्तन पाहून आज तिनें त्याची कानउघाडणी करण्याचा निश्चय केला:–

" संभाजी, आज तुझे डोळे फिरले आहेत ! मी जें करीत आहे तें तिकडची आज्ञा म्हणून. रे अधमा, तूं आज जो स्वामिभक्तांच्या आहुतींचा यज्ञ आरंभिला आहेस तो तुझा सर्वनाश केल्यावांचून राहणार नाहीं. आज ज्या स्त्रियांना तूं धाय मोकलून अश्रू ढाळावयास लावीत आहेस तेच अश्रू तुझ्या नाशाला कारणीभूत होतील. [कारण पतिव्रतेचे अश्रू जमिनीवर फुकट पडत नसतात !] विचार कर–अजून शुद्धीवर ये. तुझें हें वर्तन पाहून आर्यभूमीला स्वातंत्र्य देणारे तुझे पिते स्वर्गात तुला काय म्हणत असतील ? महाराज जिवंत असतांना त्यांना तूं त्रास दिलासच पण आतां तरी हीं अधमपणाचीं कृत्यें सोडून दे, व त्यांच्या आत्म्याला संतोषीत कर..."

" बस्स. पुरे कर तुझी ही वाचालपंचविशी ! महाराजांना संतोषीत करण्याच्या गोष्टी तुझ्या तोंडांत कशाला ? महाराजाविषयीं तुला कितपत काळजी होती ? त्यांच्या मरणाची बातमी जर ते केवळ दुखणेंच येऊन वारले तर गुप्त ठेवून त्यांचा अंत्यविधी गुपचीपपणें उरकण्याचें कारण काय ? तूं, या सर्व गोष्टीला तूंच कारण आहेस–तुझा राज्यलोभ कारण आहे !

' संभाजी, राज्यलोभ तुला आहे. मला नाहीं. मी केवळ महाराजांची आज्ञा पाळीत आहें. महाराजांना तसं वाटतं तर त्यांनीं तुला पन्हाळगडावर कैदेत कशाला ठेवलं असतं ? स्वतःच्या अनन्वीत कृत्यांवर पांघरूण घालण्यासाठीं तूं माझ्यावर राज्यलोभाचा आरोप करीत आहेस. तुझ्याभोंवतीं तुझ्या हितशत्रूंचं जाळं पसरलं आहे. त्या जाळ्याचे धागे तोडून बाहेर पडण्याचं तुझ्या अंगीं मानसीक सामर्थ्य नाहीं ! पहा, संभाजी अजून विचार कर–अजून वेळ गेली नाहीं तों सावध हो. आपलं वर्तन सुधार......थांब, मला बोलतांना अडवूं नको–माझं म्हणणं नीट ऐकून घे–मग माझ्या प्राणांचें

वाटेल तें कर–त्याची मला पर्वा नाहीं!' संभाजी, मी राज्याचा एकटा मालक. मी किंवा माझे बगलबच्चे करतील ती पूर्व दिशा! ही तुझी घमेंड व्यर्थ होय. संभाजी, सासुबाईंनीं तिकडे नेहमीं काय उपदेश करावा? राज्य हें प्रजेच्या हितासाठीं राजानं चालवायचं! पारतंत्र्यातून ज्यांनीं हें राज्य सोडविण्यासाठीं आपले प्राण अर्पण केले त्या प्रजेच्या लोकनायकांचा अर्थात् सर्व प्रजेचा त्या राज्यावर अधिक हक्क आहे. तो हक्क हिरावून घेण्याचा अधिकार कुणालाही नाहीं. महाराजांच्या निधनामुळें प्रजेनें गाळलेले अश्रू अद्याप सुकले नाहीत तोच तूं ही कत्तल आरंभलीस–या तुझ्या अमानुषपणाला काय म्हणावें? तुला राज्य पाहिजे ना? खुशाल घे. पण पूर्वीच्या कारभारी मंडळींच्या सल्ल्यानं तें प्रजेच्या हितासाठीं म्हणून चालव."

"मी वाटेल तसं राज्य करीन. माझा मी मुखत्यार आहें. जुनी कारभारी मंडळी मला सल्ला देणार काय? आजपर्यंत त्यांनीं मला कोठडींत बसून राहण्याची फार चांगली सल्ला दिली!–पण जाऊं दे त्या गोष्टी. त्यांचं व माझं मी पाहून घेईन. तुला माझं म्हणणं कबूल आहे कीं नाहीं याचं मला उत्तर पाहिजे. नाहींतर—

"नाहींतर काय? माझा जीव घेशील एवढंच ना? ही पहा मी मरणाला एका पायावर तयार आहे. तुला ताळ्यावर येण्याची बुद्धी अजून होत नाहीं हें तुझं दुर्दैव होय. प्रजेच्या हिताचा प्रयत्न करीत असतांना–महाराजांची शेवटची आज्ञा पाळीत असतांना मला मृत्यु आला तर त्याबद्दल मी मुळींच दुःख मानणार नाहीं–उलट त्याबद्दल मी आनंदच मानीन."

"बस–बस; तुला माझं म्हणणं कबूल नाहींना? न्यारे, हिला–या मगरूर स्त्रीला त्या कोनाड्यांत नेऊन उभी करा—"

"नाहीं–संभाजी, मी तुझ्या म्हणण्याला साफ कबूल नाहीं." एवढें सांगून तिनें पतीचें चिंतन चालविलें. तिच्या डोळ्यांतून टपटप अश्रू गळूं लागले. ते अश्रू भीतीमुळें आलेले नव्हते. ते अश्रू ब्रह्मानंदाचे, पतीच्या दर्शनाचे होते. अशा आनंदांत ती मग्न असतांना संभाजी एकदम ओरडून म्हणालाः—

‘ पहा, जिवाची जरूरी असेल तर शुद्धीवर ये व माझं म्हणणं कबूल कर. नाहीतर एकदा शेवटला चिरा बसविला कीं, प्राणांची आशा व्यर्थ !’

“ चांडाळा ! कशाला मला त्या ब्रह्मानंदांतून जागं केलंस ? मी तुला तिनतिनदां सांगितलं ना कीं, तूं वाटेल तें कर पण माझं म्हणणं मी कालत्रयींही माघारं घेणार नाहीं ! तुझा विनाश काल जवळच आलेला आहे तेव्हां तुला दुष्टाला विपरीत बुद्धि झाल्यावांचून कशी राहील ? पण संभाजी, माझे शेवटचे शब्द पक्के लक्षांत ठेव–तूं ज्या राज्यलोभानं देशभक्त वीरांचा छळ केलास, त्यांचं रक्त या जमिनीवर शिंपडलंस, ती ही राजलक्ष्मी तुझ्यासारख्या पाप्याला कधींही लखलाभ होणार नाहीं ! आणखी आज ज्या क्रूरपणानें तूं लोकांचे प्राण घेतलेस त्याच रीतीनें त्यापेक्षांही अमानुष क्रूरतेनं माझे प्राण घे मात्र त्याचा जाब देवाघरीं तुला विचारला जाईल. ”

‘ आईसाहेब, माझ्या जावाजी काळजी आपल्याला नको. आपण प्रत्यक्ष पतीचे प्राण राज्यलोभानं घेतलेत त्याचा जाब देण्याची तयारी करा. कारण तूं कांहीं या राज्याच्या ढवळाढवळीपासून अलिप्त राहणार नाहींस तेव्हां माझंही काम मला केलं पाहिजे. ’

‘ चुप बस. कुलांगारा, तुला राज्याच्या राक्षसी महत्वाकांक्षेनं बेभान केलें आहे. अधमा, मी महाराजांचे प्राण घेतले असें म्हणणारी तुझी ती जीभ झडत कां नाहीं ? तुझ्यापाशीं कांहीं पुरावा असेल नाहीं ? बाबारे, पतीसाठीं– मृतपतीसाठीं स्वप्राणांची आहूती देणाऱ्या स्त्रिया मागें होऊन गेल्या आहेत– सध्या आहेत, व पुढेंही होतील. बाबारे, पातिव्रत्याच्या बाबतींत महाराष्ट्रांतीलच नव्हे तर हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतच्या भागांत अशा अगणित पतिव्रता सांपडतील कीं, त्या सर्व जगाच्या गुरुस्थानीं शोभतील. अशी ही आर्यभूमी आहे. तिच्या पोटीं पतीचे प्राण घेणारी स्त्री निपजणें, आणि तीही शिवप्रभूंची राणी ! छे ! तुझें डोकें ताळ्यावरच नाहीं. संभाजी, मग महाराजांना माणसांची परीक्षाच नव्हती तर ? अरे, त्यांनीं तुला ओळखलें आणि मला ओळखलें नाहीं असं का तुझं म्हणणं ? तूं म्हणतोस तशी मी असतें तर त्यांनीं तुला पन्हाळ्यावर तसं मला विशाळगडावर नसतं का अटकेंत

ठेवलं ? अरेरे ! काय भयंकर आरोप हा ! संभाजी, तूं जो स्वामिभक्तांच्या आहुतींनीं यज्ञ आरंभिला आहेस त्यांत माझी पूर्णाहुती दे. पण हा आरोप लादून त्यावर पांघरूण कां घालतोस ? मी मरणाला मुळींच भीत नाहीं. मी वीरस्नुषा आहें. वीरपत्नी आहें. वीरमाताही खास आहें. पण अरेरे, अपराधी-महाराजांचा खून करणारी-खुनी म्हणून मला मरण ! छे ! अंगाची आग होते ! मन भडकून जातें. पूर्वजन्मीं मी कोणतें पातक केलें होतें कीं, या नीचानं असा आरोप ठेवून माझा नाहक प्राण घ्यावा ? हो-बरोबर. महाराज, मी एक मोठा अपराध केला. याच जन्मीं केला. पती देवा ! आपण आजारी तेव्हां आपल्या पश्चात् हा दिवटा पुढं माझ्या निष्कपट बाळाला नाना तऱ्हेनें छळील म्हणून एकदां, ' राज्याची काय ती वाट लावून ठेवावी; निदान राज्य तरी वाटून द्यावं. ' असं मी बोललें होतें. अगबाई ! त्या वेळीं आपणास तें माझं बोलणं आवडलं नाहीं. कपाळाला आठ्या पडल्या. चेहरा चिंताक्रांत दिसूं लागला. पती देवा, आपण मला दुसरी कसलीही शिक्षा न करतां अबोला धरून ती प्रकट केली. पण कितीग बाई स्वारीचं अंतःकरण मृदु ! मी त्या बोलण्याच्या पापाबद्दल जेव्हां पश्चात्तापगंगेंत सुस्नान केलं-पावन झालें, तेव्हां आपला सर्व राग गेला आपण मला क्षमा केली. व शेवटच्या दुखण्यांत मला सान्निध्य तरी मिळले. त्या पापाबद्दल तर हें प्रायश्चित्त नव्हे ना ? होय. त्या खेरीज मी कधींही महाराजांचें मन दुखविलं नाहीं. पण त्याबद्दल मला माझ्या पतीदेवांनीं क्षमा केली ना ? मग आतां कुठला देव मला शिक्षा करणार ? हो. पण असें असेल ! संभाजीच्या पापाचा घडा माझ्या वधानं भरणार असेल ! दे बाबा, तुला ठाऊक असेल नसेल तशी कठोर शिक्षा मला दे. संभाजी, राज्यलोभानं कैकईनें रामाला वनवासाची वाट दाखविली. पण तूं राज्यलोभानं मला स्वर्गाची वाट दाखवीत आहेस ! कालांतरानें कांहीं गोष्टी अशाच विपरीत होतात. त्यावेळीं सावत्र आईनं मुलाला वनांत पाठविलं आणि आज तूं सावत्र मुलगा मला स्वर्गांत पाठवीत आहेस ! मात्र तुझें काळीज उलटें म्हणून तूं मजवर पती हत्येचा भयंकर आरोप ठेवीत आहेस. महाराजांचा वध म्हणजे ढेंकूण पिसवांच्यासारखा समजतोस वाटतं ? '

'मी कांहीं समजो! आईसाहेब, आतां अघळपघळ कशाला बोलता? त्या राम-कैकईच्या गोष्टी कशाला? अहो, तो खुळा राम-अंगांत तर कांहीं राम नव्हताच-तो नामधारी राम बापाच्या आज्ञेसाठीं म्हणे वनांत गेला! त्यानं राज्यावर लाथ मारलीन्! मी संभाजी त्या रामा-सारखा खुळचट नाहीं. माझ्या मार्गांत आडव्या येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मी अशाच रीतीनं नाहींसं करीन. माझा हितकर्ता, माझ्या मनाप्रमाणं वागणारा, मग तो हिंदु असो वा मुसलमान असो, कोणीही असो-तो माझ्या कृपेला पात्र आहे. त्या कबजीला नाहीं मी प्रधान केला? तेंच तूं आई असलीस तरी तुझे प्राण घेण्याला मी कमी करणार नाहीं. त्या रामानें म्हणे अपराधी आईचा वध लक्ष्मणाला करूं दिला नाहीं. मी-मी त्याकरतां नसला तरी तुझ्यावर आरोप करीन. पतीचे प्राण घेण्याचा आरोप तुझ्यावर मी ठेवीन.'

संभाजीच्या तोंडून पुनः पुनः त्या भयंकर आरोपाचा उच्चार होतांच सोयराबाईचा क्रोधाग्नी प्रज्वलीत झाला. त्यांचें देहभान हरपलें. संतापातिशयानें त्यांच्या डोळ्यांतून जणूं ठिणग्याच बाहेर पडत आहेत असें वाटूं लागलें. कंपीत आवाजानें त्या म्हणाल्या:—

"तुझ्या नशिबींच मातृशाप असल्यास तो कसा टळेल? ऐक. मूर्खा, ऐक. मजवर नीच आरोप लादणारी ही तुझी जिव्हा प्रथम नाहींशी करून क्रूरतेनें तूं मला ज्या क्रूरतेनें-भयंकर शिक्षा करशील त्याच क्रूरतेनें किंवहुना त्याही-पेक्षां अमानुषपणानें तुझे प्राण—"

हाय! हाय! पुढील शब्द तिच्या तोंडून बाहेर पडलेच नाहींत! संभा-जीनें शेवटचा चिरा बसवून टाकला! एका सतीची आहुती संभाजीच्या क्रो-धाला बळी पडली. सती सोयराबाईनें स्वराज्यासाठीं स्वप्राणांची संभाजीच्या क्रोधाग्निला आहुती दिली पण दुष्टाच्या शब्दाला मान वाकविली नाहीं! केवढें हें धैर्य! केवढी ही स्वराज्याविषयींची तिची कळकळ! अशा धैर्य-वान् स्त्रिया, असल्या तेजस्वी स्त्रिया या महाराष्ट्रांत स्वराज्याच्या वेळीं-स्वा-तंत्र्य रक्षणाच्या वेळीं आपल्या अलौकिक कृत्यानं तोंडांत बोट घालावयास लावीत होत्या! असल्या स्त्रियांची परंपरा अखंड वाहणाऱ्या झऱ्याप्रमाणें

सतत या देशांत चालू राहिली पाहिजे तरच देशोन्नतीचा मार्ग आपण नीट चोखाळल्याप्रमाणें होईल. सती सोयराबाईनें हा मार्ग आपणा स्त्रियांना स्पष्ट-पणें दाखविला आहे.

असो. शेवटीं सोयराबाईनें भाकीत केल्याप्रमाणें संभाजीच्या कारकीर्दीत प्रजेला अत्यंत हालअपेष्टा भोगाव्या लागल्या. संभाजीच्या कलुषासारख्या हलकट सल्लागारांनीं तर संभाजीच्या नांवावर प्रजेला अत्यंत सतावून सोडली. जिकडे तिकडे बेबंदशाही माजली. मद्यपान तर संभाजीला अत्यंत प्रिय होऊन तो दिवसभर त्याच धुंदींत राहूं लागला. अशा गैरसावधपणांत तो मुसलमानांकडून पकडला गेला. व औरंगजेबानें त्याचा अत्यंत क्रूरपणानें वध केला. सतीच्या व देशभक्तांच्या—छळाचें प्रायश्चित्त संभाजीला पूर्णपणें मिळालें !

# प्रभु वीरांगना बेलवाडीकर ठाणेदारीण
# सावित्रीबाई.

" काय बरं होतय् आपल्याला ? तोंड कसं अगदीं उतरून गेलंय. "

एका शोभिवंत महालांत लोडाशीं टेकून विचारांत गढून गेलेले एसप्रभू बसले होते. त्यांच्याकडे पहात आपला सुकुमार गोंडस हात लोडावर ठेवून त्यांच्या लाडक्या पत्नीनें वरील प्रश्न केला.

" कांहीं विशेष नाहीं. परंतु कांहींतरी संकट येणार अशी आज बातमी आली आहे. "

" मग हें काय बरं, मला नाहींका ती सांगण्या जोगी ? " हिरमुसलें तोंड करून सावित्रीबाई म्हणाली.

एसप्रभूंना आपल्या पत्नीबद्दल अभिमान वाटे. तसेंच त्यांचें तिच्यावर अकृत्रिम प्रेमही होते. तिचा तो सुंदर व आनंदी चेहरा पाहून त्यांना क्षणभर आपल्या चिंतेचें विस्मरण पडलें. तिची कांहीं तरी थट्टा करावी म्हणून चेहरा गंभीर करून ते म्हणतातः—

" अंहः आपल्याला सांगण्यासारखी तर गोष्ट नाहींच. परंतु मी ह्मणतो सांगितली तरी आपण काय करणार ? देवी सावित्रीचें नांव मात्र आपण घेतलं आहां. तिनें स्वसामर्थ्यानें व युक्तीनें आपल्या नवऱ्याचे प्राण परत आणिले. पण आपण तर आलेल्या संकटांतूनही सोडवूं शकाल असें कांहीं आम्हाला वाटत नाहीं. "

" ती साक्षात् देवी होती बरं देवी ! आणि मी कुठं म्हणते आहे कीं मी शाहाणी आहे म्हणून ? मी इकडे मुळींच शोभण्यासारखी नाहीं. पण आतां काय, पदरीं पडलं आणि पवित्र झालं ! मी पण आधीं लुब्रेपणीं विचारलंच कशाला ? माझ्यापाशीं कांहीं सांगण्याजोगी माझी योग्यताच कुठं आहे मुळीं !

नाहींना सांगायचं ? नाहींना ? मग मी आपली जातेंच कशी. " असें म्हणून रागानें किंचित् त्या गोऱ्या तोंडावर लालीची झाक मारते आहे, कपाळावर लहानशा दोन आठ्या पडल्या आहेत, डोळे जरा वक्र होऊन पहात आहेत, अशी सावित्रीबाईंची मोहक मूर्ती खरोखरच उठून चालूं लागली.

तिला खराखुरा राग आला होता काय ? छे; तो प्रेमाचा राग होता. अशा रीतीनें ती दोनचार पावलें पुढें गेली खरी. पण ते बेटे डोळे मागें हळूच चोरनजरेनें एसप्रभूकडे पहात होते. ते कांहीं पुढें पहातना. खोटाच कां होईना पण राग आल्यानें आपल्या पत्नीची एक प्रकारें खुललेली मुखचर्या पाहून एसप्रभू म्हणाले:—

" या पहा हल्लींच्या पतीव्रता ! नवरा इकडे काळजींत तर त्याच्यावर रागावून रुसून त्याला एकटा टाकून चालल्या ! पहाग बाई सावित्री तुझं नांव धारण केलेली ही सावित्री आमच्यावर रुसून चालली. आणि तूं तर पतीच्या शवालाही सोडून जाण्याचें नाकारिलेंस. याहो, सरकार परत या. "

" जा मेलं, मला कांहीं सांगायचं नाहीं नी कांहीं नाहीं. उलट तूं अशी नी तूं तशी, ह्मणून मात्र चिडवायचं. पुरुषांना कनी बायकांच्या प्रेमाची, त्यांच्या कोंवळया अंतःकरणाची कल्पनाच नसते. मी मला काय झालं तें सांगायचं असलं तर परत येतें. नेहमीं तेवढं ह्मणायचं बरीक–"

' काय म्हणायचं ? तूं शहाणी. तुझ्यापासून मी कांहीं लपवीत नाहीं. आपल्या सद्गुणानं माझं मन आपल्या पुरं पुरं ताब्यांत घेतलं हेंच ना ?'

" नाहीं. बायका म्हणजे अर्धांग. "

" मग आतां तरी मी नाहीं म्हणून कुठं म्हणतो ? वेडी, अगदीं वेडी. एवढी थट्टासुद्धां कळूं नयेना ? खरोखरच सद्गुणी स्त्रीही पुरुषाची अर्धें अंगच नव्हे, अर्धें मन, अर्धाच नव्हे तर सगळा जीव आहे. मला बोवा मोठं नवल वाटतं तें या रागोबाचं ! ही स्त्रीजात नसती तर या रागाला कुठं स्थळ मिळतं कोण जाणे ! "

" पुरुषांना कमीच असेल नाहीं का ? "

" असतो. पण त्याचें वास्तव्य पुरुषांच्या नाकाच्या शेंड्यावर नसतं. खेरीज पुरुष रागावला तर त्याचा राकट चेहरा जास्तच राकट दिसावयाचा. याच्या उलट राग आल्यावर आपल्या सारख्या सुंदर बायकांचा मुखचंद्रमा त्या रागानें जास्तच मोहक दिसतो ! "

" पण मला सांगायचं ना ? "

" होय. पण ती कांहीं आनंदाची बातमी नव्हे. आज महाडाहून कांहीं लोक आले. त्यांनीं बातमी आणली आहे कीं, दादजी रघुनाथ प्रभू महाडकर हा या आपल्या बल्लारी भुईकोट किल्ल्यास येऊन वेढा देणार. हल्ली किल्ल्यावर दाणावैरण, शस्त्रास्त्रें, दारूगोळा वगैरेची भरपूर बेगमी नाहीं. यामुळें किल्ला कसा झुंजवावा याची चिंता वाटते. का आपला किल्ला खालीं करून देऊन मोकळं व्हावं ? "

" कां पण असा भागुबाईपणा कां ? आपल्यासारख्या वीराला हें बोलणं शोभतं कां ? आहे ही सामुग्री काय थोडी आहे ? नाहींतर तावडतोब स्वार पाठवून दादाला ही बातमी कळवावी. त्याची मदत येण्यापूर्वी वेढा पडला तर मग इलाज नाहीं. पण आपली सामुग्री किती महिने पुरेल ? "

" पुरेल चार महिने. परंतु त्याचा काय नेम; यापेक्षां जर वेढा उठण्यास दिवस लागले तर उपाशीं तडफडत मरावं अगर शत्रूला शरण जावें."

" शरण ! शत्रूला शरण ! अशक्य ! त्यापेक्षां बेहेत्तर आहे त्याच्याशीं झुंजतांना प्राण गेले तर !"

" शाबास ! वीरांगने शाबास ! याचें नांव पत्नी ! अशाच पत्नीला मंत्री ही संज्ञा ज्ञात्यांनीं दिली आहे. माझा विचार असाच ठरला होता. जिवांत जीव आहे तों शत्रूला हार न जातां किल्ला झुंजवायचा. "

" दादाला पाहिजे तर मदतीला बोलवावं."

" छे, छे, मला वाटत नाहीं त्याचा कांहीं उपयोग होईलसें. कारण हा सैतान लौकरच येईल असें नक्की कळलें आहे. सैन्य आहे भरपूर. आपण आपलें तयार असावें म्हणजे झालें. बरं तर आम्ही आतां सैन्याच्या पाहा-

र्णाला व इतर बंदोबस्ताला लागतो," असें म्हणून ते उठले. सावित्रीबाईही आपल्या अंतःपुरांत गेल्या.

* * * * *

प्रेमकथा, हरिकथा या कथांच्या तोडीची युद्धकथा नाहीं असें कोण म्हणेल? वल्लारी किल्ल्यावर त्या दिवशीं कोण घांदल! तो रणदुंदुभींचा नाद ऐकून सर्व वीरांचीं अंतःकरणें रणमदानें बेहोष झाली होती. किल्ल्याखालच्या वेढ्याची पहाणी जो तो बुरुजावरून करी. त्या योगानें त्या रणयोद्ध्यांचे बाहु स्फुरण पावत. ठरलेल्या जागीं भराभर सर्व लोक गोळा झाले. प्रत्येकाच्या तोंडावर अपूर्व उत्साह दिसत होता. आजचा दिवस अत्यंत महत्वाचा होता. कारण आज दोन अडीच महिने होऊन गेले. दादजीनें किल्ल्याला वेढा दिला होता. व त्या येसप्रभूनें त्या शिवाजीच्या सरदाराला दाद न देतां तो किल्ला शौर्यानें लढविला होता. परंतु आतां किल्ल्यांत कोंडलें गेल्यामुळें सैन्य कंटाळलें होतें. तथापि, अद्याप शत्रूची डाळ शिजली नव्हती. दादजी आपल्याकडून रोज युक्त्या प्रयुक्त्या करीतच होता. परंतु वरचे लोक त्याचें कांहीं चालूं देईनात, व दादजीला वर जावयाला मार्ग मिळेना. किल्ल्यांतील लोक अत्यंत विश्वासू, स्वामीनिष्ठ यामुळें फंदफितुरी वगैरे उपाय चालणें शक्यच नव्हतें. असो.

आजही सर्वांनीं लढण्याची शिकस्त केली. किल्ल्याच्या एका बाजूला सैन्य जरा कमी होतें. तेथें सुरुंग लावून किल्ल्याचा तट पाडण्याचा खालील लोकांनीं प्रयत्न चालविला. दादजी स्वतः दुसऱ्याच बाजूला नेटानें लढत होता. हेतु हा कीं, आपल्या बाजूला प्रमुख योद्ध्यांचें लक्ष लागून तिकडे तट पाडणाऱ्या लोकांना सुलभ पडावें. त्याप्रमाणें सुरुंग उडून तटाचा थोडासा भाग ढासळलाही.

किल्ल्यावरचे लोक कांहीं कच्च्या गुरुचे चेले नव्हते. त्यांनीं ताबडतोब तोफा डागून असा मारा केला कीं, यंव! ताबडतोब त्यांनीं पडलेला भाग चपलतेनें बांधून काढून वर चढणाऱ्या लोकांवर दगडांचा असा मारा केला कीं, बहुतेक लोक अर्धमेले झाले. अशा रीतीनें त्या दिवशीं दादजीला यश आलें नाहीं. आणखी पंधरा दिवस झाले तरी वरच्या लोकांनीं दाद दिली

नाहीं. मग मात्र दादजी चिंतातूर झाला. कारण आज वेढा देऊन तीन महिने होऊन गेले होते. तरी काडीचा लाभ झाला नाहीं. शेवटीं त्यानें फंद-फितुरी करण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें तो त्या उद्योगाला लागला. किल्ल्या-वरील कोणीही मनुष्य वश होण्याचें चिन्ह दिसेना. शेवटीं एक निमकहराम मात्र लाचलूचपतीला बळी पडला. तो एक पेंढा गोळा करणारा महार होता. मोहरांची थैली पाहून त्याचें मन स्वामीभक्तीपासून ढळलें.

त्या फितूर झालेल्या महाराकडे दादजीनीं असें काम सोंपविलें कीं, त्यानें किल्ल्यावरील पेंढ्याच्या घराला आग लावून द्यावी. त्याप्रमाणें त्या स्वार्थ-लोलुप महारानें ठरल्यावेळीं आग लाविली. ती विझविण्यास सर्व लोक धांवले. थोडक्याच वेळांत ती आग चहूंकडे भडकूं लागली. सरकारी धान्याचीं कोठारें, तशीच इतर सामुग्री जळून खाक झाली. एसप्रभू आग विझविण्याकरितां धांवले. इतर लोकही आग विझविण्यांत गुंतले. ही संधी साधून दादजीनें आपली फौज वर चढविली. किल्ला मजबूत व गोंवळकोंडकरांच्या ताब्यां-तला. चौक्या पाहाऱ्यावरील लोक कांहीं असे तसे नव्हते. त्या कानडी लोकांनीं दादजीच्या सैनिकांना कांहीं दाद दिली नाहीं. व शत्रू आल्याची खबर सर्वांना दिली. आगीच्या संकटांतून बाहेर पडतात न पडतात तों हे शत्रूच्या वैरा-ग्नीचें संकट आलेलें. तथापि लोकांनीं माघार घेतली नाहीं. अगोदरच कर्ना-टकी लोक लढवय्ये त्यांत एसप्रभुसारखा युद्धचतुर नेता त्यांना लाधल्यानें त्यांनीं दादजीच्या लोकांनीं घेतलेल्या पाहरेचौक्या परत घेतल्या. तेव्हां दादजीला चिंता पडली कीं, अशा लोकांच्या हातून किल्ला कसा घ्यावा. त्याला वाटे, पुरे झाला हा नाद. आज तीन महिने झाले, द्यावा सोडून हा नाद. परंतु लगेच त्याला शिवाजी महाराजांची रागीट मुद्रा आपल्याकडे रोखून पहात आहे असा भास होई. आपण महाराजांपाशीं किल्ला घेतों अशी प्रतिज्ञा करून निघालों तेव्हां आतां किल्ला न घेतां परत जाऊन त्यांना तोंड कसें दाखवावें. वगैरे विचार करून त्यांनीं खालचें सर्व सैन्य आणून निकराचा हल्ला करण्याचा बेत केला. त्याप्रमाणें त्यांनीं मोठ्या निकरानें हल्ला चढविला. या निकराच्या हल्ल्यांत एसप्रभू ठाणेदार, किल्लेदार व हवालदार असे प्रमुख लोक पडल्यानें मराठी सैन्य आनंदानें बेहोष झालें. त्यांनीं जयसूचक वाद्यें,

वाजविण्याला सुरवात केली. तो वाद्यनाद व पतिनिधनाची वार्ता हीं सावित्रीबाईच्या कानावर येऊन आदळलीं. तें ऐकून तिला काय वाटलें—काय वाटलें? कोण जाणे! मात्र तिच्या तोंडून पुढील शब्द बाहेर पडले:—

" अग बाई, हें काय! नाथ, शेवटीं आपण मला सोडून गेलांतना! गेले—गेले! पण गेले कसे? आपली अजरामर कीर्ति व शौर्य या रूपानें ते—ते पहा ते जिवंतच आहेत. पण—पण हें काय? आपलं तोंड असं कां? हं समजलें बरं; आपलं काम अर्धें राहिलं असं आपल्याला वाटतं? थांबाहो त्या दिवशीं आपण काय बरं म्हणालां? सावित्रीचं नांव धारण केलं—नाहीं—पतिदेवा, आज तुमचीं लाडकी सावित्री पहा—पहा बरं, काय करते ती! परवां मी म्हटलं कीं, मर्दानी पोषाख करून मी आपल्याबरोबर लढण्यासाठीं येऊं का? तर नाहीं म्हटलं! मी कशीपण आपल्या खांद्याशीं खांदा लावून लढलें असतें."

असें भ्रमिष्टासारखे ती बडबडत आहे तोंच कानडी लोकं सैरावैरा पळत आहेत असें तिला समजलें मात्र. मग काय विचारता? ती तडक उठून आपल्या पतीच्या शवापाशीं गेली. तिनें त्याची तरवार आपल्या हातीं घेतली. एकवार आपल्या त्या पंचप्राणांकडे पाहिलें. नंतर पदर बांधून ती स्वार झाली; व पळणाऱ्या सैन्याला म्हणाली:—

" पळा—पळपुट्यांनो, पळा. अरे हे तुमचे बापजादे येथें कां मरून पडले आहेत? त्यांना आपले जीव नकोसे का झाले होते? शत्रूला पाठ दाखवून तुम्हीं प्राण वांचविलेत तरी तुम्हीं कांहीं खरे जिवंत नव्हत. अरे, त्या मिशांचा भार तरी कशाला वाळगता! भागुबायांनो, टाका तीं हातांतली शस्त्रें खालीं आणि त्या हातांतून कांकणें तरी भरा. ज्या नरवीरांनीं इतके महिने किल्ला झुंजविला तितके दिवस तरी तुम्ही टिकाव धरावयाचा होतात?"

अशा रीतीनें भाषण करून सावित्रीबाईनें सैरावैरा पळणारे सैन्य एकत्र केले. याप्रमाणें एक स्त्री सैन्याचे अधिपत्य स्वीकारून आपल्याशीं लढावयाला सिद्ध झालेली पाहून दादजीला आश्चर्य वाटलें. इतकेंच नाहीं तर तिचे युद्धांतील कौशल्य व पांचपेंच पाहून त्यानें तोंडांत बोटच घातलें! सावित्री-

बाई जणूं काय नरकासूर मर्दनार्थ सजलेल्या भामेसारखी क्रूद्ध दिसूं लागली. तिच्या अंगीं प्रत्यक्ष रणदेवता संचरली होती. तिनें आपली तरवार चालविण्याची शिकस्त केली. दादजीचे लोक ती भराभर कापून काढूं लागली. ज्याच्यावर तिनें हल्ला केला असा एकही मनुष्य तिच्या तडाक्यांतून जीवंत सुटला नाहीं. आपल्या धनिणीचें तें शौर्य पाहून तिचे सैनिकही जिवावर उदार होऊन लढूं लागले. यामुळें त्या दिवशीं जय मिळाल्याचा जो आनंद दादजीच्या लोकांना झाला होता तो क्षणांत नाहींसा झाला.

आपलें सैन्य माघार घेत आहे असें पाहून या शौर्यशालिनीनें त्यांना स्फूर्ती उत्पन्न होईल असें भाषण करावें. याप्रमाणें पतिनिधनानंतर ती सतत तीन दिवस लढत होती. एकदां आपलें सैन्य माघार घेण्याच्या बेतांत आहे असें पाहून तिनें अंगावरचे दागिने काढून सैन्यांत फेंकले व म्हणाली:—

'माझ्या सहाय्यकर्त्यांनो, ही वेळ आणीबाणीची आहे. या वेळीं नेट धरा. शत्रू प्रबल आहे. त्याचें सैन्य आपल्या दुप्पट तिप्पट आहे. पण कांहीं हरकत नाहीं. आज तीन दिवस जसे तुम्हीं शौर्यानें लढलांत तसेच आणखीही लढा. माझ्या स्वामींनी याच सैन्याबरोबर तीन महिने टिकाव धरला होता हे नीट आठवा. शूरांनों, ते नाहींत असें समजूं नका. विरांनों, त्यांच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगा. व कर्नाटकी लोक संख्येनें थोडे असले तरी पराक्रमानें किती अधिक असतात याची साक्ष त्यांना पटूं द्या. आपलेपणा धरा.''

वगैरे शब्दांनीं ती विरांना आपल्या अंगच्या शौर्याची जाणीव करून देत होती. शेवटीं दादजीला वाटूं लागलें कीं, या वीरांगनेला आटोपावी तरी कशी! शेवटीं मोठ्या शिकस्तीनें दादजीनें त्या एकट्या वीरांगनेला वेढ्यांत धरलें व तिच्यावर हल्ला केला. ही अनीती पाहून ती एखाद्या सिंहिणीप्रमाणें खवळली.

"दादजी, आपण ज्यांना परमन्यायी म्हणतात त्या शिवाजी महाराजांचे सेवक ना? करा असाच अन्यायानें माझ्या एकटीवर मारा करा. पण लक्षांत ठेवा, ही त्या एसप्रभूची अर्धांगी आहे. तुम्हाला वाटतें तेवढ्या सुलभतेनें ती तुमच्या हातीं खास लागणार नाहीं. खेरीज एक एसप्रभू पडले तरी आज हे दोनशें कर्नाटकी वीर दिसत आहेत त्यांच्या अंगीं आपल्या

धन्याचें सामर्थ्य आहे. आपण आज जरी जय पावलां तरी त्यांत विशेष तें काय केलेंत ? परंतु मी अद्यापिही सांगतें कीं, तुम्ही पापी, दुर्योधनाच्या मार्गाचें अवलंबन करूं नका. शौर्यसागर अशा बाल अभिमन्यूला मोठमोठ्या योद्ध्यांनीं चहूंकडून घेरून पराजित केलें. काय मोठा पराक्रम केला ? सरळ-मार्गानें शत्रू आटोपेनासा झाला म्हणजे दुष्ट लोक असाच कपटमार्ग चोखाळीत असतात. थांबा, सैनिकहो थांबा. आतां मी यांचा समाचार घेऊन तुमच्यांत येऊन मिसळतें."

परंतु दादजीचा सैन्यभरणा पुष्कळ यामुळें तिचा नाईलाज झाला. दादजीनें आणखी सैन्य आणून तिला वेढा दिला. तें पाहून सावित्रीबाईच्या अंगीं अत्यंत आवेश चढून तिनें शत्रूचे लोक भराभर कापून काढण्याचा सपाटा चालविला. तो तिचा पराक्रम अवलोकन करून किल्ल्यावरील इतर लोकांना शरम वाटून तेही मोठ्या निकरानें व आवेशानें शत्रूवर तुटून पडले ! हें पाहून त्या वीरस्त्रीलाही अत्यंत समाधान वाटलें. ती आपल्या पुढील मार्ग मोकळा करीत चालली. दादजीला आतां ही सिंहिण कशी जेरीला येते याची चिंता वाटूं लागली. परंतु अरेरे ! तिला जेर करण्यासाठीं त्यानें जो उपाय योजला तो किती अधमपणाचा ! ती अशा सपाट्यानें पुढें चालली असतां त्यानें मागून जाऊन तिच्या घोडीचे पाय तरवारीनें कापून काढले. त्या बरोबर ती तोंडघशी पडली ! दादजीचें हें कृत्य पाहून सावित्रीबाई म्हणालीः—

"दादजी, आपण माझे जातिबांधवना ? वाः ! फार चांगलें कृत्य केलंत ! यावरून तुमचा पराक्रम मात्र मला कळला ! माझ्यासारख्या स्त्रीच्या समोर युद्धाला उभें राहण्याची धमक तुमच्यांत नाहींना ? हीं कामें भागुबाईला शोभतात, शूराला खास शोभत नाहींत."

एकीकडे तिचें हातांनीं काम चालू होतेंच. तिचें बोलणें ऐकून दादजीचे लोक तटस्थपणें तिचेकडे पहात उभे राहिले. परंतु दादजी त्यांना म्हणालेः—

'पहातां काय ! सैनिकहो, ही वेळ पुन्हां यावयाची नाहीं. करा, लगट करा आणि तिच्या हातचें शस्त्र काढून घ्या. मराठे वीरहो, ही असामान्य स्त्री आहे. ही अशा मार्गाखेरीज आटोपणें शक्य नाहीं. करा—जिवावर उदार होऊन चोहोंकडून मारा करा. आतां फारच थोडें काम उरलें आहे. आपण

हिच्या दसपट विसपट आहोंत. हिचें तेवढें शस्त्र काढून घेऊं. म्हणजे बाकीचें सैन्य हांहां म्हणतां हस्तगत होईल."

"मराठे हो, येथें कांहीं तेलतिखट आणि कांदा यांचा फन्ना पाडावयाचा नाहीं. या, घ्या माझें शस्त्र काढून." असें म्हणून तिनें आणखी १०।२० इसमांना लोळविलें. परंतु अवचित् एकानें मागून तरवार चालवून तिचा हात खालीं आणला ! दुसऱ्यानें तिची ती विजयी तरवार ताब्यांत घेतली. लगेच तिला बंदिवान करून नेलें. धनीण कैद झाल्यावर इतर सैन्य सैरावैरा पळालें. कांहीं शत्रूंनीं कापून काढलें. दादजीनें तिची सर्व संपत्ती लुटून दोन्ही मुलांना व तिला कैद करून महाराजांपुढें नेलें.

महाराजांना तिच्या शौर्याची बातमी ऐकून फारच आश्चर्य वाटलें. व अशा पराक्रमी स्त्रीरत्नाला केव्हां पाहूं असें त्यांना झालें. शिवरायांनीं अत्यंत विनयपूर्वक तिची भेट घेतली. अशा वीरशाली स्त्रीला हातापायांत बिडी घालून कैद करून आणलेली पाहून त्यांना फार वाईट वाटलें. लगेच त्यांनीं दादजी प्रभू महाडकर यांना बोलावून आणून म्हटलें:—'दादजी, हें काय ? या स्त्रीला आपण साखळदंडानें जखडून कां टाकिलें ? दादजी, शत्रू असला तरी त्याचा छल करणें मला बिलकूल खपत नाहीं. ही गोष्ट आपण विसरलां काय ? आणि त्यांत ही तर स्त्री !"

"महाराज, आपणाला ती एक सामान्य स्त्री आहे असें वाटतें काय ? महाराज, पतिनिधनानंतर हिनें आमच्या अफाट सैन्याबरोबर आपल्या अतिशय थोड्या सैनिकानिशीं टक्कर दिली. दयासागरा, आपणाला हिची दया येते परंतु हिला नुसती निःशस्त्र करण्यास मला १०।२० वीरांचे बळी द्यावे लागले आहेत. तथापि, हिचा शस्त्रधारी हात मागाहून वार करून कलम केल्याशिवाय आम्हाला हिला बंदिवान करतां आलें नाहीं."

महाराज हें ऐकत गंभीर मुद्रेनें सावित्रीबाईकडे पहात होते. मात्र सावित्रीबाई दादजीचें तें भाषण ऐकून एखाद्या खवळलेल्या वाघिणीप्रमाणें त्याच्याकडे पाहूं लागली. क्रोधानें तिच्या डोळ्यांतून जणूं ठिणग्याच पडत होत्या ! त्या क्रोधावेशांत तिनें महाराजांच्या व दादजीच्या अंगावर धांवून जाण्याचा प्रयत्न केला. अरेरे ! आपणाला साखळदंडानें बांधिलें आहे याची क्षणभर तिला

विस्मृती पडली. आपल्या सर्वस्वाचा नाश करणाऱ्या शत्रूला पाहून तिचे बाहू स्फुरण पावूं लागले. ती अत्यंत आवेशानें म्हणाली:—

" शिवाजी, हा–हा माझा हात तुझ्या या सेवकानें कपटानें तोडिला आहे. परंतु दे–एक क्षणभर तरी माझी विजयी समशेर दे आणि मला शत्रूचा खरपूस समाचार घेऊं दे. शिवाजी, मला दुसरं कशाचं सुद्धां वाईट वाटत नाहीं. परंतु माझेकडून आज दोन तीन पिढ्या स्वामींची सेवा बजावलेली जयशाली तरवार संभाळून त्या स्वामींची सेवा झाली नाहीं. नेहमीं यश संपादन करणारी ती तरवार माझ्या विटाळानं अपेशी ठरली काय ? धिःकार, धिःकार माझ्या जिण्याला ! मी शत्रूंशीं दोन हात करीत असतांना तिकडच्या भेटीस न जातां तुझ्या बंदिखान्यांत पडलें आहे याचा खेद होतो ! "

" शांत व्हा. मातोश्रीसमान वीरदेवते शांत हो ! बाई, आपण फार मोठा पराक्रम केला आहे. आपली कीर्ति अजरामर आहे. वीरभगिनी, आपण इतक्या बंदोबस्तांतून जेव्हां माझ्या अंगावर धावला त्यावरून मला आपल्या शौर्याची पुरी खात्री पटली. बाई, मला अत्यंत वाईट वाटतें कीं, अशा शौर्यशालीनीचा एक हात–ज्या हातानें अनेक वीरांना यमलोकीं पाठविलें–तो हात छाटला जावा ! बाई, आपणाला त्यामुळें फार वेदना होत असतील. माझी आपणाला विनंती आहे की, सर्व अपराधांची क्षमा करून, या मराठी राज्याचें हित चिंतून आपण काळ कंठावा. मी पूर्ववत् आपणाला किल्ल्यावर पाठवितों. त्याचप्रमाणें आपल्या मुलांची शिक्षणाची व्यवस्थाही करतों."

महाराजांचें हें भाषण ऐकून सावित्रीबाईची मुखश्री क्रोधानें लाल झाली. बरोबरच आहे. ती काय याचक होती ? म्हणून तिला एवढ्या देणगीनें संतोष व्हावा ? तिचे ओठ थरथरूं लागले. ती म्हणाली:—

" शिवाजी, या एवढ्या तेवढ्या दयेनें दिलेल्या तुकड्याची लालूच कोणाला दाखवितोस ? माझ्या मुलांचं शिक्षण तूं करणार ! इतके दुबळे माझे मुलगे निपजतील काय ? नको–नको ! त्यापेक्षां आज ते जगांतून नाहींसे झालेले पुरवले ! तूं काय समजलास ? दिलेल्या–तूं माझ्या स्वामींच्या शत्रूनें दिलेल्या घासावर मी संतोष मानीन ! शिवाजी, ज्याच्या अंगांत कर्तबगारी नसेल, त्यानें दिलेल्यांत आनंद मानावा. तूं खुशाल मला व माझ्या मुलांना

हत्तीच्या पायीं दे. शिवराया, तूं दयाळू असशील, सत्यनिष्ठ असशील, अत्यंत क्षमाशील असशील पण तूं माझा शत्रू ना? आम्हीं परभू लोक इमानी! बस्स. या इमानाकरितांच मी तुझ्या सैन्याशीं झुंजलें! त्याप्रमाणें हे दादजी–माझे जातभाई असून तुझ्याशीं निमकहलालपणेंच वागले. व याबद्दल मला अत्यंत अभिमान वाटतो. आमचा धनी जुलमी असेल, अन्याई असेल, परंतु त्याचे आम्ही सेवक ना? आजपर्यंत त्याच्या अन्नावर पोसलों ना? तेव्हां आज त्याला विसरून तुझें व तुझ्या राज्याचें हित मी चिंतावें असें तूं म्हणतोस तरी कसें? कल्पना कर उद्यां तुझ्या विश्वासू सेवकास औरंगजेबानें पराजित करून नेलें तर तुझ्या सेवकानें तुजवरचे अलोट स्वामीभक्तीला आपल्या मनांतून हांकून देऊन त्याला सामील व्हावें. यांत तुला आनंद वाटेल ना? तुला धन्यता वाटेल ना? नाहीं. तें कां बरं? आज तूं न्यायी, दयाळू, प्रजेला पुत्राप्रमाणें पाळणारा, धर्मनिष्ठ आहेस. समज, उद्यां तुझे वंशज या उलट निपजले तर तुझ्या वेळच्या इमानी सेवकांनी राष्ट्राभिमान सोडावा काय? शिवराया, मी कबूल करतें कीं, तुझें कार्य मंगल आहे. तुझी 'चांगला' ह्मणून कीर्ति ऐकूं येतें. परंतु, बाबा, जसं आपलं काळेंबेरं मूल टाकून दुसऱ्याचं गोरं मूल आपलं म्हणणं, त्यावर पुत्रवत् प्रेम करणं, हे काम खरी माता करूं शकत नाहीं. तसंच एकदां धनी म्हटलेल्यास आज दगा देणं माझ्या नुसत्या कल्पनेनें सुद्धां होणं शक्य नाहीं. मग आचरणानं कोठलं? शिवाजी दुर्योधन दुष्ट आहे, अन्यायी आहे; पांडव न्यायी, सद्गुणी व ईश्वरभक्त आहेत. इतकेंच नाहीं तर ते तुझे बंधू आहेत, ही गोष्ट श्रीकृष्णानें कर्णास सांगून त्याला पांडवपक्षाला वळविण्याची थोडी खटपट केली काय? तथापि तो सर्व गोष्टी समजूनही एकदां ज्यास धनी म्हटलं त्यास आमरण दगा देऊं नये. याच एका पवित्र भावनेनं शेवटपर्यंत आपलं मन ताब्यांत ठेवून वागलानां?"

"होय, बाई होय. आपलें म्हणणें अक्षरशः खरें आहे. पूज्य देवते, माझे भगिनी, मला फार वाईट वाटतें कीं, असलीं अमूल्य वीरश्रीनें व स्वामिभक्तीनें नटलेलीं स्त्रीरत्नें माझ्या या अभाग्याच्या राज्यांत नाहींत. द्या बाई, मराठी साम्राज्यांत असलीं स्त्रीरत्नें उत्पन्न होवोत असला मंगल आशीर्वाद द्या!"

# भाग्यशाली सईबाई.

" आज अगदीं मोठं मोठंच भाग्य उदयाला आलं म्हणायचं ! मला वाटतं कपिलाषष्ठीचा योग देखील बरा; इतकी आपली भेट दुर्लभ झाली आहे. "

" काय करावं बरं राणीसरकार ! आम्ही अनेक उलाढाल्यांत गुंतलेलीं माणसं. आम्हा......"

" हो, हो, तर काय ! गांठ पडल्यावर वरीक पहावं अगदीं साखर पेरायची. पण अगबाई, खरंच मी विसरलेंच अगदीं–आज किनई मी बेत केला होता बरंका कीं, आपण आल्यावर मुळीं बोलायचंच नाहीं. रागावून गप्प बसायचं ! पण काय विसरलेंच. "

" वः ! फार चांगलं झालं असतं. कारण अगोदर गर्भवती स्त्रिया सुंदर दिसतातच, त्यांत तरुण स्त्रिया रागावल्या कीं, फारच सुंदर दिसतात ! हं, आतां आहे का रुसण्याचा बेत ? असेल तर होऊन जाऊं दे; नाहींतर मी एखाद्या गड किल्ल्याच्या मागें लागेन त्यावेळीं रुसून बसलीस तर–समजूत करण्याची वाट पाहून कंटाळून जावयाचीस ! आतां मी येथें हजरच आहें. पण तसं नकोच. मी हा स्वराज्य स्थापण्याचा अट्टाहास सोडूनच देऊं का ? मग आपला अक्षयीं तुझ्याजवळ बसून राहीन. काय, जाऊं त्या बादशाहाला शरण ? "

" नकोगबाई; मी आपली या पुढें बोलायचीच नाहीं या गोष्टीबद्दल. पण आरंभलेलं कार्य असं अर्धवट मुळींच टाकूं नये. आणि त्या मोगलांस शरण जाण्याची तर गोष्टच बोलूं नये. माझ्या बाबांना सात वर्षं साताऱ्याच्या किल्ल्यांत कैद केलं होतं ना ? मग त्या शहास अगर दिल्लीपतिला शरण जाण्यास मी सांगेन वाटतं ? बेहेत्तर आहे आपली भेट वरचेवर नाहीं झाली तर पण आपण अशा त्या अन्यायी राज्यकर्त्यांची चांगली खोड मोडावी ! सासुबाई एकएक त्याच्या अन्यायांच्या व जुलमाच्या गोष्टी

सांगतात त्या ऐकल्या कीं, अगदीं चीड येते, संताप येतो व आपण स्वतंत्र स्वराज्य स्थापण्याचा जो उद्योग आरंभिला आहे तो सिद्धीस नेऊन पुनः रामराज्य स्थापावं व आपल्या धर्माची स्थापना करावी. वरं, त्यासाठीं आपल्याला माझं सारं आयुष्य व आरोग्य जाऊं दे अशी मी यापुढं रोज देवाची प्रार्थना करीन. ”

“ आम्हीं जर शिरजोर अन्यायी व जुलमी अशा मोंगल राजसत्तेचा नायनाट करण्याची पवित्र कामगिरी करीत आहोंत, तर तो परमेश्वर आम्हांला दीर्घायुष्य व आरोग्य देईलच. त्यासाठीं आपलं नकोरे बुवा आम्हांला आयुरारोग्य. आपण आमच्या मागं-हें महत्प्रयासानें स्थापन होत असलेलं राज्य-संभाळण्यासाठीं आई भवानीच्या कृपेनं होणाऱ्या युवराजास उदरीं धारण केलं आहे. त्याला जन्म देऊन त्याचं पालन पोषण करून आमच्या मदतीला त्याला देणार ना? मग आपलं आयुरारोग्य आमच्या कल्याणाकरतांच आपणाला पाहिजेना? ”

‘ अगदीं कसंही जरीं माणसानं बोललं तरी त्याचे दांत त्याच्याच घशांत घालण्याचं जसं बाळकडूच सासुबाईंनीं पाजलय्! उगीच का सासूबाई दिवसभर कोड कौतुक करून लिंबलोण उतरतात त्या! त्यांचं किती किती पण इकडे प्रेम आहे नाहीं? ”

“ होय. हा शिवाजी त्या बाबतींत मोठा भाग्यवान् आहे. मला वाटतं याबद्दल देवादिकांना देखील माझा हेवा वाटत असेल. माझ्या सर्व पराक्रमांचें, सर्व उलाढालींचें श्रेय सर्वस्वी तिच्याकडे आहे. मी अखील महाराष्ट्राच्या निष्कंटक राज्याची किंमत एक वेळ कमी लेखीन पण-पण-माझ्या मातोश्रींची किंमत मला जास्त आहे.” राजे शिवाजी यांचें अंतःकरणांत यावेळीं मातृभक्ती कोंदून राहिली होती.

“ एकदां त्यांच्या झालेल्या अपमानाचा सूड घेतला, गोब्राह्मणांना कायमचं मुसलमानांच्या तडाक्यांतून सोडवून स्वराज्य स्थापनेचं काम पूर्ण झालं म्हणजे आपण त्याचं ऋण फेडलं असं होईल. ”

" होयना ? चला तर त्या ××× स्वामीस ×× गडच्या किल्लेदारानं कैद केलं आहे तेव्हां तेथें शिरकाव कसा करावा ? त्यांची सुटका कशी करावी ? त्या कामगिरीवर कोणीं कोणीं जावं ? हें मला ठरवूं दे. "

" मी गडे थोडं विचारतें बरं का. जरा थांवावं. "

" आईसाहेबांनीं मोठ्या हौसेनं आमच्या पायांत ही तुझी बिडी घातलीच आहे. मग जाणार कसें ? थोडं कां–फार सुद्धां म्हणत असलीस तरी थांवलं पाहिजे. "

" जा मेलं, मी बिडी का ? बिडी कुणाला घालतात आहे का ठाऊक ? हो मी आपली लोखंडाच्या बिडीसारखीच आहे. आतां तर झालं समाधान. "

" पहा–शेवटीं रुसलीसच ! अग बिडी म्हणजे प्रेमाची ! प्रेमाची बिडी व ती प्रेमी कैद्यासच घालतात. मी तुझा कैदी नाहीं काय ? आणि लोखंडी बिडी असं मी बोललों तरी ? लोखंडासारखी काळी का आहेस तूं ? मला तर बोवा छान गोरी दिसतेस. हं चला अशा रुसूं नका. हें पहा असं म्हणतात कीं, गरोदर स्त्रीचं मन संतुष्ट ठेवावं, मग असं रुसून भांडून कसंबरं चालेल ? उद्यां आपण ज्याला जन्म देणार तो मुलगा नाहींतर आमच्याशीं असाच भांडेल. कारण आतां तो गर्भावस्थेंत हें भांडण ऐकतोच आहे. " असें म्हणून महाराजांनीं हळूच गळ्यापाशीं हात नेऊन सईबाईला गुदगुल्या केल्या. त्याबरोबर त्या साहाजीकच हंसूं लागल्या. त्यांनीं प्रेमभरानें शिवरायाचे दोन्ही हात धरून त्यांना मंचकावर बसविलं व म्हटलंः—' परवा आपलें तें हें-"

" बरं, आपलं तें आणि हें. पुढं काय म्हणत होतें तें व हें ? "

" आतां कीं नाहीं मी साफ सांगतें थट्टा बिलकूल करावयाची नाहीं. अगदीं गप्प बसून मी जें सांगतें तें ऐकायचं. तान्हाजी परवां सांगत होते कीं, * * * यांच्या शोधाला जायचं तेव्हां त्यांनीं व आपण म्हणे कडक लक्ष्मीचं सोंग घेतलं होतं; खरंच का पण हें ? "

" हो. मग त्यांत काय आहे ? वाटेल त्या युक्तीनं बातमी काढावयाची होती. "

" मग मला तरी दाखवावं गडे तें सोंग घेऊन."

" वेडीच आहेस ! तें कांहीं नाहीं. परंतु आज मात्र मी एका कातकरणीचं सोंग घेणार आहे. तेव्हां आपल्या दासीचं एखादं जुनं फाटलेलं लुगडं द्या."

हें ऐकून सईबाईची तर हंसून पुरेवाट झाली. हंसें दावीत त्या ह्मणाल्या, " मी देऊं का आपलं ?"

' अं हः अग गरीब कातकऱ्याच्या वायकोला शोभाय् जोगतं हवं ना ? तूं देशील आपलं एखादं जरीचं; पण आज त्याची किंमत नाहीं. '

" कातकऱ्याची बायको आपण होणार मग कातकरी कोण होणार ? "

' माझा तान्हाजी. दुसरं कोण ? बरं—झालं तुझं विचारणं ? तर जाऊं दे मला. '

" हो—पण लुगडं देवूंना ? अलीकडे विजापूरकरांच्या पोटांत धडकी भरण्यासारखे पराक्रम करणारांना माझ्याजवळ लुगड्याची भीक मागावी लागली ना ?"

अशा तऱ्हेच्या विनोदांत बोलणें संपवून महाराजांना सईबाईनीं निरोप दिला. ते गेल्यावर किती पण प्रेमळ दृष्टीनं त्या पतीदेवाकडे पहात होत्या.

* * * * * *

लौकरच कांहीं दिवसांनीं सईबाई प्रसूत होऊन त्यांना पुत्ररत्न झालें. शिवाजीच्या मातोश्री जिजाबाई यांना फार आनंद झाला. अगोदरच नातवंडाची आवड आजीला फार असते. त्यांत जिजाबाईचे शिवाजी हे एकुलते एक चिरंजीव. त्यांच्यावरच काय तो जिजाबाईचा सर्व जीव ! कारण त्यांना शिवाजीपूर्वीं संभाजी नांवाचा एक मुलगा झाला होता. पण तो नेहमीं शाहाजी राजाजवळ असे व पुढें तो मोंगलांकडून एका लढाईंत मारला गेला. सईबाईना झालेलें हें बालक त्या संभाजीसारखें दिसे व आपला भाऊ मारला गेल्याची गोष्ट महाराजांच्या जिव्हारी लागून त्याची ते वारंवार आठवण काढीत. म्हणून या मुलाचें नांव संभाजी असें ठेवण्यांत आलें.

संभाजी सृष्टीनियमानुसार दिवसगत वाढूं लागला व महाराजांच्या राज्य-विस्ताराचें क्षेत्रही वाढूं लागलें. एकदां महाराज असेच सईबाईच्या महालांत आले होते. तेव्हां सईबाईनीं संभाजीला महाराजांचे मांडीवर देऊन म्हटलें:–

" घाल चांगली मोहनी बरं कां तूं ! म्हणजे कुठं देहाचं सार्थक करण्याच्या इच्छेनं अरण्यांत वगैरे निघून जाण्याची बुद्धि व्हायचीच नाहीं ! मागं मला टाकून जातांना इकडे कांहीं वाटलं नाहीं. खरंच, त्यावेळीं आपण जर खरो-खरीच त्या अरण्यांत राहिलां असतां तर आम्ही बापड्यांनीं काय केलं असतं ? "

" मी खरंच आलों नसतों–परंतु जेव्हां आईनें डोळ्यांत अश्रू आणून निर्वाणीचें बोलणें लाविलें तेव्हां आमच्या मनाचा भरभक्कम किल्ला देखील ढासळला. आणि त्यांत आपल्या टिपं गाळण्यानं व सुस्काऱ्यांनीं तर पुरतंच काम उरकलं !"

" हो ! हें आपलं कांहीं तरीच बरं का ! इतकं जर माझ्याकडे चित्त होतं तर जन्मभर स्वामीसंतांच्या संगतींत काळ घालवून अरण्यवास पत्करण्याची प्रतिज्ञाच मुळीं प्रथम केली नसती. मात्र सासुबाईचा अधिकार आहेच मुळीं तितका. त्यांनीं आपलं संगोपन करतांना, आपणाला शिक्षण देतांना, माता, पिता व गुरु अशा तीन माणसांच्या कर्तव्याचा बोजा स्वतांच्या शिरावर घेऊन तो उत्तम रीतीनं पार पाडला. खरोखर असलं सामर्थ्य फारच थोड्या स्त्रियां-च्या ठिकाणीं दिसून येतं. शिवाय, त्यांच्या ठिकाणीं असा कांहीं अलौकिक गुण आहे कीं, त्यांची छाप कोणावरही तेव्हांच पडते ! "

" होय; तें वरीक खरं आहे. प्रत्यक्ष बाबांवर तिची छाप मातोश्री तुका-बाई यांच्यापेक्षां अधीक आहे. खरे म्हटलें म्हणजे आईपेक्षां त्या बाबांना जास्त प्रिय ! पण बाबांवर कांहीं आई इतकी त्यांची छाप नाहीं. बाकी आ-मच्या आईच्या अंगीं गुणच तसे आहेत. सत्यनिष्ठा, स्वधर्मावरील प्रेम, दीर्घो-द्योग, मानी पण प्रेमळ स्वभाव, परमेश्वरावरील अलौकिक भक्ति, असे उत्त-मोत्तम सद्गुण तिच्या अंगीं असल्यानें ती सर्वांना पूज्य वाटते व तिची छाप सर्वांवर तेव्हांच पडते. आमचं महत्‌भाग्य म्हणूनचं तिच्या उदरीं आमचा

जन्म झाला व तिच्या सहवासांत दिवस घालविण्याची संधी आम्हाला लाभली ! ”

इतक्यांत बाल संभाजी रडूं लागला. महाराजांनीं त्याला हां हूं करून उगे करण्याचा प्रयत्न केला. पण तो कांहीं राहीना. म्हणून त्यांनीं सईबाई-जवळ त्यास दिलं.

“ कसं ग बाई माझं छकुलं आहे ! ” असें म्हणून अत्यंत प्रेमभराने मुलाचें चुंबन घेतलें. आईपाशीं जातांच संभाजी रडण्याचा थांबला. एवढेंच नव्हे तर हंसूं खिदळूंही लागला. त्याच्या गालावर हळूच चापट मारून महाराज म्हणाले:—

“ अरे गुलामा ! माझ्या मांडीवर तुला काय काटे बोचत होते होय ? रडूं लागलास तो ? मोठा मातृभक्त होणार बोवा हा ! ”

“ हो मग, तो गुण अनुवांशिकच त्याच्या अंगीं येणार. इकडच्या सारखाच तो मातृभक्त होणार. कांरे, तूं होणार ना ? होईलच, माझा बाळ खात्रीनं मातृभक्त होईल ! इकडच्याहून कांकणभर जास्तच होणार !

तोंच संभाजीनें ‘ ब्य, ब अऽऽब्य, ऽऽ ’ असे अस्पष्ट शब्द काढले.

“ पाहिलं—बरं बरं म्हणतो आहे गुलाम ! ”

“ बरं करतो आहे. आईसारखाच हुशार आहे. ” असें म्हणून माहाराजांनीं सईबाईकडे पाहिलें. पतीच्या तोंडचें ते गोड शब्द ऐकून अंगीं मूठभर मांस आलेंसें वाटून समाधानी व प्रेमळ अशी सईबाईची नजर महाराजांच्या नजरेशीं भिडली. पण ती क्षणभरच. महाराजांच्या नजरेंत पत्नीप्रेम ओतप्रोत भरलेलें होतें. लगेच सईबाई रुजाम्याकडे पाहूं लागल्या. कडेवर तें गोजीरवाणें मूल, लज्जा व प्रेम यांनीं खुललेला तो सईबाईचा चेहरा ! महाराज तो देखावा कांहीं वेळ पाहातच राहिले ! ते मनांत म्हणाले, काय सुंदर दृश्य हें ! परंतु लगेच त्यांनीं मनाला आज्ञा केली, आवर, मना, या मोहापासून मागें पाय घे. मधुकराप्रमाणें यांत गुंतूं नको. तुला या गोष्टींस फारच थोडा वेळ देऊन बाकीचा सर्व वेळ महाराष्ट्रच कार्य—परंतु त्याच्या बाहेर-

चाही प्रदेश काबीज करून तेथें धर्मराज्य, न्यायी रामराज्य स्थापावयाचें आहे. मनाला असा इशारा देऊन महाराज उठलेच. " आमचें कामकाज पाहण्याची आतां वेळ झाली. इतर मंडळी वाट पाहतील. त्यांना वक्तशीरपणा शिकवितांना प्रथम मला तो पाळला पाहिजे. कां खरं ना सरकार ?"

" अगदीं खरं. आतां जायची वेळ झाली असेल. पण तसं न म्हणतां हा वक्तशीरपणाच आजमध्यें आणला. सुचतं तरी कसं बाई दरवेळीं नवं नवं कोण जाणे ! "

" मी शाहण्या आईबापाचा जसा मुलगा आहें तसाच शाहण्या पत्नीचा पती आहे ना ? " असें म्हणून महाराज निघणार तोंच हातांत एक लखोटा घेऊन एक दासी आली व तिनें तो सईबाईपाशीं दिला. व ' बाहेर लखोटा घेऊन येनारा उभा हाय. ' असें सांगितलें.

महाराजांचे हातीं सईबाईनीं तो लखोटा दिला व दासीला बाहेर जाण्याविषयीं डोळ्यानें खुणावलें.

महाराजांनीं लखोटा फोडून वाचला. पुनः वाचला-व ते विचारमग्न झाले.

" काय आहे त्या लखोट्यांत ? कुणाकडून आला ? मला सांगायसारखा आहे का ? एवढा अगदीं विचार कसला चालला आहे ? " सईबाईनीं प्रश्नमालीका सुरू केली.

" आमच्या मुत्सद्दी मातोश्रींच्या तालमींत तयार झालेली त्यांची आवडती सून आपण आहांना ? मग द्या पाहूं सल्ला. हा विजापूरचा लखोटा आला असून आम्ही इकडे जो प्रांत काबीज करण्याचा प्रारंभ केला आहे त्यांत आमच्या वडिलांचें अंग असून ते आम्हांला आंतून फूस देत आहेत असा विजापूरकरांचा पक्का समज झाला आहे. म्हणून आम्ही जिकलेला मुलूख परत करून त्यांचें स्वामित्व कबूल करावें व क्षमा मागण्यासाठीं विजापुरी जावें. तसें न केल्यास फार वाईट प्रसंग येणार आहे. कारण सध्यां शहानें बाबांना कैद केलें असून आम्ही त्यांच्या सांगीप्रमाणें न वागल्यास बाबांना भिंतींत चिणून त्यांचा अंत करण्यांत येणार आहे. त्यांचें म्हणणें कबूल करावें तर आजपर्यंत केलेला उद्योग निष्फळ होणार. न करावें तर आमच्या पायीं

वडिलांचा अंत होऊन या शिवाजीच्या माथीं पितृहत्येचें पातक बसणार.' असें म्हणून महाराज पुन्हां विचारांत गढून गेले.

*" मग इतका कसला जिवाला त्रास करून घ्यायचा त्यांत? बाकी मला आपलं असं वाटतं कीं, इतक्या दिवस केलेली खटपट कांहीं फुकट दवडूं नये. मामंजींचें आपणांस यांत सहाय्य–नव्हे संमत्ती आहे कीं काय हें अजमाविण्यासाठींच तो एक डाव शाहानं टाकला असावा. स्वधर्माच्या संरक्षणार्थ माहाराजांनीं ही खटपट चालविली आहे. माझ्यापेक्षां अनेक सल्लामसलतगार माहाराजांच्या पदरीं आहेत. अगोदर सासुबाईंना विचारावं. त्यांचा शुभाशिर्वाद जर या कामीं आपणाला मिळेल तर प्रत्यक्ष श्रीकृष्णाचें सुदर्शनही आपलें वाकडें करूं शकणार नाहीं. अगबाई, आपण मुळीं इतकी चिंताच करावयाला नको. आईभवानीला विचारावं."

" अगदीं माझ्या मनांत आलेला सल्लाच तूं दिलास. शाबास, लाडके शाबास. या शिवाजीची खरी भाग्यशाली व मुत्सद्दी पत्नी आहेस. या सल्ल्याबद्दल तरुण पतीनें देण्यायोग्यच बक्षीस महाराजांनीं आपल्या आवडत्या पत्नीला दिलें. नंतर ते मातोश्रीचा सल्ला घेण्यासाठीं निघाले. जिजाबाईंची व इतरांची सल्लाही तशीच पडली. आईभवानीनें देखील त्याच गोष्टीला संमती दिली. व महाराजांनीं दिल्लीश्वराकडून शहाला कशी तंबी देवविली व वडिलांची कशी सुटका केली हें इतिहास वाचकांना माहीत आहेच.

वडिलांची कैदेंतून सुटका झाल्यानंतर नांवाला चार दिवस स्वस्थ बसून महाराजांनीं पुनरपि आपला पूर्वक्रम चालू केला. विजापूरकरांच्याच नव्हे तर दिल्लीश्वराच्या देखील पोटांत धडकी भरेल अशीं कृत्यें महाराजांनीं केलीं. विजापूरकरांशीं बरेच सामने झाले. दिल्लीहून आलेल्या कित्येक सरदारांचा त्यांनीं समाचार घेतला. अखेर बादशाहानें जयसिंगाला पाठवून त्याच्या मध्यस्थीनें महाराजांना दिल्लीस भेटीला म्हणून बोलाविलें. राज्याची निरवानिरव करून सर्वांच्या सल्ल्यानें व भवानीच्या अभयवचनावर विश्वास ठेवून

* रा. केळुसकरकृत शिवचरित्र, पान १२० पहा.

केवळ राजकारणाच्या एका उद्दिष्ट हेतूनें युवराज संभाजीसह दिल्ली आगऱ्याकडे जाण्याचें नक्की ठरविलें. निघण्यापूर्वी मातोश्रीची आज्ञा व शुभाशिर्वाद घेऊन महाराज सईबाईकडे आले.* सईबाईंना महाराज दिल्लीस जाणार असल्याची कुणकुण कळली होतीच. यामुळें त्यांचें मन चिंताग्रस्त झालें होतें. महाराज आल्यावर मन अगदीं दगडासारखें करून वीरपत्नीला साजेल अशा रीतीनें त्यांना निरोप द्यावयाचा असें सईबाईंनी ठरविलें. पण प्रत्यक्ष महाराज निरोप घेण्यासाठीं आले त्यावेळीं, कदाचित् कांहीं दगाफटका होणार नाही ना? महाराजांची व आपली भेट पुन्हां लौकरच होईलना? अशा शंकाकुरांकांनीं सईबाईंच्या मनावर पगडा बसविलाच. उत्साहानें निरोप देण्याचा तो पहिला बेत पार ढासळून गेला व त्यांनीं एकदम महाराजांचे वक्षस्थलावर मस्तक ठेवून त्यांच्याकडे केविलवाण्या नजरेनें पहात म्हटलें:—'हें पहा, औरंगजेब महाकपटी आहे. तो कोणत्या रीतीनें घात करील याचा मुळींच नेम नाहीं! दगाफटका तर तो नाहींना करणार! मग मला हे पाय केंव्हां दिसतील! नाहींतर जाऊंच नये गडे! किती दिवस लागतील नी काय?'

महाराजांनीं आपला करपाश त्यांच्या गळयाभोंवतीं घालून त्यांची मान आपल्याकडे फिरवून ते म्हणाले:—

"तुझें मजवर जें अकृत्रिम प्रेम आहे त्या प्रेमामुळेंच तुला असें वाटतें आहे. तुला माहीत आहेना—वीरपत्नी सिता माऊलीनं शत्रूंशीं दोन हात करून त्याचं पुरतं पारिपत्य करण्याकरितां रामरायाला मारुतीबरोबर निरोप पाठविला होता. इंद्रजिताची पत्नी सुलोचना, तसेंच सती द्रौपदी यांनीं आपल्या पतींना युद्धाला जातांना केवढ्या आनंदोत्साहानें निरोप दिला! आणि आम्हीं तर काय फक्त औरंगजेबाच्या भेटीला जात आहों. माझ्या जिवाला बिलकूल धोका येणार नाही असें खुद्द जयसिंगानें वचन दिलें आहे. शिवाय मी बरोबर जिवास जीव देणारे असे निवडक स्वामिभक्त लोक घेऊन जात आहे. या सर्व गोष्टींपेक्षां विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे मातोश्री व आई भवानी यांचा शुभाशिर्वाद व पाठिंबा माझें संरक्षण करण्याला पूर्ण समर्थ

* केळुसकरकृत शिवचरित्र, पान २७७.

आहेत. मग तूं कां भितेस ? छे. हें उपयोगाचं नाहीं ! तूं वीरपत्नीला साजेशा रीतीनें वागणार ना ? तूं वीरमाता होणार ना ? चल आटप. हें धडधडणारें हृदय शांत कर. ते डोळ्यांतून बाहेर पडूं पाहणारे अश्रू, त्यांना मागें घे. आणि परमेश्वरावर पूर्ण भरंवसा ठेवून मोठ्या आनंदानं मला निरोप दे. तुझ्या सारख्या वीरपत्नीच्या आनंदाच्या निरोपानं आम्हां वीरांचा उत्साह द्विगुणित होऊन उद्दिष्ट कार्य सुलभतेनें पार पाडण्याची हिम्मत आम्हांला येते ! काय-माझें म्हणणें ऐकलंस ना ? मग आम्हाला निरोप देणार ना ? मी लौकरच तुमच्या भेटीला पुनः परत येईन."

"हो-पण मी येऊं का बरोबर ?"

"वेडी, अगदीं वेडी. शेवटीं स्त्रीजातीच्या भित्र्या स्वभावावर तूं गेलीसच. मला नवल असं वाटलं-आईसाहेबांनीं किती बाणेदारपणानं वागण्याचं कबूल केलंय्. किंबहुना हें राज्य त्यांच्याच अंगावर टाकून मी जात आहे. त्या धैर्यशाली सासुला अशी भित्री सून नाहीं बोआ शोभत. अरे ! हे अश्रू देखील बाहेर पडले वाटतं ? अंहः तें नाहीं उपयोगी. पूस तें अश्रू ! नाहीं मीच पुसतों." असें म्हणून महाराजांनीं सईबाईंना आलेले अश्रू स्वहस्तानें पुसून त्यांची समजूत पाडली. नंतर सईबाईनीं महाराजांना तयार करून ठेवलेल्या पंचारतीनें ओंवाळलें. पुष्पहार गळ्यांत घातला. व अगदीं न भितां त्या म्हणाल्याः—

"आतां कांहीं नाहीं वाटत. पण आपलं पहिल्यानं वाटलं झालं. पण गडे लौकर यावं. माझी आठवण ठेवावी. त्या औरंगजेबाच्या कह्यांत न जातां त्याला चांगली अद्दल घडेल असं कृत्य करून यावं. होईलच तसं करणं म्हणा. इकडचा पराक्रम अर्जुनासारखा आहे. त्याला श्रीकृष्णाचं साहाय्य होतं. आपल्या मातुल घराण्यांतील पुरुष श्रीकृष्णाचेच वंशज आहेत.* अर्थात् तो श्रीकृष्ण आपलंही यावेळीं रक्षण करीलच करील."

"एकूण आम्हांला पंचारती करून आनंदानं निरोप देण्याचं प्रथम ठरलं होतंच वाटतं ?"

* गो. दा. दळवी यांच्या मराठा कुळाचा इतिहास पहा.

" हो, पण ऐन वेळीं मनांत नसत्या शंका येऊन पूर्वीचा बेत कुठच्या कुठं गेला ! "

" हरकत नाही. आतां तूं आनंदानं निरोप दिलास ना ? झालं तर मग. मग येऊं आतां आह्मीं ? "

" संभाजी बाळाला जपावं. " हें सांगतांना सईबाईंचा कंठ दाटून आला.

" संभाजीबद्दल बिलकूल काळजी नको. आह्मी आहोंत बरोबर. "

" हो पण माझं आईचं आतडं आहेना ? "

" आमच्या मातोश्रींचं नाहीं वाटतं आईचं आंतडं ? त्यांनीं वीरमातेला शोभेसा निरोप दिला. "

" हो मग संभाजी आपल्याएवढा आहे वाटतं ? पराक्रमी, मुत्सद्दी माणसं व लहान मुलं यांत कांहींच फरक नाहीं वाटतं ? "

" आमचा पराक्रम त्याचंही रक्षण करील. बरं येतों आह्मीं. आईला जप. "

इतक्यांत संभाजी तेथें आला व त्यानें मातेला मिठी मारली. मातृवात्सल्यानें त्याला पोटाशीं धरून सईबाईंनीं त्याला कुरवाळलें. त्याचें चुंबन घेतलें. व जपून वागण्याला सांगून त्याला महाराजांचे स्वाधीन केलें.

असो. पुढें महाराज संभाजीसहवर्तमान दिल्लीला गेले. तेथें कपटी औरंगजेबानें महाराजांना नजरकैदेंत ठेविलें. परंतु महाराज कसले वस्ताद ! त्यांनीं एक नामी युक्ति योजून त्याच्या हातावर तुरी देऊन दिल्लीहून आपली सुटका करून घेतली. व बैराग्याच्या वेषानें मजलदरमजल करीत स्वराज्यांत येऊन दाखल झाले. केसांच्या जटा वळलेल्या. दाढी वाढलेली. शरीर वाटेच्या दगदगीनें क्षीण झालेलें. अंगांत कफनी, खाकेंत झोळी, हातांत चिमटा अशा थाटानं जेव्हां स्वारी येऊन थडकली तेव्हां प्रथम जिजाबाईंनीं सुद्धां त्यांना ओळखलें नाहीं. मग सईबाईंची गोष्ट कशाला ? तो वेष उतरल्यानंतर पतीपत्नींची गांठ पडली त्यावेळीं महाराज ह्मणाले:—

" हं, दोन हातावरून बोला बाई. कोणी बैरागी आला होता त्याला सईबाई भेटल्या हें जर शिवाजी महाराजांना कळलं तर काय होईल माहीत आहे ? "

" हो–हो आहे बरं." असें ह्मणून सईबाईनीं महाराजांचे हात आपल्या हातीं घेऊन त्यांना मंचकावर बसविलें. प्रथम आपण बैराग्याच्या वेषामुळें कशा फसलों वगैरे हकिगत त्यांनीं सांगितली. नंतर महाराज गेल्यापासूनची हकीगत काय घडली ती विचारली. महाराज ह्मणाले:—' मी तिकडे चांगलाच अडकलों होतों. परंतु या भाग्यशाली देवतेमुळें त्यांतून निभावलों.' यानंतर तिकडे गेल्यापासून परत दक्षिणेंत येईपर्यंतचें सर्व वर्तमान त्यांनी सईबाईंना निवेदन केलें.

महाराजांना आपल्या या पत्नीविषयीं नेहमीं अभिमान वाटे. कारण सईबाईबरोबर त्यांचे लग्न झालें त्यावेळीं ते विजापूरकरांच्या पदरच्या एका सरदाराचा मुलगा ह्मणून ओळखले जात. परंतु या विवाहानंतर दिवसेंदिवस त्यांची ही पारतंत्र्यावस्था जाऊन ते स्वतंत्रतेचा अनुभव घेण्याला समर्थ झाले. एवढेंच नव्हे तर पुढें राजा हें पद पावले. तेव्हां साहाजिकच त्यांना आपल्या या पत्नीविषयीं अभिमान वाटे व त्या भाग्यशाली आहेत असा त्यांचा दृढ विश्वास होता. पुढें ज्या वीर पुरुषाचें अंतःकरण सदा आनंदी ठेवून त्यावर सत्ता गाजविणाऱ्या सईबाई सतीचें वाण घेऊन परलोकी गेल्या.* तेव्हां महाराजांस फार दुःख झालें. त्यांच्या दुखण्यांत स्वतः महाराजांनीं त्यांची सुश्रुषा केली. ते सदैव त्यांच्यापाशीं बसलेले असत. पुढें त्या वारल्यानंतर महाराजांचें मन कशावर लागेना. ते अगदीं उदास बनले. त्यांना इतर स्त्रिया होत्या पण त्यांचे सईबाईवर फार प्रेम होतें.¶ सईबाई देखील सुशील, शाहाणी व पतिव्रता अशी होती. त्या हयात होत्या तोंपर्यंत महाराजांना गृहसुखाची वाण नव्हती. त्या गेल्यावर महाराज गृहसुखाला बहुतेक पारखेच झाले! आणि तसें केव्हांही होणारच. कारण भाग्यशाली सईबाईबरोबर त्या गृहसौख्याच्या सद्दीचा लोप झाला!

---

* सईबाई महामारीनें–कॉलऱ्यानें वारल्या–शिवदिग्विजय.

¶ केळुसकरकृत शिवचरित्र, पान ५४७.

# दिपाबाई.

एका राजमहालांत मखमालीच्या मऊ मऊ अशा कोचावर एक तरुणी बसली होती. तिनें आपला डावा पाय उजव्या पायाच्या गुडघ्यावरून खालीं लोंबत ठेविला होता. त्या पायावरून ती नेसलेल्या शालुचे जरी किनारीचे सोगे पायघोळ जमिनीपर्यंत रुळत होते. एका हाताचें कोपर त्या कोचावर टेंकून त्या हातावर तिनें आपली मान टेकली होती. कपाळावर वाऱ्यामुळें तिचा कुंतलभार विखूरला होता. ती मधून मधून आपला तो स्वैर संचार करणारा केशकलाप हातानें मागें सारीत होती. समोरच पितळी पिंजऱ्यांत असलेल्या मैनेकडे तिची नजर गेल्याबरोबर तो पिंजरा काढून आणण्याबद्दल तिनें एका दासीला हुकूम सोडला. आपणासच यजमानणीनें काम सांगितल्या-मुळें आपल्या अंगीं जणूं मूठभर मांस अधिक आलेंसें तिला वाटलें. एक क्षणही न दवडतां तिनें पिंजरा मालकिणीला नेऊन दिला. पाळीव पक्षीच कीं नाहीं ? दिपाबाईनी दार उघडून हात पुढें करतांच त्यांच्या तळहातावर मैना बसली. व राजाचे पदरीं जसे भाट असतात व ते राजस्तुती करितात तशी आपले भाषेंत मैनेनें राणी दीपाबाईंची स्तुतीच चालविली होती. मैनेला कुरवाळीत दीपाबाई म्हणतातः—

‘ हो, हो. किती ग बोलशील ? मला आहे ठाऊक तुला बोलतां येतें तें. ’

‘ बाईसाहेब, महाराज आले बरं का ! ’

‘ अगबाई, खरंच की काय ! ’ असें म्हणून त्यांनीं त्या मैनेला पिंजऱ्यांत कोंडली. व उभ्या राहून दोनचार पावलें पुढें जातात तोंच व्यंकोजी राजे तेथें येऊन त्यांनीं दरबारी पोषाखसुद्धां न काढतां धाडदिशीं मंचकावर अंग टाकलें. त्यांची दृष्टी तक्तपोशीच्या छताकडे खिळून राहिली. त्यांचा श्वासोच्छ्वास जोरानें चालला होता. चेहरा गंभीर दिसत असून त्यावर रागाची छटाही दिसत होती. पतीच्या या एकंदर वागणुकीमुळे दीपाबाईंनीं सर्व दासींना बाहेर जाण्याविषयीं डोळ्यांच्या खुणेनें सूचना दिल्याबरोबर त्या निघून गेल्या.

नंतर त्यांनीं एक हात पलंगावर ठेवून पतीला प्रश्न केला, 'हें काय, कपडे नाहीं का उतरावयाचे ? आज झालें तरी काय ?'

तरीही व्यंकोजी गप्पच. परंतु विधात्यानें लहान मुलांत, सुंदर फुलांत, आणि सुंदर तरुणीच्या चेहऱ्यांत कांहीं तरी अजब मोहिनी ठेवली असावी ! कारण पाठीवर रुळणारा भला लांबलचक जरीपदर सावरून दीपाबाई पति सन्निध गेल्या व प्रेमभरानें पतीचा हात आपले हातीं घेऊन त्या म्हणाल्या:–

'आज माझ्याशीं नाहीं बोलायचं होय ?'

पत्नीचा मृदु करस्पर्श व मंजुळ बोल कानीं पडतांच व्यंकोजी भानावर आले. सहजच त्यांची दृष्टी दीपाबाईच्या चेहऱ्याकडे गेली मात्र. लगेच त्यांच्या कपाळाच्या आठ्या मोडल्या, व तोंडावर हास्य झळकूं लागलें. मग दीपाबाईच्या चेहऱ्यांत अशी काय अजब जादु होती की, त्यांच्याकडे नजर गेल्याबरोबर व्यंकोजीराजे आपलें त्रस्त मन आनंदमय करूं शकले ? होय–दीपाबाईच्या चेहऱ्यांत चतुर्मुख ब्रह्मदेवानें अशीच कांहीं मोहिनी ठेवलेली होती ! पण तसें कशाला ? थोड्या फार प्रमाणांत प्रत्येक तरुणीच्या ठिकाणीं अशी मोहकता असतेच असते. असो. आपल्या पत्नीच्या डाव्या हाताच्या अनामिकेंतील हिऱ्याची अंगठी आपल्या उजव्या हाताच्या बोटानें फिरवीत व्यंकोजी म्हणाले:—

'ही जुनी जुनी मंडळी फारच बेपर्वाईनें वागूं लागली तर काय आम्हीं स्वस्थ बसावयाचें ? त्या रघुनाथपंतांना 'मी यांच्या आजापासूनचा नोकर' म्हणून फार घमेंड वाटते ! आज भरदरबारांत माझा पाणउतारा ! म्हणे आबासाहेबांना त्यांची वांटणी द्यावी ! यांना या उठाठेवी कशाला ? पुन्हा अहंकार कोण ! म्हणे मी आहें म्हणून तुमच्या राज्याची भरभराट आहे. माझें सामर्थ्य असें तसें नाहीं. दुसऱ्या राज्यांत देखील तुम्हाला अर्ध्या सिंहासनी बसवीन. इतकेंच काय मी तुमच्या अर्ध्यासनीं येऊन बसेन. तुम्हीं म्हणत असाल मीच यांची बडेजाव राखतों. पण पहावयाचेंच असेल तर याच्या सवाईनें माझी बरदास्त ठेवली जाईल ! सांग बरं लाडके, जुनी माणसं म्हणून यांची चर्पट पंजरी आम्ही स्वस्थपणें ऐकून घ्यावयाची काय ? मला

पण राग आला. म्हटलं दाखवाच तरी एकदां म्हणून त्यांना विडे देऊन दिली रजा. पाहूं तरी काय पराक्रम करून दाखवितात ते ?'

'मग गेले कीं काय रघुनाथपंत ?'

'हो–कां वरं ?'

'नाहीं म्हटलं, अनुभवी होते, वृद्ध होते. सल्लामसलत घेण्याला त्यांच्यावांचून दुसरं कोणी दिसत नाहीं.'

'जाऊं देत कीं ! मोठा सोन्याची सुरी झाली म्हणून कांहीं आपल्या उरीं नाहींना खुपसायची ? काय व्हायचं तें होईल.'

'पण एकंदरींत झाली गोष्ट कांहीं बरी झाली नाहीं.'

[ २ ]

रघुनाथपंत म्हणजे कांहीं सामान्य व्यक्ति नव्हती. त्यांचे मुसलमानी राज्यांत देखील वजन होतें ! परंतु ते थेट निघाले ते श्रीशिवाजी महाराजांचे आश्रयाला गेले. शिवप्रभूंनीं त्यांना वडिलांचे जागीं लेखून योग्य तो मान दिला. कोणत्याही गोष्टींत त्यांची सल्ला घेतल्यावांचून ती करूंच नये. पंतांनीं व्यंकोजीपाशीं आपण वडील भाऊ म्हणून निम्मा हिस्सा देण्याची गोष्ट कशी काढली व ती त्यास न रुचून त्यानें आपला शब्द तर मोडलाच पण शिवाय भरदरबारांत आपणाला निरोप कसा दिला तें सांगितलें. शिवाजीमहाराजांचें अंतःकरण थोरच. ते उलट रघुनाथपंतांना म्हणाले:–' पंत, कशाला आम्हांला हिस्सा पाहिजे ? आमचा विचार भरतखंडाचें एकछत्री राज्य स्थापून स्वधर्म राखणें आहे. तसाच प्रयत्न आजपर्यंत आम्हीं केला व पुढेंही करूं. मग कर्नाटक काय अजिंक्य राहील ? एक मोहीम करूं तर सर्व कर्नाटक जिंकूं. पंत, तंजावरचा पाड काय ? तथापि आपण आह्माला राजे शहाजींसारखे. आपल्या शब्दासाठीं आह्मी आमचे बंधु व्यंकोजीराजे, याजपाशीं वडिलार्जित वाटा मागूं. नाहींतर एरवीं मला तो काय करावयाचा ? ते आमचे धाकटे बंधु ह्मणून आह्मींच कांहींतरी त्यांना द्यावें.'

'महाराज, हें आपलं सौजन्य. बा सौजन्या! तूं अशा थोरांसच शोभतोस. महाराज, तुझाला त्या वाट्यावांचून काय कमी आहे? पण इरेस पेटल्यानें ही गोष्ट आतां झालीच पाहिजे.'

"ठीक आहे. चिटणीसांचेकडून पत्रें लिहवितों."

ठरल्याप्रमाणें प्रथम पत्रें रवाना झालीं. नंतर माणसें पाठविलीं. पण व्यंकोजी कशालाच जाब देईना. महाराजही कांहीं कमी हट्टी नव्हते. आणि ह्मणूनच तर चिकाटीचा प्रयत्न करून त्यांनीं स्वराज्य स्थापिलें. महाराजांनीं कर्नाटकीं जाऊन आपली कीर्ति गाजविली. पुन्हा बंधुकडे जासुदाहातीं लखोटे पाठविले. मागाहून त्याजकडील माणसें भेटीला बोलावून आपलें ह्मणणें त्यांच्याकडून व्यंकोजीच्या कानावर घातलें. दुर्दैवानें यावेळीं व्यंकोजींना चांगली सल्लामसलत देण्याला कोणी नव्हतें. शाहण्या बायकोचा विचारही त्यांनीं घेतला नाहीं. 'कार्येषु मंत्री' असें जरी ह्मटलें असलें तरी शहाण्या बायकोची कितीसे पतीराज एखाद्या कार्यांत मंत्र्याप्रमाणें सल्ला घेत असतील! असो. व्यंकोजीनें तरी ती घेतली नाहीं. ज्यांची सल्ला घेतली त्यांत शिवाजीचे कांहीं शत्रू होते. त्यांनीं व्यंकोजीला शिवाजीबरोबर युद्ध करावें, आह्मीं शीर हातावर घेऊन लढूं, पहा तर खरें' असें सांगितलें. व्यंकोजींनेंही विजापूरकरांना शिवाजी हिस्सा मागतात ह्मणून मोठ्या खुबीनें कळविलें. ते मध्यस्थीला आलेल्या लोकांना ह्मणतः–' आह्मीं बोलून चालून बादशाहाचे नौकर. त्यांतील हिस्सा यास द्यावयाचा कीं काय? पाहूं कसें काय करावयाचें तें.' दीपाबाईच्या कानीं ही कुणकुण गेलीच होती. त्यांनीं एकदां या बाबतींत खुलासा विचारला. कर्मधर्मसंयोगानें विजापूरकरांकडून या बाबतींत खेदजनक लखोटा आला होता. तो वाचून पाहिल्यानंतर मनाच्या विकारवश स्थितींत पत्नीकडून खुलासा विचारला गेल्यानें त्या उभयतांत खटका उडालाच.

'तुह्मां बायकांना नसत्या उठाठेवी पाहिजेत कशाला? ह्मणतात तें खोटं का कीं, पायांतली वहाण पायांतच हवी. जरा सवलत दिली, लाड केले कीं, चालल्या वरचढपणा दाखवायला. आमचे वडील कसे वागत होते?'

"कसे कां वागेनात. त्यांनीं जिजा सासुबाईंना केव्हांही त्यांच्या मताप्रमाणं वागण्याला आडकाठी केली नाहीं. आणि म्हणूनच आबासाहेब

भाऊजींना त्यांनीं हवें तसें वळण दिलें. प्रत्यक्ष भाऊजी राजकारणांत त्याचे मदत घेतात. सासुबाईंना म्हणे अष्टप्रधानांत भाऊजींनीं नेमलं आहे. कित्येक न्याय निवाडे त्यांनीं केले आहेत. सनदा पत्रें, वतनें वगैरे त्या देत असतात.* त्या एक त्यांच्या माता, पिता, गुरु इतक्यांचें काम करणाऱ्या त्यांना अत्यंत पूज्य असणाऱ्या आई म्हणून ते त्यांना तसा अधिकार देत असतील म्हणावें तर परवांच मीं ऐकलं कीं, सईबाईचा देखील ते कित्येक गोष्टींत सल्ला घेतात. भाऊजींचे शिक्केमोर्तब म्हणे बाईजवळ असून त्या कागद पत्रावर त्याचा उपयोग करितात.§ मला जी हकिगत कळली आहे त्यावरून कांहीं भाऊजींचं म्हणणं गैर दिसत नाहीं. ते म्हणतात त्याप्रमाणं खरोखरच आपण आज तेरा वर्षं सर्व जहागिरीचा उपभोग एकट्यांनींच नाहीं का घेतला ! मांमजीचं आणि आपलें जें नातं तेंच नातं त्यांचं आणि मांमजीचं नाहीं का ! मग त्यांनीं वाटणी कां मागूं नये !

‘ वडिलांचे नांव सांगून आतां हे वाटा मागावयास आले. मग अनेक संकटें वडिलांचेवर आलीं होतीं तेव्हां कां पुढें आले नाहींत ! दुःखाचे वेळीं मागें आणि सुखाचे वेळीं मात्र पुढें. मग आज तेरा वर्षं काय झोंप घेत होते ! मला तर पक्कें वाटतें कीं, हें त्या रघुनाथपंताचेंच कृत्य आहे. पैज मारून गेला आहेना ! हे सांबाचा अवतार असं जे कित्येक लोक म्हणतात त्याप्रमाणें खरोखरीच भोळ्या सांबाप्रमाणें यांनीं वडिलांचे हयातींत प्रत्यक्ष त्यांना मान दिला नाहीं असा रघुनाथपंतांना देत आहेत असं ऐकतो. प्रत्यक्ष आबासाहेब आमचे दायजासारखे वागतात. म्हणच आहे ‘ भाऊ सख्खा, आणि दाईज पक्का ! मग हे तर काय सावत्रच ! परंतु आपणही त्यांचा पक्ष घेऊन आमच्याशीं भाडतां. तुझा कल त्या रघुनाथपंताकडे आहेच म्हणा. आबासाहेब राजकारणांत बायकांच्या बुद्धीनें नाचतात हे पुनः पुनः सांगून काय उपयोग ? आम्हीं तसेंच वागूं असें वाटत असेल

---

* राजवाडेकृत मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें—खंड १७, पान २२, व खंड १८, पान ११.

§ सानेकृत संभाजी राजे यांचें चरित्र, पान १०.

तर तो समज व्यर्थ आहे, आमचे स्नेही वगैरे आहेत त्यांच्या विचाराप्रमाणें काय तें आम्ही ठरवूं." असें जरा झोंकांतच बोलून स्वारानें महालाबाहेर पाऊल टाकलें. व्यंकोजी अशा तुटकपणें दीपाबाईशीं कधीं वागत नसत पण आज त्यांचें मनच ठिकाणावर नव्हतें. शिवाजीमहाराजांकडून नंतर एक निकडीचा निरोप व लखोटा येऊन धडकला. तेव्हां व्यंकोजी महाराजांचे भेटीला गेले. बरेंच दिवस ते तेथें होते. त्यांची बरदास्त शिवप्रभूंनीं उत्तमप्रकारें ठेविली होती. एकांतीं उपदेश केला. वाटा मागितला. परंतु व्यंकोजी त्यावेळीं बिनबोलक्या अंगात येणाऱ्या भुतासारखे गप्पच' ते कांहींच समाधानकारक जबाब न देतां परत आले. शिवप्रभूंनीं बंधूला व त्याच्याबरोबर आलेल्या इतर मंडळींना ज्याच्यात्याच्या योग्यतेप्रमाणें पोषाख व देणग्या दिल्या. व्यंकोजीकडील कांहीं मंडळींनीं त्यांच्या सरळ मनाचें व उदार अंतःकरणाचें, चतुरपणाचें असें वर्तन पाहून त्यांच्या मनाप्रमाणें वागावें, यांतच शाहाणपणा आहे असें परोपरीनें व्यंकोजीला सांगितलें, परंतु त्यांच्या बुद्धीला तें न पटून त्यांनीं इतर मंडळींच्या सांगण्याप्रमाणें वागण्याचें ठरविलें. इकडे महाराजांनीं कर्नाटकांतील इतर किल्ले काबीज केले. व शत्रुला दहशत बसविली. परंतु कांहीं कारणामुळें ते परत फिरले. नंतर एक दिवस महाराजांचे लोक गैरसावध असतांना व्यंकोजीनीं त्यांच्यावर हल्ला केला. तथापि कसें झालें तरी ते शिवरायांच्या तालमेंतील लोक. त्यांनीं शत्रूची दाणादाण करून महाराष्ट्रांतील मराठ्यांचा मार कसा असतो हें शत्रूच्या सैन्याला चांगलें दाखवून दिलें. व्यंकोजीचें बरेंच लोक मारले गेले. कांहीं पळाले व कित्येक शरण आले. अशा रीतीनें सैन्यच्या सैन्य गेलें, संपत्तीचा नाश झाला व वर अपयश पदरीं पडलें अशी व्यंकोजीची स्थिति होऊन ते खजील होऊन परत आले. जातांना कोणत्या इतमानानें गेले व येतांना कोणत्या स्थितींत परत आले! दुर्दैवी प्राणी विचारा, दुसरं काय !

[ ३ ]

शिवप्रभूंना या लढाईची हकीगत थोड्याच दिवसांत कळली. त्यांना झाल्या प्रकाराबद्दल फार वाईट वाटलें. त्यांनीं प्रत्यक्ष भेटींत व्यंकोजीलाही चार समाधानाच्या गोष्टी सांगितल्या होत्या.

" तुह्मी विचारवंत आहांत. तेव्हां हा गृहकलह आपण माजविणें चांगलें नाहीं. त्यांत फायदा उभयतांचाही नाहीं. तोटा मात्र दोघांचाही आहे. या गृहकलहामुळें कौरव पांडवांची काय दशा झाली ? पृथ्वीराज जयचंद अशा सारख्या शूर वीरांचे या गृहकलहापायीं काय धिंडवडे झाले हें तुह्मीं जाणतच आहां. मी जास्त काय सांगणार ! आपल्या भांडणाचा तिसऱ्यांनीं तमाशा पाहूं नये. तुह्मां आह्मीं बंधू एक विचारें चालूं. माझ्या हद्दींतील तीन लाखांचा पाहिजे तो मुलुख आपणाला देतों. आपल्यांवर संकट आल्यास आह्मांला कळवा. तेव्हांच आपणाला मदत पाठवूं."

परंतु अशा प्रकारचा त्या वेळचा बहुमोल उपदेश फुकट जाऊन व्यंकोजीनें लढाईचा प्रसंग आणून आज आपली अशी लाजीरवाणी स्थिती करून घेतली होती. यानंतर महाराजांनीं या प्रकाराबद्दल खेद प्रदर्शित करून समाधानकारक असे एक पत्र रवाना केलें. 'हा पराभव तुमचा नसून प्रत्यक्ष माझाच आहे' असें त्यांत दर्शविलें होतें. तें पत्र फार सुंदर आहे.

*   *   *   *   *   *

इकडे व्यंकोजी राजे परत आल्यापासून अत्यंत उदास झाले. ते सर्व वेळ एकांतांत बसून काढीत. जेवणखाण, झोंप वगैरे कशाचीच पर्वा बाळगीनात. या स्थितींतही त्यांच्या पदरीं कांहीं कमी मंडळी नव्हती. परंतु एकही जण त्यांच्यापुढें जाण्याला धजेना. मग बोलणें चालणें कोठलें ? याप्रमाणें भोंवतालचे पोहणारे दुरदूरच करूं लागले. परंतु सुखदुःखाच्या वेळीं पतीबरोबर उडी घेणारें पत्नीवांचून दुसरें कोण असणार ? दिपाबाईचा जीव पतीची ती स्थिती पाहून तिळतिळ तुटूं लागला. त्या पतीसन्निध गेल्या व ह्मणाल्याः—

" महाराज, झाल्या गोष्टीला इलाज नाही. मग असं उदासपणानं कां वागणं चाललं आहे ? "

" कोण, तूं कोण ? अपकिर्तीनं तोंडाला काळं लागल्यामुळं तें लपवीत असतांना, सहानुभूतीचे शब्द उच्चारणारी तूं कोण ? माझ्या सुखदुःखाची काळजी तूं अद्याप वहातेस काय ? सांग मी तुला पूर्वी झिडकारलं होतं ना ? मग त्याबद्दल तुला कांहींच वाटत नाहीं ? तें तूं विसरून गेलीस काय ? "

" हें काय पती देवा ! मी आपल्या सुखदुःखाची वाटेकरीण आहेना ? अग्नि ब्राह्मणासमक्ष मी आपली जन्माची सहचारिणी झाल्यें आहे ना ? मग माझं कर्तव्य मी विसरून कसं चालेल ? मी आपलं बोलणं मनांत बाळगून त्याबद्दल अढी धरीन असें आपणाला वाटतं तरी कसं ? छे ! छे ! मग आपलं व माझं नातं काय होईल ? पतीपत्नींचं नातं असं स्वार्थाचें कां आहे ? त्यांत स्वार्थ कां असावा ? नाहीं–महाराज नाहीं. पतीपत्नी एकजीव–एकरूप असावींत ! झालं तर मग. आपलं माझं सुखदुःख कां निराळं आहे ? आपलं जें सुख तेंच माझंहीपण सुख आणि आपलं जें दुःख तें माझंही पण दुःखच ! आपला पराजय झाला, आपली अपकीर्ति झाली म्हणून त्याबद्दल एवढं आपण दुःख तें काय करायचं आहे ? त्यांतून बाहेर पडण्याचा, ती अपकीर्ति धुवून काढण्याचा मार्ग आपणाला नाहीं का सांपडणार ? मला वाटतं खचित सांपडेल. हें लढाईचं कृत्य तरी आपण त्या आपमतलबी खानाच्या नादीं लागूनच केलं ना ? असो. झाली गोष्ट होऊन गेली. मी मागंच नव्हतं कां ह्मणत कीं, भाऊजींशीं वाटा देऊन सख्य करावं म्हणून ? ते तरी गैर काय ह्मणत आहेत ? आपण जे मिळविलं आहे त्याचा तर ते वाटा नाहींना मागत ? आपल्याजवळचं जडजवाहीर कांहीं ते मागत नाहींत. फक्त मामंजींची जहागीर ते विभागून मागत आहेत. हा वाटा मागण्यांत भाऊजींचा दुसरा कांहींतरी हेतू असावा. नाहीं तर त्यांनीं थोडं कां राज्य तिकडे मिळविलं आहे ? आपल्यासारखे कित्येक दौलतवान् त्यांच्या पदरीं आज आहेतना ? त्यांनीं ते स्वसामर्थ्यानं पैदा केले आहेतना ? वडिलांच्या दौलतीची जोड त्यांना कितीशी होती ? जिजासासुबाई सुद्धां निरिच्छ ! सर्व अर्थ त्यांनीं सासुबाईच्यापाशींच ठेवलाना ? मला ही गोष्ट पक्की ठाऊक आहे. त्यांना अपयश ठाऊक नाहीं. सौभाग्यदेवा, राग नाहींना येणार ? भाऊजी खरोखर अवतारी पुरुष असावेत. पहा बरं, नित्य लढाया चालल्या आहेत पण त्यांच्या लोकांना एक वेळही अपयश ठाऊक नाहीं. काल ते + + + सांगत होते कीं, भाऊजींच्या लोकांनीं किल्ले, महाल, ठाणीं मिळून चार कोटीपर्यंत प्रांत काबीज केले आहेत. गडे, आतां तरी माझं वेडीचं ऐकावंच."

" होय. चोहींकडून नाडलेल्या या हतभाग्याला त्यावांचून दुसरा कोणता मार्ग आतां उरला आहे? मग मी दुःखानं आपल्या जिवाचं रान कां करावं बरं? नसूं दे—मला आतां कोणाचीही मदत नसूं दे. अरेरे! विजापूरकर स्वच्छ ह्मणतात 'आह्मीं आज या तुमच्या घरगुती भांडणांत पडलों, व त्यामुळें शिवाजी आमच्या मुलखांत उपद्रव देऊं लागला तर त्याची जबाबदारी तुह्मीं घेतां काय?' मिळून काय चोहोंकडून पेंच. आजपर्यंत समेट करा म्हणून सांगणाऱ्या लोकांचें ऐकलें नाहीं, त्यांचा अपमान केला. मग उलट आतां त्यांनीं माझा अपमान केला तर त्याचा दोष या फुटक्या नशिबावांचून दुसऱ्या कोणास द्यावा? त्या रघुनाथपंतानें एकंदर इष्टेटीची खडान् खडा माहिती महाराजांना दिली असेलच! आतां काय करूं?" शेवटलें वाक्य असें कांहींसे आपल्याशींच पुटपुटून व्यंकोजींनीं एक दीर्घ सुस्कारा टाकला.

" पण इतकं हताश तें कशाला व्हायला पाहिजे? मी एक युक्ति सांगूं?"

" बुडत्याला काडीचाही आधार घ्यावा लागतो. सांग, ऐकूं दे."

" रघुनाथपंत कीं नाहीं आजेमामंजींच्या वेळचे. तेव्हां त्यानाच परत बोलवावेत. ते या संकटांतून खास सोडवितील. आतां त्यांचें भाऊजींच्यावर थोडें-बहुत वजन पडेलही. आपण पडतें घेऊन यावेळीं त्यांनाच शरण गेलें पाहिजे. असे कित्येक प्रसंग त्यांनीं पाहिले अनुभविले असतील."

" हो, पण मी आपण होऊन त्यांना घालविलें. आतां बोलाविलें तर मी नामर्द ठरेन. पंतांच्या उन्मत्तपणाच्या भाषणानें त्यावेळीं त्यांच्या माझ्यांत वितुष्ट पडलें."

" मग मी बोलावूं का त्यांना परत? मी त्यांचें आणि आपलें सख्य जोडून देतें. त्यांत आपणाला कमीपणा नको आणि त्यांनाही नको."

याप्रमाणें व्यंकोजींच्या संमतिनें रघुनाथपंतांना गौरवयुक्त शरणपत्र गेलें. त्यांत झाल्या गोष्टींची क्षमा करून त्वरीत निघून येण्याबद्दल लिहिलें होतें. तें पत्र पाहून पंतांचें हृदय गहिंवरलें. ते इतके दिवस व्यंकोजीपाशींच असल्यानें त्यांच्या मनाचा ओढा तेव्हांच माघारी वळला. ते खरोखरीच सांडणी

स्वारासारखे निघून आले. ते आल्यावर मात्र दीपाबाईंनीं आपलें सौभाग्य त्यांच्या पायावर घातलें. पश्चात्तापानें व्यंकोजींच्या डोळयांत आसवें आलीं. पंतांनीं मनांत म्हटलें, अंगाचा वा पापाचा मळ पुण्यपावन नदींत स्नान केल्यानें जातो तर तोच पावनपणा पश्चात्तापगंगेंत नाहीं काय ? आहे !' म्हणूनच आतां व्यंकोजी शुद्ध मनाचे आहेत. पंतांनीं त्यांना क्षमा केली.

दरबारांत जातांना दीपाबाई व्यंकोजींना म्हणाल्याः–' पंतांना अर्ध्या सिंहासनावर बसवावं बरं का ? '

" अर्ध्याच का सगळ्या कां बसेनात. ते मला प्रत्यक्ष वडिलांच्या जागीं. मी त्यांच्या पायांशीं बसेन. त्यांत कसला कमीपणा ? "

आणि खरोखरच दरबारांत सर्वांचे समक्ष व्यंकोजींनीं पंतांना तशी विनंती केली तेव्हां ते म्हणालेः—

' छे, छे ! असें कधीं झालं आहे ? आपण शब्दानं म्हटलंना ? बस्स झालं. आतां माझी प्रतिज्ञा पुरी झाली. ब्राह्मणाचा अपमान केला, विटंबना केली कीं, तो त्याचा शिरच्छेद मानावा असं आहेना ? तोच न्याय येथें लागू. "

पंतांनीं व्यंकोजीचें व दीपाबाईचें सांत्वन करून परत जाण्याची गोष्ट काढली. आतां त्यांना कोण जाऊं देणार ! पण ते म्हणालेः–' मी हल्लीं शिवाजीचा नोकर आहें. त्यांची आज्ञा घेऊनही आलों नाहीं, त्यानें सोंपविलेलें काम पुरें करून त्याची परवानगी घेऊन येतों. '

' कां आपलं तिकडे रहाण्याचं मनांत आहे म्हणून ही युक्ति वाटतं ? '

' नाहीं–तसं कांहीं नाहीं. तथापि आपल्या विश्वासाकरितां मी महाराजांना आपल्या समक्षच लखोटा पाठवितों. ' असें म्हणून पंतांनीं खरोखरीच त्या बैठकीलाच सर्व मजकुराचें पत्र लिहिलें. त्यांत व्यंकोजींना सौ. दीपाबाईनीं बोध करून ताळ्यावर आणिलें वगैरे मजकूर होता. तो पाहून दीपाबाई म्हणाल्याः—

' हें काय बरं पंत, एखाद्याला नसतं महत्त्व द्यावं ? '

'यांत मी काय खोटं लिहिलं ? खरं ह्मणजे बायकाच भावाभावांत वांकडं पाडून विभक्त होण्याचा प्रयत्न करतात. पण–पण आपण थोर मनाच्या–त्यांच्या उलट. तुकाबाईच्या हाताखालीं वागलेल्याना ? आपण तर भावा-भावांचें भांडण मिटवून फुटीची जूट केलीत–बेकीची एकी केलीत. मी महा-राजांना प्रत्यक्ष भेटलों कीं, या गोष्टी सविस्तर सांगेन.'

अखेर तें पत्र तर रवाना झालें. इतकेंच काय पण त्याचें उत्तर आलें तेव्हांच पंतांची तेथून सुटका झाली. शिवाजीमहाराजांनी त्या पाठविलेल्या पत्रांत आपल्या भावजईचा फार गौरव केला होता. *'आमची भावजय शाहाणी, तिनें शाहाणपणानं वागून पुढील अनर्थ टाळला. आमचें भाग्य थोर ह्मणून व्यंकोजीस ती पत्नी मिळाली.' इत्यादि. या पत्री महाराजांनीं स्वतः दीपा-बाईना शाबासकी देऊन प्रेमानें आशीर्वाद लिहिला होता. पंतांच्या विचारें वांटणी झाली. ही वांटणी नांवाला झाली. महाराजांनीं या वाटणीच्या वेळीं जी कलमें घातलीं होतीं त्यांत एक कलम असें होतें कीं, दीपाबाईना पांच लाखांचा मुलूख चोळी बांगडीसाटीं तोडून द्यावा. त्याची वहिवाट व्यंकोजींनी करावी पण हक्क सांगू नये. त्याची विल्हेवाट दीपाबाईनीं वाटेल तशी लावावी. त्यांना पूर्ण अधिकार होता. इतकेंच नव्हे तर तशी त्यांनीं कांहीं विल्हेवाट न केल्यास वंशपरंपरेनें तो हिस्सा मुलींकडे चालू रहावा. † असो. पंत पुढें व्यंकोजी-पाशींच राहिले. त्यांनीं नेहमीं शिवाजीमहाराजांच्या शौर्याच्या–मुत्सद्दीपणाच्या गोष्टी सांगाव्यात. दीपाबाई त्या अतिशय लक्षपूर्वक ऐकत. व्यंकोजीच मग विनोदानें ह्मणत, 'पंत, ही आबासाहेबांच्या गोष्टी इतक्या भक्तीनें कां ऐकते, ठाऊक आहे का ?'

पंतही कांहीं कमी थट्टेखोर नव्हते. त्यांनीं यावर डोळे मिचकावून ह्मणावें:–'कां बरं ?'

---

* शिवदिग्विजय पहा.

† शिवदिग्विजय.

“ अहो आबासाहेबांनीं. पांच लाखांचा मुलूख दिला आहेना तोडून ? आमची अर्धांगी पण त्या पांच लाखांवर आमचा मुळींच हक्क नाहीं वरं का पंत ? ’

दिपाबाई पण कमी नाटकी नव्हत्या. त्यांनीं मुद्दामच मग गोरें मोरें तोंड करावें. मग पंतांनीं म्हणावें:—‘ हें काय महाराज, आतां शिवाजीनी पांच लाख दिले पण बाईसाहेब पहिल्यापासून त्यांच्या पक्षानें तुमच्याशीं भांडत आहेतना ? बस्स, आह्मी नाहीं हें कबूल करीत. ’

‘ वरं बोवा, राहिलं आमचं. हो करतां काय ? तुह्मी जायचे दादासाहेबांकडे नाहींतर ? हिचं तर काय आह्मीं बंदे गुलाम. हुकूम सोडला तसें वागलों म्हणून आज हा आनंद ! ’

‘ मग गडे, माझी एक हौस पुरवावी. भाऊजींच्या प्रमाणं माझा सौभाग्यरवि स्वातंत्र्याच्या वाण्यानं नाहीं का तळपणार ? बादशाहाचं दास्य, वर्चस्व नको. भाऊजींना हें माझं म्हणणं कबूल असल्यास कळवावं. त्यांच्या कार्यांत या योगानें दुधांत साखर पडल्याप्रमाणें होईल. ’

‘ हो. कळवूं. ’

भावाभावांत कलह उत्पन्न करून मियाबिबींच्या राज्याची इच्छा करणाऱ्या माझ्या वाचक भगिनी दिपाबाईच्या चरित्रापासून कांहीं शिकतील काय ?

दा. क्र. 2006

REFBK-0002076